
कार्तिक हजारे
वे
र
जा
ग
ढ
एक रहस्य
भाग ४

# पेरजागढ... एक रहस्य भाग ४

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# पेरजागढ... एक रहस्य

## भाग ४

लेखक

## कार्तिक गुलाब हजारे

पेरजागढ... एक रहस्य भाग ४

लेखक... कार्तिक गुलाब हजारे

मोबाईल नंबर... ७०३८९५०७६२

व्हॉट्सअँप नंबर... ९७६५३६७०५८

ईमेल.. www.karthikhajare@gmail.com

फेसबुक... https//www.facebook.com... karthik hajare

पत्ता.. मातामाय चौक, सिमेंट रोड, वार्ड क्र. ३...

मु. मिंथूर, पोस्ट: नवेगाव( पांडव), तालुका: नागभिड, जिल्हा: चंद्रपूर.

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : २२ जून २०२२**



©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे- आवश्यकआहे.



वाचनाची आवड मला तशी लहानपणा- पासूनच होती. शाळेतही असताना अगदी एक कथाकार म्हणून माझी वेगळीच ख्याती होती. एखाद्या कल्पनेत आपण काय काय रचु शकतो? याची प्रचिती मला सुखदेवे सर नेहमी द्यायचे. अस्खलित प्रतिसादाने शाळेतील कित्येक संस्कृतिक भागात माझी आवर्जून निवड व्हायची. पण कालांतराने आर्थिक परिस्थिती मुळे माझी शाळा सुटली आणि अंगावर कर्तेपणाचा ओझा आला.

पण आवड कधीच मिटली नाही. वृत्तपत्रांत मी झळकत राहिलो.

कालांतराने तेही बंद झाले. कारण कामाच्या व्यापात मी अडकत राहिलो. पण सवयी प्रमाणे वि. स. खांडेकर, सुहास शिरवळकर अशा बऱ्याच लेखकांच्या पुस्तिका मी वाचून काढायचो. त्यातून माझ्यातल्या कलाकाराचा एक नवीन जन्म व्हायचा. आणि मी परत शुरुवात केली. "कुणाच्यातरी आठवणीत" ही माझी पहिली कविता. जी आजही बेधुंद लहरी माध्यमावर झळकते आहे.

पुढे कथा, कविता, लेख, चारोळी असे बरेच प्रकार त्यात समावेश करू लागले. पण काहीतरी लिहायचं? हा प्रश्न मनातून जाईना. कादंबऱ्या वाचताना


मी पात्रांची, भावनांची विचारसरणी व्यक्त करत गेलो. आणि नव्या जोमाने लिहायला लागलो.

शब्दांचा हा निरंतर प्रवास,  
संपूच नये कधी...  
आयुष्य जगुनी जावे,  
शब्दांच्या परी..  
असावे वळण आयुष्याला,  
शब्दांच्या संगतीचे...  
अगदी अश्रुसुद्धा गोठतात,  
शब्दांच्या घरी...

लिहायला जितकी भीती वाटत नाही ना, एक प्रकारे ती भीती आपलं लिखाण दुसऱ्याकडे दिल्यावर वाटते. आपल्या भावना, आपले विचार त्यांना पटतील का? आपलं लिखाण त्यांना आवडेल का? पण केला प्रयत्न... आणि थोडाफार यशस्वी झालो. आणि आता त्याच थोड्याफार प्रयत्नाने लिहत आहे.

आपला  
कार्तिक हजारे









# कार्तिक हजारे यांची पुस्तके.

त्यांच्या या कव्हरवर क्लिक केल्यावर ते ते पुस्तक उघडेल.

**वाचायलाच हवीत ही पुस्तकं.** वाचून झाल्यावर कशी वाटली ते कळवा.

मोबाईल नंबर... ७०३८९५०७६२/ व्हॉट्सअँप नंबर... ९७६५३६७०५८

ईमेल.. www.karthikhajare@gmail.com



## प्रस्तावना.. समीर श्रिधरराव भोयर

सर्वप्रथम वाचकांना माझा नमस्कार,तसेच ई साहित्य वरील सर्व मान्यवरांना माझा सस्नेह नमस्कार....

नागभिड तालुक्यातील मिंथुर या छोट्याश्या गावातील रहिवासी "कार्तिक हजारे" हे आमचे मित्रच आहेत. घरी कुठलीही परंपरा नसताना केवळ प्राथमिक शाळेतून त्यांच्यावर झालेल्या संस्कारातून कथा ते कादंबरी असा प्रवास करतात. घरची परिस्थिती बेताची असताना सुद्धा त्यांचे प्रयत्न अगदी धैर्यशील असतात. याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

पेरजागढ हे नागभिड पासून दहा ते बारा किलोमीटर अंतरावर स्थित सोनापूर या गावापाशी वसलेली प्रसिद्ध डोंगररांग आहे. ज्याला सात बहिणीचे डोंगर म्हणून पूर्ण महाराष्ट्र ओळखतो. या पेरजागढाच्या प्राचीन अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. तसेच गावागावात सुध्दा या दंतकथा पोचल्या आहेत. लेखकाने या गडाचा इतिहास कादंबरीच्या माध्यमातून रेखाटून तो सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचविण्याचे कार्य केले आहे.

पेरजागढ एक रहस्य ही गूढ कथा लेखकाने विशेष उदाहरणे घेत तसेच गवखेड्यात घडणाऱ्या घटना लक्षात घेत अतिशय सुंदरपणे रेखाटली आहे. आता पुढे काय होणार? ही भावना प्रत्येक वेळेस मनात घर करून राहते. आणि वाचनाची उत्कंठा वाढत जाते. प्रस्तुत कथेमध्ये पेरजागढविषयी अतिशय उपयुक्त माहिती दिली आहे. तसेच आजूबाजूचा प्रदेश याची तंतोतंत मांडणी केली आहे. ही कथा रेखाटताना लेखकाने ऐतिहासिक,वैज्ञानिक तसेच भौगोलिदृष्ट्या विचार केला आहे. आणि तसेच रितू, पवन आणि त्याचे

मित्रमंडळी,इन्स्पेक्टर राठोड यांचे पात्र आणि त्याभोवती असलेली कथा कादंबरीचा दर्जा उंचावते. प्रस्तुत कथेत असलेली रंजक उदाहरणे,गडावरील वातावरण आणि जनावरे यांच्याविषयीचे लेखन पुन्हा त्यात तेज निर्माण करते.

लेखक गडाचे नियम समजावून सांगताना लिहितात की गडावर ज्या सात बहिणी लुप्त पावलेल्या होत्या त्या अविवाहित होत्या. त्यामुळे हळद लागलेली नवविवाहित मुलं यांचा सहवास गडाला भावात नाही. मासिक पाळी असलेल्या किंवा दारू,मांस सेवन केलेल्यांना हे असलं काही तिथे चालत नाही. ते जंगल त्यांना खायला उठतो.

अशा विविध गोष्टी या कादंबरीत आलेल्या असून त्यासोबतच गडाचा इतिहास सुद्धा आलेला आहे. एका रहस्यमय कादंबरीला ज्या प्रकारची पटकथा आवश्यक असते ती लेखकाने यात मांडली आहे.

"पेरजागढ- एका रहस्य... भाग 2" हे सर्वांना आवडेल यात तिळमात्र शंका नाही. लेखकाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा!!!

समीर श्रिधरराव भोयर...
(शिक्षक)

## अभिप्राय... दुर्गा सुरेश जराते

सर्वप्रथम वाचकांना माझा नमस्कार. तसेच ई साहित्य वरील सर्व मान्यवरांना माझा सस्नेह नमस्कार...

ई साहित्यवरील मीसुद्धा एक वाचकच आहे. आणि बऱ्याच पुस्तिका वाचत असते. जे डोळ्यांनी बघतो ते खरं मानणाऱ्यापैकी मी एक आहेच. परंतु जे बघता येत नाही, ते डोळ्यांदेखत असते असे सत्व मान्य करणारे बरेच कमी आहेत. "पेरजागढ... एक रहस्य" ही एक रहस्यमय कथा, लेखकाने खूप छानपणे रेखाटली आहे.

मला वाचत असताना जी उत्कंठा लागली होती, की आता पुढे काय होणार? काय घडलं असेल नेमकं? काय वळण घेईल प्रकरण? या प्रश्नार्थक साखळीने गुंतवणूक करून ठेवण्यात लेखक नक्कीच यशस्वी झाले आहेत.

प्रस्तुत कथेमध्ये लेखकाने पवन आणि रितूची लव्हस्टोरी, पवन -आईचं प्रेम, अमर -प्रदीप -नमन - सदू यांच्याशी असलेली मैत्री. आणि या सगळ्या पात्रांना एकवटून एक रहस्य गुंतवलेले आहे. मृत्यूचं... शेवटी जेव्हा नमनने ती थैली पवनला दिली. तेव्हा वाटलं की, काय तो मार्ग निघेल? परंतु लेखकाने जो सस्पेन्स ठेवला आहे. तो फारच अप्रतिम आहे. जे वाचकांना सुद्धा नक्कीच आवडेल.

ई साहित्य वरील लेखकाचे "प्रेमाचे अस्तित्व", "काही राहून गेलं होतं" आणि "मुक्ती" या कथांच्या माध्यमातून त्यांनी त्यांचं जे उत्तम लिखाण सादर केलंय. ते खरंच विचार करायला लावणारे आहेत. आणि मलाही ते वाचायला आवडलेच.

मला नक्कीच आशा आहे की, सत्य आणि सत्वाच्या पलीकडे असलेली ही रहस्यमय कथा. नक्कीच वाचकांच्या पसंतीस उतरेल. आणि अश्याच पद्धतीने लेखकाने लेखन करावे ही आम्हा वाचकांकडून त्यांना शुभेच्छा...

दुर्गा सुरेश जराते.
ब्रम्हपुरी.

सत्य आणि सत्वाच्या वाटचालीवर पाऊल टाकताना, आम्ही खूप दूर आलोय याची सारखी प्रचिती येत होती. पण सगळ्या गोष्टींना गृहीत धरून थोड्याफार कल्पनेने रेखाटलेली ही भटकंती बुद्धिमत्ता, देवत्वाबद्दल असणारी श्रद्धा, गडाविषयी अतोनात प्रेम, नैसर्गिक महत्त्व आणि ऐतिहासिक असा जपलेला ठेवा. हे सगळं यात वर्गीकरण करण्यात आलं आहे. कित्येकदा वाघाची डरकाळी, अस्वलाचं गुरगुरणं आणि सापांचं सरपटणं अश्या बऱ्याच भयावह गोष्टींना आम्ही सामोरी गेलो.

कित्येक रहस्यांचा उलगडा करताना हृदयाची स्पंदने वाढून जायची. पण आज या प्रवासाला इतक्या चांगल्या पद्धतीने रंगवताना, मी कधीच बघितले नव्हते. इतर प्रवासासारखा हाही प्रवास काही क्षण चित्रांचा राहील असं मला वाटलं होतं. पण लेखकाने मनोरंजन, सत्वाचं अध्ययन आणि स्थळांची उलाढाल अश्या सगळ्या गोष्टींची पूर्तता अगदी तंतोतंत केली. ज्यामुळे हा प्रवास या पुस्तकाद्वारे आयुष्यातला एक अविस्मरणीय प्रसंग म्हणून डोळ्यासमोर ठेवला. त्याबद्दल मी लेखकाचे आभार मानतो. आणि त्यांच्या "पेरजागढ... एक रहस्य" या पहिल्या भागाला अनुसरून, पुढच्या भागासाठी शुभेच्छा प्रदान करतो.

पंकज माकोडे, नागपूर

सर्वप्रथम वाचकांना माझा नमस्कार,तसेच ई साहित्य वरील सर्व मान्यवरांना माझा सस्नेह नमस्कार....

ई साहित्य वरील खूप पुस्तिका मी वाचत असते.मला वाचनात गुंतत राहायला आवडते. "पेरजागड"ही एक रहस्य कथा आहे.वाचताना मी त्यात इतकी गुंतत गेले की काही क्षणापुरती का असो ना,की मी सुद्धा त्यातील एक पात्र आहे असे वाटायचे.आणि पुढे माझ्यासोबत पुन्हा काय घडेल? हा विचार सदा मनात घोळत असायचा.ही रहस्यकथा वाचत असताना मनाच्या गाभाऱ्यात असलेली चलबिचल कळते.विचार नवचैतन्य निर्माण करतात.कोणतीही कथा असो,पूर्ण वाचन केल्याशिवाय कधीच कळत नाही.आणि अगदी त्याच प्रामाणिक पद्धतीने लेखकांनी बारीक बारकावे मांडले.त्यांनी प्रत्येक भागात ठेवलेला सस्पेन्स वाचकांच्या तृणेला अगदी तडफडत ठेवतो.

सामान्य माणसाची निसर्गाबद्दल काय प्रचिती असते? आणि निसर्गाला नेमके काय हवे असते? हे त्या निसर्गातील एक अविभाज्य घटक असल्याप्रमाणे लेखकाने मांडणी केली आहे.रहस्यांचा उलगडा

घेत असताना मैत्रीचे, प्रेमाचे आणि मातृत्वाचे पण छान अशी उदाहरणे त्यांनी दिली आहेत.त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार.

अशाच प्रकारे आपण नेहमी लिखाण करावे व आम्हाला नव नवीन कथा वाचण्यासाठी मिळाव्यात हीच अपेक्षा.आपल्या पुढील वाटचालीसाठी अगदी खूप खूप शुभेच्छा....

चैताली राजेंद्र पाटील..

बद्रिनारायण बारवाले कॉलेज

जालना....

## पुस्तकाविषयी... कार्तिक हजारे

नमस्कार...

"पेरजागढ..एक रहस्य" या पूर्वीच्या पुस्तकांच्या अभिप्रायांनी मला प्रतीत झालं की पवनच्या हालअपेष्टा, रितुचं निष्काम प्रेम आणि रहस्यमय पेरजागढ या तिन्ही बाबी वाचकांच्या मनात उतरलेल्या आहेत.त्यासाठी बऱ्याच वाचकांनी फोन करून तर काहींनी पत्राने त्याचा अभिप्राय दिलाय.त्याबद्दल वाचकांचे मनापासून आभार...

बऱ्याचदा असं होतं.संथगतीचा प्रवाह जेव्हा वाहतो,तेव्हा खळखळाटाचा निनाद स्वर काय असतो? हे कळायला उशीर लागतं.कारण गाभ्यात असलेला तळाचा अंतर दृष्टिक्षेपाच्या बाहेर असतो.ज्यामुळे त्याचे अनुमान सुद्धा तथ्य असतात. पेरजागढही थोडक्यात अशीच एक गाथा आहे. पवनला त्या गाभ्यात प्रवेश करताना खळखळाट आणि संथपणा या दोन्ही गोष्टींशी पूरक व्हायला हवं.पण हे सगळं घडण्यासाठी त्याला परत गडावरही यायला हवं.

प्रस्तुत भागात होरपळलेल्या पवनला पुन्हा एकदा त्याच्या घाईने घेतलेल्या पुढाकाराने किंमत मोजावी लागते ज्यात त्याचा एक जुना मित्र त्याला मिळतो.आणि वास्तवाशी युद्ध खेळत असताना त्याला त्याच्या अस्तित्वाची थोडीफार माहिती पण मिळते.पण स्वतः मृत्युदेव जेव्हा रितुला जाणीव करून

देतो की पवन कुठे आहे? कुठे अडकला आहे? तेव्हा तिचं अधीर होणं आणि पवनच्या वाटचालीची पुन्हा एकदा शुरुवात होणं दाखवल्या गेलं आहे.

इ साहित्याच्या चालू असलेल्या घडामोडीला माझा नेहमीच आधार असेल.त्यामुळे मी श्री.सुनील सामंत आणि ई साहित्य टीमचं आभार व्यक्त करतो.आणि खास वाचकांच्या आग्रहास्तव सादर करतो...


"पेरजागढ- एक रहस्य"

भाग_४....

कार्तिक हजारे..




गडाच्या
आत जाणारी
एक गुहा..




ढोरघाट...दगडांची चढाई..





जिथून
पेरजागढाचे
अंतर भरपूर
लांब असते.

# महापाषाणयुगीन संस्कृती (Megalithic Culture)

महापाषाणयुगाला (Megalithic) महाश्मयुगीन व बृहदश्मयुगीन या नावानेही ओळखले जाते. हे नाव त्यांच्या ओबडधोबड शिळांची रचना करून स्मारकं उभारण्याच्या पद्धतीमुळे मिळाले. मानवी सांस्कृतिक इतिहासात महापाषाणयुग वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाचे ठरलेले आहे.

त्याचं कारण म्हणजे या संस्कृतीचे अवशेष जगात जवळपास सर्वत्र मिळतात आणि महापाषाणयुगीन दफन पद्धतीशी संलग्न असलेल्या काही प्रथा आताही मोजक्या ठिकाणी प्रचलित आहेत.

अजूनही काही ठिकाणी सुरू आहे ही प्रथा

गडचिरोलीतील काही भागात माडिया समाजात तसेच छत्तीसगड, झारखंडमधील मुंडा, संथाल अश्या काही समुदायांमध्ये या प्रकारच्या दफनपद्धती अजूनही अस्तित्वात आहेत.

जिथे आजही लोकं मृतव्यक्तींच्या आठवणीमध्ये दगडांची, लाकडांची स्मारकं उभारतात. जर आजच्या संदर्भात पाहायचं झालं तर भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधींचे 'शक्तीस्थल' स्मारक हे सुध्दा एकाश्म स्मारकाचं प्रतीक आहे. हुतात्मा व अमर जवांनाच्या स्मरणार्थ सुद्धा अश्याच प्रकारचा प्रतीकात्मक शिलास्तंभ उभारला जातो.



तास...

भावाच्या डोंगरावर असलेले एक श्रद्धास्थान.

दगडांवर असलेला पाण्याचा प्रवाह हा बारमाही असतो.



खोल खाईत
असलेला
हत्तीखोयाळ.

## चकवा..या विषयावर काही

रानात भटकायला गेल्यावर अमक्याला ‘चकवा’ लागला किंवा ‘बाहेरची बाधा’ झाली, अशा गोष्टी कुणाकुणाकडून ऐकायला मिळतात. वनस्पती अभ्यासकांच्या मते या ‘चकव्या’लाही वनस्पतीशास्त्रात काही आधार आहे. त्याचा संबंध भुताखेताशी नसून ठरावीक वनस्पतींचं स्वयंसंरक्षणासाठीचं ते एक शस्त्र आहे.काही जागा मंगल वाटतात. केवढं प्रसन्न आणि रमणीय वाटतं तिथे, याचा अर्थ तिथे सकारात्मक ऊर्जेचे प्रवाह वाहत असतात. तर काही जागा गूढ, रहस्यमय शक्तींनी भारलेल्या असतात असं वाटतं, आणि त्या आपल्याला अस्वस्थ करतात. तिथे नकारात्मक ऊर्जेचं प्राबल्य असतं. त्या ऊर्जेच्या संपर्कात माणूस आला, की माणसाचं संतुलन बिघडतं. तो भारलेल्या अवस्थेत जातो. कधी आजारीही पडतो. अशी भारून टाकणारी एक अरण्यशक्ती तिथे असते. या अरण्यशक्तीचे, निसर्गऊर्जेचे अनेक अनुभव, अरण्य हेच आपलं घर मानून, सारं जीवन अरण्यात घालवणाऱ्यांना येतात. रानावनात पडणारा चकवा किंवा पडणारी ‘रानभूल’ म्हणजे पानाफुलांतील, वृक्षवेलींतील अज्ञात गूढ शक्तीचा अनुभव! त्याबद्दलचे थरारक अनुभव ऐकले, की मन थक्क होतं. रानभुलीला तशी अनेक नावं आहेत. गोंड आदिवासी याला ‘झोटिंग’ अथवा ‘सावडीत’ म्हणतात आणि त्याला भुताखेताचा प्रकार मानतात. खेडय़ापाडय़ातले लोक ‘बाहेरची बाधा’ म्हणतात. पण तो अंधश्रद्धेचा विषय नाही.काही झाडांच्या संपर्कात आल्यास, काही वेगळंच चैतन्य जाणवू शकतं. मनाची बैचनी थांबते. उदा. उंबर आणि कोजाब (वटवृक्ष कुळातलं एक झाड).

जंगलातल्या अनेक वृक्षवेलींमध्ये, झाडाझुडपांमध्ये अनेक प्रकारची शक्ती आहे. ती आपल्या जाणिवेच्या पलीकडे असल्यामुळे गूढ वाटते. मात्र ही शक्ती सर्वच वृक्षवेलींत नसते, ठराविक परिसरात ती आढळते. डॉ. जगदीशचंद्र बोस यांनी सिद्ध केलं आहे, की झाडांना भावभावना असतात. समोरच्या व्यक्तीबद्दल नकारात्मक भावना येताच, म्हणजे त्या व्यक्तीची दुष्ट भावना उमजून झाडं, वृक्ष-वेली भीतीनं आकसतात. काही झाडं-फुलं सूर्यास्तानंतर मिटतात. तसंच सर्व वनस्पती संगीतामुळे बहरतात. आपण वातावरणातला प्राणवायू श्वासांद्वारे शरीरात ओढून घेतो आणि उच्छवासाद्वारे कार्बन-डाय-ऑक्साइड वातावरणात सोडतो. हा वायू वातावरण दूषित करतो. पण वृक्षवल्ली तोच ओढून घेऊन प्राणवायू पुरवतात हे सिद्ध झालं आहे. म्हणजे वातावरण शुद्धीकरण करण्याची वृक्षांना समज आहे. त्यांच्याजवळची ही उपजत अरण्यशक्ती विलक्षण आहे.

प्राचीन वेदांमध्ये वृक्षांबद्दलची ही जाणीव दिसून येते. ऋग्वेदात विविध वनस्पतींचं माहात्म्य वर्णन करून त्यांना हे देवत्व का दिलं आहे हे वर्णिलं आहे. यजुर्वेदात कोणत्या वनस्पतीचं कोणत्या यज्ञात कोणत्या वेळी हवन करणं स्वास्थ्यास उपयुक्त आहे, ते सांगितलं आहे. अथर्ववेदात विविध वनस्पतींचा उपयोग विविध आजारांमधे कसा करावा, हे सांगितलं आहे. साध्या खरचटण्यापासून ते बुद्धिभ्रंश, अपस्मार, क्षय आदी मोठ्या आजारांवरही वनस्पतींचा कसा उपयोग करावा याबद्दल अनुभवसिद्ध माहिती दिली आहे.

भृगु ऋषींच्या सांगण्याप्रमाणे अतिउष्णतेमुळे वा थंडीमुळे वृक्षांची पानं, फळं, फुलं म्लान होतात. याचा अर्थ त्यांना थंडी वा उष्णतेचं स्पर्शज्ञान असतं.

वारा,आग किंवा वीज पडणं यांमुळे वृक्ष, त्यांची पानं, फळं विदीर्ण होतात. दूषित पाणी दिल्यास वृक्ष व्याधीग्रस्त होतात. तर निरनिराळं खाद्य, माती, पाणी दिल्यावर किडलेले, खुरटलेले, रोगी वृक्ष बरे होऊन पुन्हा बहरून फळं-फुलं देतात. त्या अर्थी त्यांना गंधाचं व चवीचं ज्ञान आहे. पानांच्या श्वासोच्छवासादरम्यान काही प्रमाणात पाण्याची वाफही वातावरणात सोडली जाते. त्यामुळे साहजिकच झाडांच्या सावलीतील तापमान २ ते ३ अंशांनी कमी असते. अनेक वृक्षवल्लींत पंचेंद्रियांची गूढ शक्ती असते. अर्थात त्या शक्तीचीजंगलात येणाऱ्या प्रत्येक परक्याचं अस्तित्व ही घूसखोरी वाटल्यामुळे त्यांना ती सहन होत नाही. आपल्याला उपद्रव व इजा करण्यासाठीच कुणीतरी आलेलं आहे अशी त्यांची समजूत होते. मग त्यांची स्वसंरक्षणासाठी प्रतिक्षिप्त क्रिया, हालचाल होते. काही वृक्षवेली आपण त्यांच्या जवळपास जाताच पानाफुलांतून उग्र गंध सोडून त्रस्त करून सोडतात. त्या उग्र गंधाचा परिणाम सौम्य किंवा तीव्र भूल दिल्यासारखा होतो. परिणामी प्राणिमात्रांना गुंगी येते. प्रत्येकाच्या मनोबलानुसार कमी-जास्त प्रमाणात स्मृतिभ्रंश होतो. त्यामुळे आजूबाजूच्या व्यक्ती, दिशा यांचं भान राहात नाही. आपण कुठे आहोत, कुठे चाललो आहोत, कुठे जायचं आहे, हे कळेनासं होतं. मेंदू बधिर होतो, आणि मागे, पुढे, डावीकडे, उजवीकडे जाण्याचा रस्ता सापडत नाही. फिरून फिरून व्यक्ती त्याच जागेवर येते. हीच रानभूल! हाच चकवा, आणि हेच झोटिंग! तीव्रता कमी-जास्त असू शकते. या रानभुलीत सापडल्यानं कमकुवत मानसिकतेच्या व्यक्तीचं मानसिक संतुलन बिघडू शकतं. काही वेळा तर त्याचा इतका प्रचंड परिणामकी त्यावर कोणत्याही उपचारांचा लवकर परिणाम होत नाही. ती व्यक्ती अर्धबेशुद्धावस्थेत राहते. आफ्रिकेत तर संपूर्ण माणूस गिळंकृत

करणारं एक झाड आहे. काही वनस्पती दिवसा, तर काही सूर्य मावळल्यानंतर रातराणीसारखा उग्र गंध सोडतात.

स्वसंरक्षणासाठी वेली माणसाला तीव्र गंधाद्वारे गुंगवतात, भूल पाडतात. रानभूल ठरावीक अंतरापर्यंत आणि ठरावीक वेळेपर्यंत आपल्या मेंदूचा कब्जा घेते. चार-पाच व्यक्ती एकत्र असल्या तरी त्या एकमेकांना ओळखत नाहीत. या भुलीच्या सीमेबाहेर जाताच त्याचा परिणाम, गुंगी कमी होते. खंबीर व भक्कम मनाच्या व्यक्ती मात्र अशा रानभुलीतून बाहेर पडू शकतात. कमकुवत मनाच्या व्यक्तींवर मात्र त्याचा दीर्घ काळ परिणाम राहू शकतो. जंगलातले प्राणी, चरायला गेलेली गुरं, शेळ्या-मेंढय़ा, गुराखी, लाकूडफाटा गोळा करायला गेलेले बायका-पुरुष, खेडूत, आदिवासी यांनाही चकवा लागतो. ते भ्रमिष्ट होतात, फिरून फिरून त्याच जागी घुटमळतात. शेवटी थकून, कंटाळून भुताटकी समजून घाबरतात.अशा भ्रमिष्ट झालेल्या व्यक्तींवर प्रसंगी मांत्रिकाकडून अघोरी उपायही केले जातात. पण चकवा, रानभूल हा अंधश्रद्धेचा विषय नाही, ती एक नैसर्गिक अरण्यशक्ती आहे. या शक्तीच्या अस्तित्वाचे संकेत रानभुलीसारख्या अनुभवातून मिळतात.

नवेगाव अरण्यातल्या अशाच एका अनुभवाची गोष्ट. नवेगाव अरण्यातला निसर्ग आणि वन्यजीवांचं निरीक्षण करण्यासाठी शाळा-महाविद्यालयांच्या सहली सतत जातात. एकदा एका शाळेतर्फे पाच दिवसांचं शिबीर तेथे भरवलं गेलं होतं. प्रत्यक्ष जंगलात वास्तव्य करून अरण्यवाचन शिकवलं जात होतं. वन्यजीव आणि त्यांची पर्यावरणातला समतोल राखण्यात होणारी मदत

याबद्दलची माहिती दिली जात होती. काही वेळानंतर सर्वांनी दुपारच्या जेवणासाठी परतीची वाट धरली. वाटेवरच्या पाणवठय़ावर मुलं तहान भागवण्यासाठी थांबली. तेव्हा त्यांची गणती केली गेली. पुढे शिक्षक विश्रांतीसाठी थांबल्यावरही सर्व मुलामुलींची गणती केली. सर्व मिळून २४ जण होते. तिथून त्यांचा कॅम्प ३ किलोमीटर अंतरावर होता. निघताना पुन्हा गणती केली. सर्व २४ जण उपस्थित होते. थकव्यामुळे सर्वांची चाल मंदावली. पुढे १ किलोमीटरनंतर मागे-पुढे चालणाऱ्यांची गणती केली असता २ मुली आणि १ शिक्षिका दिसेनात. त्या थकव्यामुळे सावकाश मागे चालत असतील असं समजून मागे जाऊन त्यांना शोधलं, सर्वांनी खूप हाकाही मारल्या. पण काहीच प्रतिसाद येईना. मागच्या पाणवठय़ावरही शोधलं, पण त्या तिघी कुठेच दिसेनात. सूर्य डोक्यावर तळपू लागला. बाकी मुलामुलींना कॅम्पवर पोहोचवण्यात आलं, आणि त्या तिघींचा पुन्हा बारकाईनं शोध घ्यायला सुरुवात झाली. तेव्हा मात्र धास्ती वाटू लागली. तेवढय़ात अचानक एका नाल्यापुढे ओलसर मातीत मुलींच्या पायांचे ठसे दिसले. त्यांना साद घालत घालत, शोधपथक निघालं. नाल्यातून तसंच २ किलोमीटर चालत गेल्यावर मोहाच्या एका झाडाला टेकून ती शिक्षिका सुन्नपणे बसलेली दिसली. तिच्या कुशीत त्या २ छोटय़ा मुली थकूनभागून पहुडल्या होत्या. शोधपथक आनंदानं त्यांच्याजवळ गेलं. पण त्यांनी त्यांना ओळखलं नाही. तिघींना हलवलं तरी त्यांनी कसली हालचाल केली नाही. त्या भान हरवल्यासारख्या बसल्या होत्या. एकूण परिस्थितीवरून त्या रानभुलीच्या चक्रव्यूहात सापडल्याचं लक्षात आलं. त्यांना आधार देऊन उठवलं, आणि १ किलोमीटर चालत आणलं. दरम्यान, शोधार्थ निघालेली वन विभागाची जीप तेथे आली. काही वेळानं त्या शुद्धीवर आल्या. पुढे ‘आकाशवाणी’वरच्या कार्यक्रमासाठी त्यांचे अनुभव ध्वनिमुद्रित केले गेले.

तेव्हा ती शिक्षिका म्हणाली, ‘‘आम्ही सर्वांच्या मागे चालत होतो. तेवढय़ात एका मुलीला रस्त्याच्या डाव्या बाजूला सुंदर फुलं दिसली. ती तोडायचा मोह अनावर झाला, म्हणून तिघीही फुलांजवळ गेलो. तोच कसलातरी उग्र गंध आला आणि त्या वासानं आम्ही भांबावलो. काय चाललंय तेच कळेना. रस्ता दिसेनासा झाला. मुलींनी माझे हात घट्ट पकडले. आम्ही चालतच राहिलो. कुठे जातोय ते कळत नव्हतं. चालत चालत या नाल्यात आलो. थकव्यानं पायातलं त्राणच गेलं होतं, भान हरपलं होतं. फुलांचा मोह महागात पडला.’’याचा अर्थ स्वसंरक्षणासाठी त्या झाडानं उग्र गंध सोडून त्या तिघींना बेभान केलं होतं.

रानभूल ही अशी जखडून ठेवते. अशाच अनेकांच्या अनुभवांतून लक्षात येतं, की जंगली वनस्पतींमध्ये एक गूढ शक्ती आहे हे नक्कीच. भूत, झोटिंग, बाहेरची बाधा, चकवा आणि रानभूल अशा वेगवेगळया नावांनी त्याची दहशत असते. पण ती निसर्गऊर्जा आहे, अंधश्रद्धेचा विषय नव्हे.

कोरडा पडलेला सातधारा धबधबा...



अर्पण पत्रिका

सदर कथा सर्व ज्ञात आणि अज्ञात रसिकांना समर्पित,

तसेच वेळोवेळी मदत करणाऱ्या माझ्या सर्व मित्रमैत्रिणीस समर्पित...

## पूर्ववत...

पवन प्रकरण खूप दिवस झाले,कानी आहे माझ्या.पण मुळात पेरजागडाशी त्यांचं काही वास्तव्य असेल, असे मला वाटले नव्हते,आणि वर सोशल मिडियांत त्यांचे इतके तथ्य चालले आहेत, की आमच्यासारखे साधे माणसं या दरवाज्यापर्यंतसुद्धा येऊ शकत नाही.पण निदान आता तरी कळलं,आणि आता निश्चितच मी आपली मदत करू शकेन.

"धन्यवाद"...(रितू हात जोडत सामोरी आली.)

अहो त्याची काही आवश्यकता नाही.माणूस म्हणून माझे पहिले कर्तव्य आहे ते.आधी तुम्ही ती माहिती नीट समजून घ्या?मग वेळ काढून गडावर जाता येईल.आणि काही वाटलेच तर राठोड साहेब आहेतच मला सांगायला.चला निघतो मी,आणि इन्स्पेक्टर राठोड आणि ते प्रसिद्ध तज्ञ आचार्य राऊत पण निघून गेले.त्यांनी दिलेलं पुस्तक घेऊन ती आत आली, आणि काय विशेष आहे? असं म्हणत त्या पुस्तकात बघून वाचू लागली.कारण नक्षा बद्दलची एक उत्सुकता तिच्या मनात घर करून गेली होती.

पुढे चालू.....

## २५. पवन चकव्याच्या तावडीत....

मला त्या गडाबद्दल समजून घेण्यासाठी एक एकांत हवा होता.आणि इतक्या येरझारा घालून मी बऱ्यापैकी माहिती गोळा केली होती.घरी परतताना काकाने काही दिवस राहण्याची खूप विनंती केली होती.पण मी लवकरच परतणार म्हणून असं समाधानपूर्वक त्यांना सांगितलं होतं.त्यासाठी त्यांचे दोन ते तीन वेळा कॉल येऊन गेले होते. तितक्यात बहिणींचा लागलेला जिव्हाळा ,काकुंचे मायाळू प्रेम आणि असं बरंच काही होतं.जे मला कधीच परकं वाटत नव्हतं.अगदी आपल्यात घेतल्या प्रमाणे वाटत होतं.

दिवसेंदिवस एक माह चालला गेला होता.पण अजूनही मी तिथेच होतो.मृत्यूचे काहीच रहस्य माझ्या हातात आलं नव्हतं.मनामध्ये एक प्रकारचं संताप उसळया मारू बघत होतं.उगाच रिकाम्या खोलीत येरझारा टाकून मन कुठेतरी गुंतवण्याचा प्रयत्न करीत होतो.शेवटी काय चुकलं? कुठे कमी पडलो? अशी बरीच विधाने माझ्या मस्तकात धुमाकूळ करू लागली होती.शेवटी त्रासून मी बिछान्यावर आडवा झालो.

सध्यातरी मोबाईलच्या मॅपमध्ये की यूट्यूबमध्ये अशा बऱ्याच सोशल मीडियावर पेरजागड हा इव्हेंटप्रकारे सेव्ह झाला होता.अचानक मोबाईलवर यूट्युबची एक डिस्कवरी चॅनेलची नोटीफिकेशन आली.मी ती ओपन केली.एक

वाघ रानम्हैसीच्या कळपांच्या मागे मागे धावत होता.जवळपास दहा मिनिटे ही आक्रमक झुंज चालू होती.ज्यात कधी वाघ रानम्हैसच्या मागे लागायचा,तर कधी रानम्हैस वाघाच्या मागे लागायची.मी पुन्हा उत्साहाने ती झुंज बघत होतो.कारण त्यामुळे कदाचित माझ्याही डोक्यात एक विचार डोकावून गेला होता.

बऱ्याचदा आपण बघतो.युद्ध कधीही बरोबरीने किंवा बरोबरीचा असावा लागतो.पण हा युद्ध स्वतःला जगविण्यासाठी होता.त्यामुळे दोन्ही हिंस्त्र प्राणी अगदी जीव पणास लावून खेळत होते.आणि युद्धात जिंकणे हे सगळयात महत्वाचे असते.मग युद्ध जिंकण्यासाठी कोण कुठल्या थराला जाईल सांगता येत नाही.जेव्हा वाघाला वाटले की आपण समोरून युद्ध जिंकू शकत नाही.तेव्हा त्याने मागाहून हल्ला केला आणि रानम्हैसला जखमी केले.घायाळ झालेली म्हैस रक्तबंबाळ झाली आणि वाघाचे खाद्य झाली.यातून इतकंच कळतं की लक्ष्य गाठण्यासाठी भक्ष्याची कमजोर बाजू बघणे हे आवश्यकतेचे आहे.

पेरजागड चंद्रपूर,चिमूर आणि भंडारा या तीन जिल्ह्यांमध्ये बसला आहे.ज्यामध्ये डोंगररांग आणि सपाटीचे मैदान आहेत.तेव्हा कुठे ना कुठे याची कमजोर बाजू असायलाच हवी असा माझा अंदाज होता.एकट्याची सुरुवात असल्यामुळे मी नागभिडच्या शिव टेंपल पासून सुरुवात करण्याचे ठरवले होते.जेणेकरून घोडाझरी तलावाच्या काठाकाठाने भावाची डोंगरी जिथे संपते तिथपर्यंत जाता येईल.असा माझा विचार झाला.

त्या वेळी केलेला तो माझा पहिला प्रयत्न होता,आणि अगदी घाईत घेतलेला निर्णय होता.कारण ती पावसाळ्याची वेळ होती.संपूर्ण जंगलाने हिरवा शालू अंगावर चढवला होता.जागोजागी पेट घेऊन उघडाबोडखा झालेला रान परत एकदा हिरवागार झाला होता.आणि पावसाळयाच्या त्या मौसमाने पायथ्याशी कित्येक झऱ्यांचा उगम दिसत होता.अगदी पायवाट सुद्धा हिरवाईने नटली होती. जवळपास कुणी असेल तरी झुडूपांमुळे दिसत नव्हते.

त्या वेळेस सुरुवात कुठूनतरी करायची आहे, या बहाण्याने मी एकटाच तयारीला लागलो. नागभिडच्या शिव टेंपलपर्यंतचा प्रवास कित्येकांच्या सहवासात होता.त्यामुळे एकटेपणाची जाणीवच कधी भासली नाही. थोडं फार मन बेचैन जरूर झालं होतं.ज्यामुळे बसमधूनसुद्धा वारंवार डोंगराकडे बघण्याचा प्रयत्न करत होतो.वारंवार मॅप ओपन करून त्यात काही बघण्याचा प्रयत्न करत होतो.

सरतेशेवटी मनाचा मनोरा खंबीर करत शिवटेंपलच्या पायथ्यापासी आलो.हिरवळीने नटलेले ते शिव टेंपल अगदीच प्रेक्षणीय वाटत होतं.वातावरणाच्या सफाईने सगळं काही शिखरापर्यंत अगदीच स्वच्छ दिसत होतं.आणि त्यातच दिसत होती डोंगरावर असलेली शिवशंकराची एक भव्य प्रतिमा.मध्येच सूर्याने पांघरलेली ढगांची शाल थोडीशी का होईना सैल सोडली आणि काही किरण त्या शिव प्रतिमेवर पडले.त्या प्रकाशकिरणाने प्रतिमा अगदी लख्खपणे दिसत होती.

मी हे सगळं पायथ्याशी राहून बघत होतो.एकदा वाटलं की, जावं प्रतिमसमोर.पण प्रवास लांबचा असल्यामुळे मी ते अव्हेरलं.पायथ्याशी राहूनच दोन्ही हातांनी मी शिवाला नतमस्तक झालो, आणि स्वार्थाचा एकही शब्द मुखावर न आणता मी वाट पकडली.

पावसाचं पाणी वसुधेचं अमृत असतं. कारण जेव्हा जेव्हा ते वसुधेला मिळतं.तेव्हा तेव्हा तिचा परत एकदा पुनर्जन्म होतो.ती सावरते,बहरते. लहानग्यापासून ते मोठ्यांपर्यंत नवचैतन्य बहाल करते.एक नवा वेश,एक नवं रूप धारण करते.सगळे जखम,सगळ्या वेदना,सगळे वैर विसरून परत एकदा आनंद साजरा करते.

पायाशी बरीच भूतगांज्याची (पावसाळयात चढ उतारावर असणारी वनस्पती,गावकरी मधाचे छत उतरवायला ज्याचा वापर करतात.) रोपे येत होती.उन्हाने पिवळटलेला गवत पावसामुळे हिरवागार होऊन जमिनीला बिलगून बसला होता. पायवाटेला डांबून ठेवले होते त्यामुळे कसेबसे वाट काढत मी जंगलात जाणाऱ्या मुख्य रस्त्याला लागलो.

जवळपास पंधरा ते वीस मिनिटांच्या कालावधीत मी शिवटेंपलच्या मागील बाजूस उभा होतो.अगदी शांततेत. नागभिड सारख्या गजबजलेल्या शहराच्या पलिकडे ही शांतता असेल असे मी गृहीत धरले नव्हते.आजूबाजूला अगदी कुणीच नव्हते.आजूबाजूच्या गावातील बरेचसे मेंढपाळ तिथे शेळयामेंढया चरायला नेतात, ज्यामुळे अगदी सगळीकडे पायवाट रमलेली

होती.अचानक पलिकडे असलेल्या झाडींमध्ये काही हालचाल मला आढळली.

थोडी भीती मनात साठलीच होती, पण तरीही मोजक्या पावलांनी दुरून दुरून मी ती हालचाल टिपण्याचा प्रयत्न करत होतो.पायथ्याशी बऱ्याच जागून पाण्यांच्या झऱ्यांचा उगम होत होता. ज्याच्यापाशी काही हरणे खेळकुद करत होती.मी मोबाईलवर त्यांची चित्रफीत काढणार इतक्यात व्हॉट्सॲपच्या मेसेजची टोन वाजली, आणि त्या आवाजाने सगळी हरणे जंगलाच्या आत पळून गेली. मी मोबाईल सायलेंट न करण्याचा पश्चाताप करीत परत तिथे आलो.जिथून मला वाट पकडायची होती.

आपण मॅप बघताना मॅपमध्ये पाहिजे तिथे बघू शकतो वा जाऊ शकतो,पण प्रत्यक्ष त्या जागेवर आल्यावर बऱ्याचदा कुठून जायचे व कसे जायचे? हा प्रश्न छळत असतो.रस्त्यांशी वादविवाद करत असताना जंगलातून एक इसम काही फांद्यांचं ओझं खांद्यावरून आणत असताना दिसले.( बहुतेक ते शेळयांचे खाद्य असावे.)त्यामुळे मी त्याच रस्त्याने जावं असं गृहीत धरलं.शिवाय शिव टेंपलवरून आपल्याला तो तलाव बघता येतं त्यामुळे तो जवळच असेल यातही काही शंका नव्हती.

पायवाटेने मी जसजसं चालण्यास सुरुवात केली. तसतसं अगदी पायवाट निर्मनुष्य होत जात होती.कधी सांबराचे खूर पायवाटेवरच्या चिखलात रुतलेले असायचे,तर कधी वाघाचे पंजे असायचे.या वेळेस कधी पानांची

सळसळ नव्हती तर नव्हता पिंजलेल्या काटक्यांचा आवाज,अधूनमधून बारीकसारीक रिमझिम पाण्याचा वर्षाव होता,तर कधी थंड हवेचे झोके.मध्येच रानडूकराने विखुरलेले वासते( कोवळा बांबू) तर ढोरकांदे ( रानटी कांदा) पायवाटेवर असायचे.वाटेत काही जागा अतिशय घसरणीची होती.त्यामुळे हळू चालावं म्हटलं तरी पायातील चप्पलचा पिच पिच असा आवाज व्हायचा.

गोंगाटाच्या आणि शांततेच्या मध्यंतर फक्त शिवटेंपलचा डोंगर आडवा होता आणि बाजूला फक्त जंगल.काही अंतरापर्यंत त्या शिवप्रतिमेने स्वतःचं रूप दाखवलं होतं पण इतक्यात माघारी होऊन ती प्रतिमाही दिसेनाशी झाली होती.उलट तो डोंगरसुद्धा दूर दूर होत झाडांमध्ये लपल्यासारखा झाला होता.काही विरळ जागेंतून माथ्यावरील दगडे मात्र दिसायची.

जवळपास एखाद किलोमीटर चाललो असेन.काहीतरी ओळखीची जागा वाटली. समोरचा परिसर बघून क्षणभर वाटेवरच थांबलो.क्षणभर विचारांच्या अंती कळलं की काही दिवसाअगोदर व्हॉट्सॲपच्या माध्यमाने एक व्हिडिओ आला होता.ज्यात एका पट्टेदार वाघाला बरीच इसमे जमा होऊन मारहाण करीत होती.कारण तो व्हिडिओ तिथे मारहाण करीत असलेल्या घोळक्यातूनच एकाने काढलं होतं.तेच विरळ पण अर्धवट जंगल डोळयाच्या समोर होतं.कारण कित्येकदा मी विचार करत होतो की नागभिडच्या कोणत्या ठिकाणचं हे व्हिडिओ असेल.आज पहिल्यांदा या बाजूला आल्यावर मला हे दिसून आलं.

हलक्या हलक्या पावसाची रिपरिप कानाशी गुंजतच होती.त्यामुळे कुणा पाखरांची कुजबुज नव्हती,तर कोणतं फुलपाखरू नव्हतं.काही वेळाने जंगल उभाट होऊ लागलं आणि पायवाटही अगदीच निरुंद झाली.कधी झुडूपातून तर कधी डेरेदार झाडांच्या खालून.पण घोडाझरी तलावाचा काही पत्ताच लागेना.बरेच चालल्यासारखे वाटत होते.त्यामुळे आपण रस्ता चुकलो की काय? ही भीती सारखी मनात दाटत होती.जनावरांचे ताजे ओले ठसे पायवाटेवर अगदी स्पष्ट दिसून येत होते.

कुणाला विचारावं म्हटलं तर जवळपास मी दोन किलोमीटर त्या जंगलामधून पायी प्रवास केला असेन.आणि त्या दोन किलोमीटरच्या प्रवासात एकही माणसाची मला भेट झाली नव्हती.मी एक एक पाऊल समोर तर वळवत होतोच पण त्या पाऊलात फक्त साहस किंवा जिज्ञासा उरलेली नव्हती.आता त्यात भीती पण दडलेली होती. संघर्षच नव्हता राहिला तर आता त्यात थरकाप दडलेला होता.आणि जगाचं नियम आहे भीतीने ग्रस्त झालेला माणूस फक्त अर्ध्या प्रयत्नाने पराभूत होतो.कारण ही भीतीच त्याला अर्ध्याहून जास्त पराभूत केलेली असते.

आणि मला वाटते त्या माझ्या पहिल्या प्रयत्नात त्याच भीतीने माझा घात केलेला असेल.मी जसजसं समोर जात होतो.पायवाट तितकीच मला दूर वाटत होती.दुपारचे बारा वाजून गेले तरी मी अर्धा टप्पा पार केला नव्हता त्यामुळे मी कुठेतरी कमी पडत आहे याची मला सारखी जाणीव व्हायला लागली होती.पण एक स्वर कानावर पडायला लागले होते.

गावखेड्यात कसं असतं? लग्न म्हटलं की सनई चौघड्याचे स्वर कानावर येतात.पूर्वीसारखं जरी आत्ता काही राहिलं नाही तरी बऱ्याच जुन्या रिती,परंपरा आजतागायत आहेत.त्यामुळे पूर्वीचे कलाकार जरी नामशेष झाले असले तरी त्यांचे स्वर मात्र प्रत्येक लग्नमंडपात ऐकायला मिळतात.

अगदी तसेच स्वर कानावर येत होते.सुरुवातीला ते स्वर अगदी बारीक बारीक कानामध्ये गुंजत होते.पण जेव्हा पूर्ण लक्ष मी त्या आवाजावर केंद्रित केले तेव्हा अगदीच स्पष्टपणे ऐकू येत होते.आणि ते पण इतक्या जवळ असल्यासारखे वाटत होते की जणू तासाभरात आपण तिथे जाऊन पोहोचतो की काय?ते स्वर,तो वाजा गाजा अगदीच स्पष्टपणे कानामध्ये शिरत होता.

पावसाची रिपरिप चालू होती.पण समोर मात्र पाय जात नव्हते. इतकं अंतर आपण चालून आल्यावरही आपल्याला तलावाचा लवलेशही दिसत नाही.याचा अर्थ आपण नक्कीच रस्ता चुकलोय.आणि जवळपास कोणत्यातरी गावाजवळ येऊन पोहोचलोय. असं वाटत होतं.पण एक विचार हाही मनात घर करुनच होता, की येणारा स्वर हा नक्की हा लग्नसराईचा आहे.पण गावखेड्यात लग्न म्हटलं की ते उन्हाळ्यात किंवा दिवाळीत असतात.आणि आता तर पावसाळा आहे. या पावसाळ्यात इतका लवाजमा असण्याची आवश्यकताच काय?

घोडाझरी तलावाच्या दिशेने जावं म्हटलं तर पाय वळतच नव्हते.राहून राहून सारखं मन त्या आवाजाकडे जाण्यास मग्न पाडत होते.आता तर तो आवाज त्या जंगलातही रमायला जायला लागला होता.आणि सारखं त्या आवाजामुळे मला वाटायला लागलं होतं की नक्की आपण रस्ता चुकलोय.

जंगलाच्या जवळपास कसारला हे एक गाव होतं तर त्याच जंगलाच्या आत कोरंबी हे अजून गाव होते. या दोन गावापैकी आपण नक्की कोणत्या गावापाशी वाट चुकून पोहोचलो आहोत हे मला जाणून घ्यायचं होतं.त्यामुळे मी आवाजाच्या दिशेने जायचं ठरवलं.

पायवाटेकडे जायचा रोख त्या आवाजाकडे केला.समोरच डोळयांना एक छोटीशी पाऊलवाट दिसली.जी जंगलाच्या आतमध्ये त्या आवाजाकडे जाताना दिसली.मी ती वाट पकडली.आणि त्या वाटेने जाऊ लागलो.उगाच त्या जंगलात भटकण्यापेक्षा कुण्या गावात गेलेलं तरी बरं असं वाटू लागलं. जसं जसं मी त्या आवाजाच्या दिशेने जात होतो.मनात एक समाधान आल्यासारखं जाणवत होतं की आपण कुण्या गावाशेजारी जात आहोत म्हणून.

पण काही वेळानंतर मला अजून वेगळंच काही भासायला लागलं. गेलं तासभर तरी मी चालत होतो.पण ती पायवाटसुद्धा संपत नव्हती आणि तो आवाजही.त्या आवाजातसुद्धा कसलाच फरक जाणवत नव्हता.मी क्षणभर थांबलो आणि एक छोटासा सुस्कारा देत सभोवार बघितलं.मी जशी नजर आजूबाजूला पसरवली.मला एक धक्काच बसला.

जेव्हापासून मी ही वाट पकडली होती.शिवाय वाटेच्या मी सभोवार बघितलेच नव्हते.आणि जेव्हा सभोवार बघितले तर माझी भीती आणखीच वाढली.ज्या वाटेवर मी उभा होतो ती एकच वाट तिथे नव्हती.जिकडे लक्ष जाईल तिकडे त्या वाटा विखुरलेल्या होत्या.गेलं तासभर मी कोणत्या वाटेनं चालत आलोय हे सुद्धा मला नीटसं सांगता येत नव्हतं.कारण येताना मी कोणत्याच झाडावर खुण केली नव्हती.झाडांकडे बघुनसद्धा एक विचित्र अनुभूती जाणवली.तिथे असलेला प्रत्येक झाड हा सरळ होता.मग तो बेहडा असो की आवडा,चार असो की धावडा.नजरेत येणारा कोणताच झाड वाकड्या स्वरूपाचा दिसत नव्हता.

मी कुठे आलोय?ही कोणती जागा आहे? प्रश्न सतावू लागले.मोबाईल काढला तर उतरतीचे दीड वाजले होते.मी घाईघाईने मोबाईलचं मॅप ओपन केला.पण लोकेशन काही दिसतच नव्हते.सारखं सारखं जागा बदलवत होते. नेमकं मी कोणत्या ठिकाणी अडकलो आहे.ती मूळ जागा मॅप दाखवायला तयारच नव्हता.मी वारंवार प्रयत्न करता होतो.आणि अचानक मोबाईलमध्ये गुंतलेलं असताना समोर काही हालचाल व्हायला लागली.

त्या गोंधळलेल्या परिस्थितीत भीती अनावर झालेली होती.ज्या प्रयत्नांची पराकाष्ठा करत मी आजचा प्रवास निवडला होता.तोच प्रवास असं अर्धवट सोडून परतण्यासाठी बघत होतो.समोरच्या झाडावर बघितलं तर काहीच नव्हतं पण कुणीतरी त्याला गदागदा हलवण्याप्रमाणे हलवतोय असं

वाटत होतं आणि एक विचित्र गुरगुरण्याचा आवाज कानाशी येत होता.आतापर्यंत येत असलेले स्वर पाण्याच्या सरीसोबत केव्हाच थांबले होते.

मी तिथून पळ काढण्याचा प्रयत्न करत होतो.जिकडे जावं तिकडे पायवाटा दिसत होत्या.उंचच उंच आणि सरळ वृक्षांची वृक्षवल्ली दिसत होती.पावसामुळे बऱ्याच जागी अडखडून पडता पडता सावरलो होतो.बऱ्याचदा असं वाटून यायचं की एखादं सावट माझ्या अंगावर येऊ पाहते आहे,कारण जसं जसं मी पळत होतो तसेच एखाद्या वानरासारखे या झाडावरून त्या झाडावर उडी मारल्याचा सारखा सारखा भास होत होता. न जाणे कितीवेळ मी असा जंगलात हुंडळत होतो,माहित नाही.पण धावू धावू त्या भर थंड मौसमातही तहान अगदी कासावीस झाली होती.आणि इतक्यात ते भासही फार मागे गेल्यासारखे वाटत होते.

त्यामुळे जरा उसासा टाकत एका मोहाच्या झाडाखाली बसलो. बॅग मधून पाण्याची बॉटल काढली.आणि तोंडाला लावली.हळूहळू धापापलेला छाता शांत होऊ लागला.अंगात एकप्रकारची नवी तरारी आली होती.चारी बाजूला जंगल दाटलेला होता पण आता मात्र पायवाटा दिसत नव्हत्या.आणि सरळ झाडे पण दिसत नव्हते,आणि ते लग्न सराईचे स्वरसुद्धा केव्हाच बंद झाले होते.फक्त समोर होतं..चारही बाजूने दाटलेले ते जंगल, आणि त्यात जंगली जनावरांसाठी सापडलेला आयता सावज मी!मी इथे का आलो असेन? कसा आलो असेन?आता जायचं तरी नेमकं कोणत्या दिशेने? काहीच कळत नव्हते.

वेळ जात होती कापरासारखी,मी मात्र चारी दिशेला न्याहाळत होतो आणि पावसाळी दिवसात पाहिजे तेव्हढा सूर्यप्रकाश विखरत नाही.कारण तेव्हा फक्त मेघांचं राज्य असतं.त्यामुळे आभाळ जेव्हा दाटून येते तेव्हा भर दुपारीही काळोखाचा भास देऊन जाते.आणि हे तर जंगल आहे.इथे काही वेळा जमिनीपर्यंत सूर्यप्रकाशसुद्धा पोहचत नाही.

# २६. पवनची सुटका आणि आकाशची भेट ..

तीन वाजून गेले होते आणि मी तिथेच अडकून बसलो होतो.इथे थांबण्यापेक्षा हातपाय हलवलेले बरे असे समजून मी चालण्यास सुरुवात केली.काही झाडांना सारत, वाकत,बागत एखादी पायवाट शोधण्याचा प्रयत्न करत होतो.तोच समोर पाण्याचा खळखळ असा आवाज कानावर आला.जवळपास ओढा किंवा नाला असावा या आशेने मी जरा पावले तेजीने मापली.

पावसाळी दिवसांत इथून तिथून पाण्याचे छोटे छोटे ओहोळ तयार होतात.पुढे घसरणीला लागून त्यांचा एका ओढ्यात रूपांतर होतो.आणि परत त्यांचा रूपांतर एका नाल्यात होतो.आणि पुढे जाऊन हाच नाला एखाद्या तलावाला जाऊन मिळतो.जोपर्यंत त्याचे रूपांतर ओढ्यातून नाल्यात होत असते तोपर्यंत इतरही जागून छोटे छोटे ओहोळ त्याला येऊन मिसळत असतात.ज्यामुळे त्या नाल्यांतूनही पाण्याची बरीच पातळी वाहत असते.

मी जेव्हा झाडीच्या बाहेर आलो.एक छोटासा ओढा तिथे खळखळ वाहत होता.मी हलकेच बॅग बाजूला काढली आणि त्या ओढ्यात

उतरलो.दोन्ही हातांची ओंजळ करून आधी त्या ओढ्यातले पाणी चेहऱ्यावर शिंपडले आणि चेहरा ताजातवाना केला.नंतर त्याच ओंजळीने पाणी पिले.वेगवेगळया मृदेंतून पाझरत आलेला पाणी,खरंच त्याची चव फार अक्षम्य वाटली मला.मी आवडीने अजून ओंजळभर पाणी पिण्यासाठी हात पाण्यात पसरले,पण या वेळेस पाणी साफ नव्हतं,अगदी लालसर रंगाचं पाणी हातात जमा झालं होतं.मी ओढ्याच्या वर लक्ष केंद्रित केले.पुढे पुढे तर ओढा लाल लाल होऊन वाहायला लागला होता.

हे असं कसं होऊ शकतं? म्हणून मी त्या ओढ्याच्या वरच्या दिशेने जाण्यास सुरुवात केली.जवळपास पन्नास ते सत्तर मीटर चालून झाल्यानंतर एका झाडीतून तो लाल रंगाचा ओढा वाहतोय असं दिसून आलं. वर ती झाडी पण हलत होती. असं वाटत होतं की कुणीतरी रक्ताळून तिथे तडफडतोय.मी जरा घाबरतच हळू हळू पाऊले टाकत त्या झाडीपाशी आलो.झाडी रुंद असल्यामुळे बाहेरून आतमधलं काहीच दिसत नव्हतं.आणि ते जे काही होतं ओढ्याच्या वरच्या बाजूस होतं.

त्यामुळे अलवार पाऊले टाकत मी जराशी झाडी बाजूला सारली आणि काळजात एकदम धस्स झालं.तिथे एक सांबर मरून पडला होता.पण अद्याप मेलेला नव्हता.कारण त्याचे तडफडणे आणि त्याच्या डोळयातील वाहणारे ते जिवंत गरम अश्रू सांगत होते.ती शिकार होती वाघाची.बाजूलाच बसून एक पट्टेदार वाघ त्याचे लचके तोडून मजेने खात होता.हे सगळं कॅमेरात रेकॉर्ड करून टीव्ही वर दाखवलेलं असतं तर काहीच वाटलं नसतं पण हे सगळं प्रत्यक्षात

माझ्या डोळ्यासमोर मी हे बघत होतो.बिचारा सांबर काही वेळाने शांत होऊन गेला.त्याला बघून माझ्या हृदयात कालवाकालव झाली होती.

पण इतक्यात वाघाला माझ्या तिथे असण्याची शंका आली असावी.लचके तोडून खात असताना तो उभा झाला.आणि त्याने अशी एक डरकाळी दिली की सबंध रान दणाणून गेला.माझी पार घाबरगुंडी उडाली.आता इथे जर मी काही क्षण थांबलो तर...विचार करायचा वेळच नव्हता.मी हळुहळू आवाज न करता त्या झाडीतून दिसेनासा झालो.

बॅग उचलली आणि त्या ओढ्याओढ्याने जाऊ लागलो.कारण मनामध्ये अजून एक आस शिल्लक होती की हा ओढा नक्कीच घोडाझरी तलावाला जाऊन मिळेल.कधी दगडांतून तर कधी काटक्यातून आडीमोडी अशी वळणे घेत तो ओढा एका मोठ्या नाल्याला लागला.मग मी पुन्हा नाल्याने चालण्यास सुरुवात केली. तोच जवळपास कुणाचीतरी चाहूल लागली.मी जरा बारकाईने तिकडे लक्ष वेधले.दोन ते तीन इसमाच्या बोलण्याचा आवाज कानाशी येत होता.

घाईघाईने मी त्या नाल्याला सोडून परत त्या आवाजाच्या दिशेने जाऊ लागलो.काही झाडे पार करताच मी त्यांच्या मागे निघालो. असं अचानक मला मागाहून बघताच ते सुद्धा जरा घाबरले होते.पण त्यांना काय माहित? दिवसभरात माझ्यासोबत इथे काय घडले आहे ते?आणि अख्ख्या दिवसभरापासून  त्यांना बघून मला किती हायसं वाटलं असेल.त्यातील दोन

बुजुर्ग होते आणि एक विसितला तरुण मुलगा होता.मला बघताच एक बुजुर्ग म्हणाला...

"अरे कोण तू?आणि असं अचानक कुठून आलास?किती घाबरलो होतो आम्ही माहित आहे काय?"

(क्षणभर त्यांना बघून आनंदाच्या भरात ओठांवर शब्दच येत नव्हते.)" परत त्याने विचारले..."

" अरे कोण तू? आणि जंगलाच्या इतक्या आत कसा आलास?"

( शेवटी घाबरलेल्या परिस्थितीत मी त्यांना सगळं पूर्णपणे सांगितलं.)

" ते तिघेही एकमेकांकडे बघत राहिले आणि म्हणाले."

अरे फार नशीबवान आहेस तू.दोनदा मृत्यूच्या तावडीतून वाचलास.पहिल्यांदा जिथे तू भटकलास तो चकवा होता.फार काही नसतं केलं त्याने पण जोपर्यंत तुझं जीव आहे.तोपर्यंत जंगल भरपूर फिरवलं असतं, आणि तेही विविध कलाकृत्या दाखवून.आणि मग दिलं असतं एखाद्या पाण्याच्या स्त्रोतात ढकलून जिवे मरण्यासाठी. पण मग त्यातून उभरलास तर वाचलास नाहीतर कुठे जाऊन बळी गेला असतास देव जाणे.पण दुसऱ्यांदा जिथे वाचलास ना ते खरे भाग्य तुझे.कारण चक्क तू त्याच्याच घरातून आलास.त्याच ओढ्याला

त्याची गुंफा आहे.आम्ही किंवा इतर कुणीही ज्यालाहे सगळं माहीत आहे चुकूनसुद्धा त्या भागाला जात नाही.

बरं आम्ही मासेमारी करायला जातो आहे.तू बरोबरच चल.हा मुलगा मग परतेल घरी,त्याच्याबरोबरच मग येशील घराकडे.मी होकार देत त्यांच्याबरोबर चालू लागलो.ती नागभिडची मासेमारी करणारी लोक होती. घोडाझरीच्या पहिल्या ते दुसऱ्या खोरापर्यंत जी काही पाण्याची पातळी या जंगलात येते.तिथे ते मच्छीमारी करून पोट भारतात.आत्ता जाळ मांडला की रात्रीचे दहा ते बारा वाजेपर्यंत परततात.आणि मग पुन्हा सकाळी जातात.रोजच्या जाण्यायेण्यामुळे त्यांना जराही भीती वाटत नाही.कारण शेवटी प्रश्न पोटाचा असतो.

त्यांच्या मागे मागे मी जात होतो.ती लोकं सांगत होती की जंगलात जायचं असेल तर काही युक्तिवाद जवळ असायला हवा.पायवाटेने बऱ्याचदा माणूस चुकतो. त्यासाठी पायवाट लक्षात असायला हवी, म्हणून आजूबाजूच्या झाडांची फांदी तोडत जायची आणि पायवाटेवर ठेवत जायची.म्हणजे परतताना ती फांदी बघून आपण पायवाट चुकलेलो नाही असं प्रतीत होते.किंवा जोराने ओरडायचं म्हणजे जंगलात असलेले गुरेढोरे वगैरे किंवा जंगलात काही कामानिमित्त गेलेले लोक त्या आवाजाला प्रतिसाद देतात.आणि त्या आवाजाने अंतरा अंतरातली भीती नाहीशी होते.अशा बऱ्याच युक्तिवाद त्याने मला सांगितले.

ती मासेमारी करणारी लोक मला मिळाली हे एक माझं भाग्यच होतं.कारण घोडाझरी तलावाच्या दुसऱ्या खोऱ्याशी त्यांनी त्यांचा जाळ लपवून ठेवला होता आणि आता पहिल्या खोऱ्यावर ते जाणार होते.त्या जाळासाठी म्हणून ते इकडे आले होते हाच एक संयोग माझ्यासाठी प्राणदाता ठरला होता.त्यांनी बाजूच्या झाडीतून त्यांचा जाळ व इतर सामान घेतले आणि आम्ही सगळे घोडाझरीच्या पहिल्या खोऱ्याकडे निघू लागलो.

दरवर्षीच्या मानाने यंदा पाऊस जरा जास्तच पडला होता.तलावाचा जितका परिसर असतो यावेळी अतीवर्षामुळे तो परिसर भरून जंगलात पाणी लोटला होता.कित्येक झाडाच्या बुंध्याशी त्या सापासारख्या लाटा येऊन आपटत होत्या.किनाऱ्यावर बसुन सागरासारखा आनंद मी त्या लाटांकडून घेत होतो.खळखळ वाहणाऱ्या त्या लाटा वाऱ्यासवे धमाल बागडत होत्या.समोर पाच ते दहा मिटरवर एक बेलाचा झाड होता.पाण्यातून हळुवार पाय टाकत मी त्या झाडापाशी गेलो.

जंगलात असलेलं कोरंबी हे गाव दिसत नव्हतं पण घोडाझरीच्या तलावाचा दुसरा खोर अगदी जवळच दिसून येत होता.त्याबरोबरच शिव टेंपल डोंगराचा काही भाग आणि सगळयात मुख्य म्हणजे भावाच्या डोंगराचा शेवटचा टप्पा अगदी स्पष्टपणे दिसत होता.बाकी नजरेला पुरत नव्हता इतका पसरलेला होता तो घोडाझरी तलाव.पंचेचाळीस क्युसेस याची जलाशय क्षमता दाखविली होती पण दरवेळेस ती वाढतच असते.आजच्या प्रवासाच्या दरम्यान घोडाझरीचे खोर पार करून मी भावाच्या डोंगरीच्या शेवटच्या टप्प्यावर जाईन

असे मला वाटले होते.पण हा प्रवास एकट्यासाठी कधीच संभव नव्हता.हे नुकत्याच झाल्या काही घटनांवरून तर आत्ता बघितलेल्या अंतरावरून मला कळत होतं.कारण घोडाझरीच्या खोराने जरी का मी जायचं ठरवलं असतं तरी वाघ,अस्वल,रानडुकरे अशा हिंस्त्र शवापदांचा बराच वावर होता.त्या नैसर्गिक स्थानाचे काही फोटोज् काढून मी किनाऱ्यावर आलो.

पुढे मच्छीमारी करणाऱ्या गृहस्थांनी टायर ट्यूबच्या साहाय्याने जाळ तलावात न्यायला सुरुवात केली.आणि मी त्या तरुण इसमासोबत परतीच्या प्रवासाला लागलो. परतीला जाताना मी त्याच वाटेला लागलो ज्या वाटेने मी इकडे येण्यास सुरुवात केली होती.जेव्हा त्या लग्नसराईच्या आवाजाने मी जंगलात भरकटलो होतो. तिकडे लक्ष गेली तेव्हा ती वाटच मला दिसली नाही. ज्या वाटेने मी भरकटत गेलो होतो.असे बरेचशे रस्ते चुकवत तो तरुण इसम मला नेत होता.शेवटी गप्पांच्या ओघात आम्ही जंगलाच्या बाहेर केव्हा आलो, हे मला कळलंच नाही.शिवटेंपलच्या खालच्या उतारापासून त्याची आणि माझी शेवटची भेट झाली. आणि आम्ही आपापल्या वेगवेगळया वाटांनी निघालो.

बसस्टॉपवर ट्रॅव्हल्सवर सारखे सारखे नागपूर म्हणून ओरडत होते.सायंकाळी बराच वेळपर्यंत ट्रॅफिक चालू असते. त्यामुळे मला जायचं काहीच टेंशन नव्हतं.पण जीवनाने आज ही एक अद्दल मात्र घडविली होती.घाईने कोणताच निर्णय घेऊ नये हे आज मला पुरेपूर पटले होते. ट्रॅव्हलची ये जा चालूच असते त्यामुळे सगळयात आधी मी बाजूच्याच हॉटेल्समध्ये

गेलो.चहाची ऑर्डर करून एक थंड बिसलेरी मागवली आणि पिऊ लागलो.अचानक मागाहून कुणीतरी हाक मारल्याचं ऐकायला आलं..

पवन....

"मी मागे वळून बघितलं.त्याला बघून जरा हायसं वाटलं.पण मला काही बोलू द्यायच्या आधीच परत त्यानेच विचारलं..."

"अरे पवन ...तू इथे कुठे आलास? आणि इथे असूनही मला काहीच माहिती नाही...साधं एक कॉल नाहि की मेसेजसुद्धा नाही."

"आकाश...तू इथे...अरे फार घाईघाईत मी इथे आलोय.त्यामुळे मला तुला सांगायला वेळ मिळालाच नाही. अँनिवे बराच झाला तू भेटलास ते...कारण आता काही वेळात मी निघणारच होतो."

"काय म्हणालास..? तू निघणार आहेस.काय गम्मत करत आहेस का माझी?"

" माझ्याकडे बघून वाटते तरी का आकाश.मी तुझ्याशी कधी गम्मत करेन म्हणून."

एव्हाना चेहऱ्यावरचे ते अनाकलनीय भाव बघून त्यालाही माझ्याबद्दल उत्सुकता जाणवली होती.पण शेवटी त्याच्याच आधाराने का होईना मला राहण्यास भाग पडले.मैत्रीचा एक नवा उदाहरण त्यानेच जागृत केलं होतं.एकमेकांसोबत घरादारांशी सज्ज असणं,वेळोवेळी भेटीगाठीला तडफडणे याला तो कधीच भाव देत नव्हता.मित्र कसा आहे? त्याच्या असण्यातही तो संकटग्रस्त तर नाही.अशा बऱ्याच पद्धतीने तो बघायचा.गरजेला प्रत्येक मित्राचा पाठींबा असते.पण या मित्राचा नेहमी पुढाकारच होता.ज्याने सुरुवात केली होती माझ्यासोबत, शेवटी त्यालाच मी कसा काय विसरलो होतो? कळतच नव्हते.हा तोच मित्र आहे ज्याने पहिल्यांदा मला नागभिड मध्ये बोलावणे केले होते.ज्याने विदर्भातली माया मला लावली होती.वडीलांसारखा मला न्यायला बसस्टॉपवर आला होता.तोच तो आकाश.

मला वाटते नागभिडवरून घरी जाईपर्यंत तरी आकाशसोबत मी काहीच बोललो नसेल.आणि हे सुद्धा कदाचित तो जाणून असेल.त्यामुळे शक्यतोच तो मला हाक मारायचा.त्या दिवशी नेहमीसारखाच जेवण झाल्यावर आम्ही फिरायला निघालो.हॉटेलमध्ये पान घेतला आणि थुंकत थुंकत मधल्या गल्लीने शिवमंदिराकडे आलो.रस्त्याच्या कडेला ग्रामपंचायत तर्फे दिलेले काही बाक होते.त्यावर जाऊन बसलो.मला इथे एकांतात आणण्याचे कारण मी सगळं जाणून होतो.त्यामुळे आकाशच्याच बोलण्याची वाट बघत होतो.शेवटी त्यानेच सुरुवात केली.

"ऐक पवन...कृपया रागाला येऊ नकोस...पण मला तुझ्यात फार बदल जाणवतो आहे पवन..."

"असं काही नाही आकाश...तू उगाच माझ्यावर संशय करतो आहेस."

"मी कधीच संशय करीत नाही पवन,तथ्यानुरुप बोलतो.आणि माझे तथ्य कधी खोटे होत नाही.तू नेहमी स्वतः फोन करून मला खुशहाली कळवत असायचास.तासनतास मोबाईलवर सगळी सुखदुःख रिती करत असायचास.पण जेव्हापासून तू मला भेटून गेला आहेस, तेव्हापासून एकदाही तुझं कॉल मला आलं नाही.तुला मनमोकळेपणाने हसताना सुद्धा बघितले नाही. असं काय आहे? जे तू माझ्यासोबत लपवत आहेस पवन."

"अरे असं काही नाही आकाश...तू उगाच आपलं काहीही नको समजू...इतक्यात जरा कामाचं डिप्रेशन होतं त्यामुळे मी तुला वेळ देऊ शकलो नाही.बस इतकेच."

"माझ्या नजरेला नजर देऊन सांग पवन.हे सगळं खरं आहे.कारण खरं बोलताना नजर कधीच लपत नाही.हे बघ जर का तू मला एक जिवलग मित्र मानत असशील तरच सांगशील.अन्यथा मी फोर्स करणार नाही.याउलट कधी विचारणार देखील नाही."

"काही वेळ शांतता होतीच.पण माझी नजर त्याच्या नजरेचा प्रतिकार सहन करत नव्हती.शेवटी ती मैत्री होती.पण झालेल्या गोष्टी नाकारता येत नव्हत्या.त्यामुळे डोळे केव्हा पाणावले काही कळलंच नाही.आणि त्यातच आकाशाचा मायेचा हात माझ्या खांद्यावर पडला...अत्यंत मृदू स्वरात तो म्हणाला..."

"काय झालं पवन...मलाही नाही सांगणार...या मैत्रीला इतकं कमजोर समजतोस तू?"

"तीच तर भीती आहे आकाश.मित्र मैत्रीचे उदाहरण प्रात्यक्षिक करून निघून जातात.आणि मी मात्र काहीच करू शकत नाही.मला परत कुण्या मित्राला नाही गमवायचं आकाश.जिवंत चार उदाहरण अजूनही डोळ्यासमोर आहेत.त्यात पुन्हा एक भर...नको रे बाबा..."

" मित्र जीव देण्याइतपत जर खरा असेल ना तर मीच काय? कुणीही देईल पवन.आणि जे घडतं ते सगळं घडण्यासाठी घडत असतं,त्यात आपण काहीच अडवणूक करू शकत नाही.त्यामुळे तू आधी शांत हो...आणि सगळं मला सांग."

" परत एकदा आकाशला मी पंढरपूरपासून ते पेरजागडचा आजपर्यंतचा प्रवास कथन केला.त्यांच्यासारखेच इतर मित्रांनी मैत्रीसाठी कसं जीव दिलाय हे पण सांगितले.आणि अजून तरी मला पुन्हा काय करायचे आहे हे पण

सांगितले.हे सगळं ऐकून झाल्यावर आकाश अवाकच झाला.आणि म्हणाला..."

"आता तुला साथ द्यायची जबाबदारी माझी पवन.इतरांनी दिलेल्या उदाहरणात मग मीच कशाला मागे राहू पवन.मग ठरलं तर...तुझ्या पावलासोबत एक पाऊल आता माझा पण असेल."

आधी आढेवेढे घेत मी त्याला होकार दिला.आणि दोघेही मग घराकडे परतलो.शिवाय आज झालेल्या प्रवासामुळे बऱ्याच प्रमाणात थकवापण अंगात जाणवू लागला होता.त्यामुळे निद्राधीन व्हायला आज अधिक वेळ लागला नव्हता.

सकाळची ट्रॅव्हल्स पकडुन शहराकडे रवाना झालो. खरंतर त्याही दिवशी आकाश मागे लागलाच होता पण पुढच्या तयारीसाठी मला अजून सावध व्हायला' वेळेची कमतरता नको हे सगळं तो जाणून होता.पण त्याने असं एकटं त्याला न सोडून जाण्याचे वचनही मागून घेतले होते.आयुष्यात पैसा,प्रसिद्धी मी जरी कमावलो नसेल तरी जीवाला जीव देणारे मित्र मात्र भरपूर कमवले.आता फक्त वाट होती त्या नवीन प्रवासाची.

## २७.आयुष्यात पुन्हा एकदा मैत्रीचे आगमन...

जवळपास दोन ते तीन तासांचा प्रवास केल्यावर घरी पोहोचलो.मी आल्याची वार्ता रितुला कळताच ती गंधाळत आली.मी तेव्हाही ती तिला कधीच समजू शकलो नाही.आपला प्रिय व्यक्ती जेव्हा कालावधीने डोळयांच्या समोर येतो.आणि त्याला बघताच सुखावलेल्या डोळयांवर पाऊस पडायचा सुरू होतो.स्पंदन सेकंदाला वाजू लागतात.आणि हृदय जोरजोराने धकधक करू लागतं.हे तिच्या बाजूने अक्षरशः वाटायचे.तिच्या भाषेत सांगायचंच राहिलं तर दर वेळेस मी तिच्या समोर जीवन मृत्यूचा संघर्ष करून येत होतो. तिचं हे माझ्यासाठी तडफडणें अगदी सराहनिय होते.कारण ती तसं वेडे प्रेम करत होती माझ्यावर.पण तिचे असे तडफडणे मला तिच्यासमोर यायला बऱ्याचदा घाबरं करून जायचा.समोर माझं मृत्यू आहे की नाही हे मला माहीत नाही, पण माझ्यासाठी मात्र तिचा जिवंत मृत्यू सारखा दिसत होता.

हे सगळं अव्हेरण्याचा देखील मी खूप प्रयत्न केला.तिला नाकारलं,कित्येकदा उलट सुलट बोललो असेल.कदाचित तिच्यापासून दुरावून ती मला विसरेल असेही मला वाटत होतं.पण मी जितकं तिच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करत होतो. तितकं ती माझ्या जवळ येत होती. तितकंच तिचं

ऋणानुबंध मजबूत होत होतं.ज्या वेळेस पेरजागडावर तिने माझा हात खेचत नेले होते, त्याच वेळेस मला कळून आलं होतं, की एखादी मुलगी मनापासून ज्याला वरते, ती त्यासाठी अलगद काहीही करण्याची तयारी ठेवते.आणि हे सगळे मी रितूच्या रुपात स्वतः अनुभवत होतो.

रितू आली, आणि बाजूलाच बसली.तिचा आनंद बोलण्यापेक्षा मला बघण्यात जास्त आहे हे मी जाणून घेत होतो.त्यामुळे जरासा फ्रेश होऊन मी पुन्हा मोबाईल हाताळत बसलो. रितूचा माझ्याकडे बघण्याचा क्रम मात्र चुकत नव्हता.तिच्या नजरेत मला सारखा नावीन्य दिसायचा.नेहमीसारखी काही वेळ शांततेच्या अधीन झाल्यावर तिने मला विचारलं...

"काय झालं पवन? काल रात्री पण तू परतला नाहीस?"

"काही नाही जरा प्रवासाने दमलोय..."

पण इतक्यात घडलेल्या त्या काही गोष्टींमुळे रितू माझ्यावर बारकाईने नजर ठेवू लागली होती, हे मला कुठे माहीत होतं.शिवाय बालपणापासून ती माझ्या प्रत्येक गोष्टींशी जागरूक होती.त्यामुळे मी तिच्यापासून काही लपवावे म्हटले तरी काहीच लपवू शकत नव्हतो.त्यामुळे नागभिडला जे काही घडले ते निवांतपणे सांगू लागलो.पण यावेळेस रितू घाबरली नाही.उलट खंबीरपणे आधार देत मला म्हणाली....

"पवन तू घाबरु नकोस.एक वाट चुकीची असेल म्हणून निराश होऊ नकोस.होऊ शकते त्याचा मार्ग कुठून दुसरीकडून असेल.घाई करू नकोस.जरा धीराने घे.पुन्हा नव्याने सुरुवात कर."

रितू गेल्यानंतरही विचारांच्या तंद्रीत मी कितीवेळ होतो, देव जाणे! फक्त रितू जाण्यापूर्वी तिचा काळजी घे हा आवाज तितका पुसटसा लक्षात होता.आणि केव्हा झोपेच्या स्वाधीन झालो ते सुद्धा नाही उमगले.जेव्हा झोपेतून जाग आली तेव्हा दुपारचे साडेतीन वाजून गेले होते.मोबाईलवर आकाशचे बरेचसे मिसकॉल दिसले.कदाचित काही अर्जंट असेल म्हणून मी परत आकाशला फोन लावला.

"हा...बोल ना आकाश.."

"अरे वेड्या...तुला आज नकोच जायला होतं.मी कितीदा म्हटलं,पण तू ऐकलं नाहीस."

"अरे पण झालं काय?"

"अरे तुझ्यासाठी फार महत्त्वाचे आहे.आपल्याला एके ठिकाणी जायचे आहे.ते असं फोनवर सांगता येणार नाही.फार पारंपरिक आणि जुन्या चालीरीती आहेत.तू सायंकाळच्या ट्रॅव्हल्सने नागभिडपर्यंत ये.मी तुला न्यायला येतोय."

"ठीक आहे निघतो मी, तसं कॉल करेन..."

इतक्या घाईने बोलावण्याचा कारण, मला पण न कळल्यामुळे फोन ठेवताच मी पण तयारी केली.अगदी सांगितल्याप्रमाणे सायंकाळी आकाश मला न्यायला आलाच होता. फारशा गप्पा न करता आम्ही गावाकडे निघालो.

आज गावामध्ये बऱ्याच प्रमाणात चंगळ मंगळ वाटली.दोन्ही वेळेस जेव्हा मी गावात आलो होतो तेव्हा गाव मला बराच शांत वाटला होता.पण आज गावकरी घोळक्याने बसून होते.स्त्रिया सजून थाटून आरतीची थाळी घेऊन. मातामायच्या देवळात जाऊन पूजाअर्चना करत होत्या. मातामायचं मंदिर आकाशच्या घरासमोरच होतं, त्यामुळे स्त्रियांची ती प्रचंड गर्दी अगदी घरूनच दिसत होती. आतमधून कुरोड्या, पापडांचा तेलात तळण्याचा आवाज येत होता.त्यामुळे काही सण असल्यासारखे मला वाटत होते.मी आकाशला विचारले..काही उत्सव आहे का गावात?

"अरे हा काही साधासुधा उत्सव नाही.प्रथेनुसार केलेला उत्सव आहे.आज पड्या आहे."

"पड्या म्हणजे...?"

"सर्व शेतीकामाला सुट्टी..."

" मला पटेल असं सांग..."

हे बघ पूर्वी वरूनदेवाच्या आगमनासाठी यज्ञ,पूजा अर्चना केली जायची.पण एखादे वर्षी पाऊस जास्त पडला की माणूस विसरून पण जायचा.मग गावात असणारी मातामाय,शिवेवर असणारी एकोरी माय यांना सांगड घातल्याशिवाय जमायचे नाही.दुष्काळाने जेव्हा बऱ्याच लोकांचे हाल हाल होऊ लागले तेव्हा काही जुनाट बुजुर्ग मंडळीनी मातामायला सांगड घातली.ऐपतीप्रमाणे आखत घेऊन जवराबोडी इथल्या मुख्ख्य दैवत्वाला वाहिली.आणि तिथली रक्षासामग्री घेऊन ते तिर्थानुरूप गावात वाटले.काहींनी पिकांवर फवारणी केली."पाणी येऊ दे वं माय"...अशा गर्जंत करत डोक्यावर कडुलिंब घातलेली  घागर घेऊन ग्रामीण देवतांना पूजतात.आज तीच पूजा चाललीय.

सगळा गाव हा दिवस पाळतो.कुणीही शेतावर जात नाही.आता जी आखत जमा होईल ती सगळी मुख्य दैवत्वाजवळ नेली जाईल.त्या निमित्ताने का होईना आपण उद्या आंबाई निंबाईला जाऊयात.

" मला एक सांग आकाश? ह्या पूजा अर्चना ठीक आहेत.मग त्यात बळी का देतात? त्याचं तर काही महत्त्व नाही ना!!!"

पवन..अरे कुठल्या जगात वावरतो आहेस.मास तर माणसाचा पूर्वीपासूनचा आहार आहे.फक्त प्रश्न येतो तो कुणाच्या श्रद्धेने वाहण्याचा.पूर्वी

कसं मोजकी लोक असायची.आपुलकीची,प्रेम आणि जिव्हाळयाची असायची.एखाद्या श्रद्धिकला जेव्हा मास खायची इच्छा व्हायची तेव्हा ग्रामीण देवतेला तेही तो वाहायचा.आणि वाहणाऱ्याची वस्तू नाही तर श्रद्धा बघितली जाते.मग जे कापले आहे कोंबडा किंवा बकरा तेव्हा त्याचे समान वाटप व्हायचे.आणि हो तो इच्छेनुसार दिला जातो.मग माणसात भेदभाव आले.की कुणाला श्रद्धा दिसते तर कुणाला अंधश्रद्धा दिसते. बरं चल आई जेवायला बोलवत आहे.गप्पा पुन्हा कधी नंतर करता येईल.

दुसऱ्या दिवशी आम्ही आंबाई निंबाईकडे जाण्यास निघालो. घोळपाकच्या कोपऱ्यापासून सरळ आलेली डोंगररांग कानपाकडे येते.हे स्थळ कोपऱ्यात असल्या कारणाने कानपावरून फेरा मारून जावावे लागते.शेवटी दहेगाव पार केल्यावर डोंगराची ती विहंगम प्रतिमा हळू हळू डोळयात साकारू लागली.

डोंगररांगेच्या मध्यस्थी भागात दगडांचा एक उंचच उंच मनोरा दिसू लागला.आणि बाजूलाच एक तलाव पसरलेला होता.प्रकृतीच्या पायथ्याशी हे स्थान म्हणजे अगदीच सराहणीय आणि प्रेक्षणीय होते.मात्र या गडाची सुधारणा फार चांगल्या पद्धतीने होती.कदाचित इथल्या ट्रस्टचा भरी भक्कम प्रतिसाद असावा.अगदी पायथ्यापर्यंत डोंगराचा रस्ता आणि पायथ्याशी निवाऱ्याची बरीच सोय होती.आकाश सांगू लागला की दत्त जयंतीला इथे फार मोठ्या प्रमाणात यात्रा भरते.तुडूंब गर्दी दाटलेली असते.शिवाय इथल्या काही स्वयंभू

गुंफा आहेत ज्यात हे दैवत बसले आहे. आधी सापांचा पण भारी प्रमाणात शिरकाव असायचा. असं त्याच्या ओठात आलं आणि मी त्यांना विचारलं....

"सापांचं शिरकाव म्हणजे इथे कसं रे?"

अरे मीच काय? पूर्वीपासूनचा इतिहास इथे सापांवरच खिळतोय.पूर्वीचे लोक गावांचं नाव एक विशिष्ठ पद्धतीने ठेवायचे.आता नागभिडचंच घेऊया. नागभिड - नाग- बिळ- भीड (गर्दी) अशा अर्थी असू शकतो.या डोंगररांगेला फार प्रमाणात गुंफा आहेत.आणि बऱ्याच प्रमाणात सगळयांचं म्हणणं आहे की इथे आधी खूप मोठे भुजंग असायचे.ज्याबद्दल एक स्थळ दाखवेन तुला.पण आता चल...परत पण जायचं आहे सायंकाळ व्हायच्या अगोदर.

" अरे हो चल ना....!"

गेटपाशी एक नंदीची मूर्ती होती.मी आकाशकडे बघत होतो.नंदीच्या पाया पडत गेटवरील घंटी त्याने वाजवली.आणि प्रथम पायरीला मस्तक टेकवत चालू लागला. खरंतर माझी भक्ती हात जोडण्याईतपतच सीमित होती.पाया पडण्याचा कधी प्रश्नच आला नाही.पण आकाशची कॉपीराइट करत मीही पाया पडत चालू लागलो.दगडांना धरून काही वीस ते पंचवीस पायऱ्या बांधलेल्या होत्या.पण त्यानंतर वरचढ रस्ता होता. पेरजागडासारखी लांब उंची नव्हती पण पायथ्यापर्यंत जाईपर्यंत चेहरा पाणी शिंपडण्या इतपत घामाने भिजलेला होता.दोन्ही हाताच्या दंडाने घाम पुसत मी बाजूच्याच झाडाच्या सावलीत

जाऊन बसलो.उतरणीच्या रस्त्याकडे बघत आपण किती वर चढलोय? याची अनुभूती घेत होतो. पेरजागडासारखी उंच चढाई नसली तरी पायथ्यापर्यंत येणारा उंचवठा छातीत दम भरून घेत होता.

थोडं विसावा घेतल्यावर पुढे त्या दगडांच्या भिंतीतून आत जाण्यासाठी एक द्वार दिसले.जिथपर्यंत चढण्यासाठी तीन ते पाच अजून दगडाच्या शिढ्या होत्या.ज्या निरूंद होत्या.

बाहेरून बघायला गेलं तर ती फार मोठी गुंफा असल्यासारखी वाटत होती.दगडांमध्ये भयाण दिसत होती.गडावर बऱ्याचदा एकांत ती गुंफा जंगली जनावरांचे वावर घेत असे.मला ती दुरूनच इतकी भयाण वाटत होती की आतमध्ये जायला थोडी भितीच वाटत होती.दगडांच्या त्या कोपऱ्यावर उंच शिळेच्या आतून एक स्रोत होता. त्याचं एक वैशिष्ट्य म्हणजे ते अगदीच थेंब थेंब असा पडायचा.बुजुर्ग मंडळींची काही विधाने माझ्या मनात आली आणि म्हणालो....

"अरे आकाश या गडाविषयी तुझ्या माहितीत काही दंतकथा नाहीत का?"

"आहेत ना! हे बघ आंबाई निंबाई या दोन बहिणींचं हे श्रद्धास्थान आहे.इथली एक म्हण आहे.एक ओवी असल्यासारखी.तिचा उल्लेख केल्यावर

या कोरड्या पाषाणातूनही एकतरी पाण्याचा थेंब हातावर पडतो.तुला बघायचं आहे का?"

"अर्थातच.तेच तर बघण्यासाठी आलो आहे ना इथे मी..."

"तर त्या दगडांशी ओंजळ कर आणि माझ्या मागोमाग मी म्हणेन तसं म्हण..."

"मी हाताची ओंजळ करत दगडांच्या पायथ्याशी टेकवले.आणि आकाशने सांगितल्यानुसार मी म्हणू लागलो."

"आंबाई निंबाई गोवरदेव
वरच्या शेंडीवर महादेव!!"

ओवीचा उल्लेख होताच तो कोरडा पाषाण पान्हाळला.आणि नकळत त्यातून दोन ते तीन थेंब ओंजळीत सामावली.ओंजळीत पडलेल्या त्या थेंबांना बघून मी आश्चर्यचकित झालो.म्हटलं चमत्कारच आहे यार...!!!

हे आजतागायत असलेलं सत्व आहे बरं पवन? यात ऋतुमानाचा वगैरे काहीएक अंतर नाही.तू जरी का भर उन्हाळयात येशील, तरी हे थेंब नक्कीच तुझ्या ओंजळीत पडतील. बरं चल आत गुंफेत जाऊया.

# २८.भ्रमंती....

मी आकाशच्या मागोमाग जाऊ लागलो.जसजशी गुंफेची पायरी चढत होतो. आतमधला गर्द अंधार पुसट पुसट डोळ्यात साठवू लागला.कसं आहे?आपण जेव्हा उजेडात असतो ना दारातून घरातलं सगळं काही अंधारच वाटते.पण आपण जसजसं दाराच्या आत पाऊल टाकतो तेव्हा सगळं काही वेळाने स्पष्ट होत जाते.गुंफेत वावरायला फार कमी जागा होती.अगदी गुंफेच्या तोंडाशी येता एक दाराशी असलेली घंटी समोर होती.आकाशने तिला वाजवताच गुंफेमध्ये बरीच हालचाल चालू झाली.ती हालचाल होती वटवाघळांची.आतमध्ये वटवाघळे कळपाने होते.आणि ते सारखे आतबाहेर येरझारा मारत होते.त्यामुळे कानांशी त्यांचा आवाज, शिवाय त्यांचा समोरून मागाहून येणे जाणे थोडं फार भयानक वाटत होतं.

गुंफेच्या आत जाताच उजव्या बाजूला काही चित्रफीत दिसल्या.आणि काही दगडांच्या मुर्त्या दिसल्या.आकाश माझ्याकडे बघून हसत होता.मी त्याला म्हटलं...

"अरे असं काय हसत आहेस?"

"अरे याच त्या बहिणी!! आंबाई- निंबाई.इथे या जंगलात या गुंफेत त्यांचा वावर होता.त्यांच्याच श्रद्धेने आज इथलं सत्व कायम आहे."

त्यांच्या दगडांत उमटलेल्या छवीकडे बघत मी पुन्हा हात जोडले.

"जर या दोन बहिणी इथे आहेत तर मग सातही बहिणी कुठल्या ना कुठल्या गडावर असतीलच."

"अर्थातच...मला मिळालेल्या माहितीप्रमाणे पूर्वी या सातही बहिणी एकत्र राहायच्या.त्या सात्विक असल्या कारणाने आणि या संपूर्ण पेरजागडाचा परिसर माहित असल्यामुळे त्या केव्हाही आणि कुठेही जायच्या.बऱ्याच जणांचं म्हणणं होतं की त्यांचं वास्तव्य सगळयात जास्त त्याच गडावर असायचं.म्हणून त्याला सात बहिणीचे नाव देण्यात आलं.पण नंतर प्रत्येक बहिणीस वाटू लागलं की आपला स्वतंत्र घर हवाय.त्यांच्यात ज्येष्ठ असलेल्या बहिणींशी तशी त्यांनी सांगड घातली.आणि तसेपण वाढत्या माणसाच्या वास्तव्याने त्या बऱ्याच जणांच्या चर्चेत पण येत होत्या.आणि त्यांना परत माणसांत जायचे नव्हते.प्रचंड वाद त्या दिवशी बहिणींच्या आपापसात झाला.आणि प्रत्येकी आपापल्या वाटेनी निघून गेल्या.त्यातल्या आंबाई निंबाई या सगळयात लहान बहिणी होत्या.त्यांच्या इथल्या वास्तव्याने या गडाला त्यांचंच नाव देण्यात आलं.पण काही बहिणींचा निवास व वास्तव्य अजूनही सापडलेले नाही.त्यातील फक्त एक मुक्ताई सोडून."

"म्हणजे तुला त्या सगळ्या बहिणींची नावे पण माहीत असतील ना."

"हो ना...१. आंबाई २. निंबाई ३.उमाई ४.गौराई ५.मुक्ताई ६. पवराई ७.भिवराई...अशा या सात बहिणी आहेत.पण सांगितल्याप्रमाणे इतर बहिणींचा वास कुठे आहे हे अजूनही ज्ञात नाही."

"असं काय? बरं अजून काय बघायचे आहे?"

अरे विषयात ओघळता मूळ मुद्दाच विसरलो आपण.या गुंफेचं आणखी एक वैशिष्ट्य आहे.या गुंफेच्या तळाशी एक पाण्याचा जलस्त्रोत आहे.तो कधीही आटत नाही वा कधीच कमी होत नाही.अगदी बारमाही असतो.बरेचसे श्रद्धाळू त्या पाण्याचा वापर श्रद्धानुरुप करतात.उन्हाळयात ज्या जनावरांना ते जलस्त्रोत माहित असते ते बरेच जनावरे या गुंफेत येतात.चल तुला दाखवतो.

मी आकाशच्या मागोमाग जाऊ लागलो.समोर अतिशय निरुंद गुंफा होत गेली होती.आणि शिवाय काळोखही वाढू लागला होता. चमगादडांचा आवाज सारखा सारखा येत होता.कारण आजूबाजूला बऱ्याच प्रमाणात त्यांचा पेहराव होता.आम्ही जसजसे आत जात होतो.तसतशी ती उडून आत जात होती.आणि सारखं गुंफेच्या आत बाहेर भरारी मारत होती.बऱ्याच प्रमाणात त्यांची विष्ठा गुंफेत इतस्ततः पसरली होती.ज्यामुळे त्या गुंफेला असे भयाण रूप मिळत होते.

जवळपास पाच ते सात मीटर आत गेल्यावर एक छोटासा द्वार दिसला.जिथून पुढे पाणी असण्याची दाट शक्यता होती.आमचा दोघांचा वावर तिथे अशक्य होता.त्यामुळे आकाश माघारी वळला.आणि मोबाईलची टॉर्च माझ्याकडे देत मला सामोरी जायला सांगितले.

टॉर्चला सामोरी करत मी त्या द्वाराच्या आत प्रवेश केला.समोर असं काहीच दिसत नव्हतं.त्यामुळे मी टॉर्च खाली फिरविली.तळाशी पांढरट असं स्वच्छ पाणी दिसत होतं. गुंफेच्या ते इतक्या आत असूनही बऱ्याच तळाशी होतं.ज्यामुळे ते पाणी घ्यायला बरंच वाकावे लागायचे.पण ते पाणी पिण्यायोग्य नव्हतं.कारण चमगादडांच्या वास्तव्याने त्यांच्या विष्ठेची घाण तिथे असते.

आकाश म्हणाला...हे एक श्रद्धास्थान आहे पवन. इथलं पाणी बरेच श्रद्धिक लोक तीर्थरूपी म्हणून वापरतात.या गडाचं आणखी एक वैशिष्ट्य आहे पवन.सुरुवातीला ऐकून मीपण थोडा खचलो होतो पण जे नैसर्गिक आहे.त्याला आपण बदलू शकत नाही.म्हणून मी गप्प बसलो.हळूहळू मी मग गुंफेच्या बाहेर आकाशच्या मागोमाग उतरू लागलो.

गुंफेतून उतरल्यावर उजव्या बाजूलाच एक अरुंदशी पाऊलवाट होती.जी जंगलाच्या आतमधुन उंच डोंगरावर जात होती.रस्त्यावर सागवानाचे उंचच इंच वृक्ष फुलांनी बहरलेले होते. थोडं अंतर पार केल्यावर दगडांच्या कप्प्या दिसू लागल्या.जिथे एका दगडावर आकाश उभा राहून कोपऱ्यात बोट दाखवत होता.

एक साप हळूहळू त्या दगडांमध्ये आत जात होता.ज्याच्या शेपटीकडील काही भाग थोडा थोडा दिसत होता.काही वेळाने तो साप दिसेनासा झाला.त्याच्या शेपटीकडील भाग जेव्हा इतका मोठा होता तर तो असेल किती मोठा? मी एक प्रश्नार्थक मुद्रा आकाशकडे केली.माझे भाव त्याला कळले आणि तो सांगू लागला की ...ती एक "चिटिण" आहे.( चिटिण म्हणजे अजगर.विदर्भात अजगरासाठी प्रचलित असलेला शब्द.)

फार वर्षापूर्वी इथे एक गुंफा होती.ज्यात एक विशालकाय भुजंग राहायचा.ज्याला गावकरी "चिटिण" म्हणायचे.आणि ती गुंफा चिटिण गुंफा म्हणून ओळखली जायची.तो विशालकाय भुजंग फार कमी लोकांनी बघितलं आहे.जे आतापर्यंत हयातही नसतील.काही लोक हिम्मत करून त्या गुंफेच्या बऱ्याच आत पण जायचे.यात कुणाच्या जीवाला धोका होऊ नये आणि परत कुणी गुंफेत जाऊ नये, म्हणून ट्रस्टच्या काही सदस्यांनी ही गुंफा काही दगडे टाकून बंद केली.

मी काही वेळ त्या गुंफेकडे बघत राहिलो.त्या गुंफेचे काही छिद्र अजूनही उघडेच होते.काही वेळाने तिथून निघून मग आम्ही गडावर निघालो.सध्या पावसाळी दिवसाचे वाढत्या झुडपांनी कुणी गडावर चढत नाही.त्यामुळे त्या अरुंद पाऊलवाटेला जागोजागी झुडूपांचे अडथळे येत होते.त्या झुडूपांना पार करत आम्ही उंच माथ्यावर आलो.पूर्वीपेक्षा मानवी हस्तक्षेपामुळे जंगल फार तुटक झाले होते.त्यामुळे दूरपर्यंतचा सपाट परिसर डोळ्यांना दिसत होता.आणि

इकडे कानपा पर्यंतचा परिसर दिसत होता.डाव्या बाजूला सूर्यप्रकाशामुळे जातेपुर मधील तलाव थोडासा दिसत होता.पण सगळयात अप्रतिम वाटत होतं ते पर्वतरांग' कारण हाईवे वरून जाताना कानपा ते नवतळापर्यंत असणारी पर्वतरांग ती सरळ नव्हती.तिचे मध्यंतरी बरेच तुकडे होऊन पडले होते.ज्यामुळे चढ उतार आणि तुटक अशी बरीचशी बाजू होती.शिवाय बऱ्याचशा जागेवरून दरडसुद्धा कोसळली होती.ज्यामुळे कित्येक गुंफाची निर्मिती झाली होती.

डोळ्यांना प्रकृतीचे सुख अनुभवत आम्ही समोर चालत होतो.समोर एका मंदिराचे बांधकाम झाले होते.ज्यात शिवशंकराची स्थापना होती.आणि बाजूलाच लहान आणि मोठे दोन नंदी येऊन बसले होते.ट्रस्टच्या अधिकाऱ्यांनीच त्याची निर्मिती केली होती.पुढे एका झाडाखाली शेषनागावर स्थित श्रीविष्णूची पण प्रतिमा उभारली होती.निसर्गाची रचना पण काय छान असते.श्री विष्णूच्या प्रतीमेसमोर एक नागमोडी वृक्ष उभा होता.मुळापासून वर निघून परत जमिनीच्या जवळ येऊन परत आकाशात उंच गेला.त्याची प्रतिमा अगदी एखाद्या नागासारखी वाटत होती.आणि बाजूलाच एक सुरुंग होता.तो नेमका कशाचा होता,माहिती नाही.पण रोजच्या वावराने आजूबाजूला पाऊलवाट जरा स्पष्ट दिसत होती.मग समोर काहीच नाही असं आकाशने म्हणताच मी माघारी वळलो.

इतक्या कडेला या दोन बहिणी येऊन राहू शकतात. असं मला कधीच वाटलं नव्हतं.पण जितके तुकडे या पर्वत रांगेचे होते.त्याच तुकड्यांमध्ये त्यांचे

अस्तित्व असू शकते' असा माझा अंदाज होता.त्यामुळे नकळतच मनात विचारांचा ओघळ चघळत मी आणि आकाश पायथ्याशी आलो.

"तू फार उत्तम स्थळ दाखवलंस आकाश! आणि माहिती पण छान दिलीस."

"इट्स मी प्लेझर."(ओठंवर मिश्किल हास्य आणत.)

"अरे बरंच काही असतं सभोवती,पण आपण त्याकडे लक्ष देत नाही हा आपला गुन्हा असतो.जसं वर्षावर्षांनी माणूस बदलतो तसं गडपण बदलतो. माणसासारखंच त्यालाही मन आहे,त्यालाही जीव आहे. त्यांचंही आयुष्य आहे.तुला हाकामारी आठवते का?"

"अरे कोण हाकामारी,मी तर पहिल्यांदाच नाव ऐकतो आहे."

" तू पहिल्यांदा हे नाव ऐकतो आहेस आणि मी जे नाव फार प्रमाणात विसरण्याचा प्रयत्न करतो आहे."

"का बरं असं?"

"अरे माझ्या बुजुर्ग मंडळींचा फार परिचित असलेला प्रदेश आहे हा.त्यांचे बरेच अनुभव अगदी लहान असतानापासून ऐकतो आहे.आता आता कुठे त्या गोष्टी लुप्त व्हायला लागल्या आहेत."

" मला जरा सविस्तर सांगशील काय? काय प्रसंग होते ते?"

सविस्तर असं काहीही नाही रे.आजोबा म्हणायचे की तो एक चेटक प्रकार आहे म्हणून,पूर्वी एक रुपयाच्या मजुरीसाठी  बारा गावच्या शिवारांना तुडवावे लागायचं.इथे खैरीचा माणूस असला तरी कोरंबीसारख्या जंगलात जावं लागायचं.त्यावेळेस आजूबाजूच्या बऱ्याच महिला सरपण गोळा करायला जंगलात जायच्या.जंगलात गेल्यावर कसं आहे? वाळलेल्या काटकीसाठी एक एक महिला अंतरा अंतरावर जायची.आपण एकटेच आलो नाही ना या अंतरावर म्हणून मग एकमेकांस हाक मारायच्या.तर अशाच पद्धतीची ती हाकामारी होती.

पूर्वी शासनाची काहीही अंमलबजावणी नव्हती या जंगलावर.ज्यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून  शिकारी यायचे.वाघाची सुद्धा हिम्मत होत नसे एखाद्या शेळीला खाण्यासाठी.रस्ते न रस्ते,पायवाटा अशा रमलेल्या असायच्या.पण शेवटी भीती ती भीतीच असायची.अशा वेळेस ही हाकामारी साद द्यायची.तिचा संकेत ज्याला कळाला तोच साक्षीदार,अन्यथा स्वतःचा स्वतःच जिम्मेदार.

तिचा आवाज ऐकणारे आजही बुजुर्ग अस्तित्वात असतील.पण तिला बघितल्याचे मात्र कुणाच्याही अनुभवात नाही.तिचं बोलणं म्हणजे ती बरोबर असल्याचा साद होता. धान कांडलेस का? भाजी रांधली का? फक्त तिचा हा आवाज.काहीजण तिच्या आवाजाला घाबरायचे सुद्धा, म्हणून तिचे नाव बऱ्याच लोकांनी हाकामारी असे ठेवले होते.

"अच्छा...पण या हाकामारीबद्दल आत्ता कळणार कसे? म्हणजे कुणी तिला बघितलं पण नाही म्हणतेस."

"अरे ही त्या काळातील गोष्ट.ती फक्त माझ्या ऐकिवात आहे.म्हणून मी ती विसरण्याचा प्रयत्न करतो आहे.आणि आता सत्वच इतके नाहीसे झाले आहे, तर ती आता कुठे असणार?कारण इतक्यात हाकामारीचा असा कोणताही प्रसंग कानावर आला नाही."

"आयला अजून काय काय दडलंय या जंगलात? काहीच समजत नाही. दर वेळेला वेगळंच काही कानावर येते.आणि दर वेळेला वेगळंच काही डोळ्याला दिसते."

" अरे अवतीभोवती काय आहे? हे जाणायला आयुष्य पुरेसे होऊन जाते.त्यामुळे जे महत्त्वाचे आणि गरजेचे आहे तेच ध्यानात घेतले तर चांगले होईल. बरं चल निघुयात नाहीतर आपल्यालाच दिवस पुरेसा उरणार वाटते."

"हो....हा ....हा..."

घाईघाईने मग गड उतरू लागलो.शिवाय मला पण गावाकडे निघायचे असं वाटत होतं.पण आकाश मात्र त्या बाबतीत फार हुशार होता.मी गावाकडे निघणार हे मनोमनीच त्याने जाणले असावे.त्यामुळे माझी अख्खी वेळ त्याने इथेतिथेच घालवून नेली.

----------------------------------------------------

## २९.सात बहिणींचे अगोदरचे वास्तव्य...

पेरजागडापासून काही अंतरावरच नवतळा नावाचे एक छोटेसे गाव होते.ज्यात माना जमातीचे एक कुटुंब वास्तव्य करत असे.मोलमजुरी करणे आणि पोट भरणे हेच त्यांचं उदरनिर्वाहाचे साधन होतं.मुलाच्या हव्यासापोटी एका पाठोपाठ एक अशा सात मुली त्यांना जन्मास आल्या.आधीच्या युगात असं होतं की वारसान जपायला मुलांचं महत्त्व तितकंच जपलं जायचं. ज्याचं बळी कित्येकदा मुलगी किंवा तिची आई व्हायची.त्यामुळे समाजात काय रूप दाखवणार? जेव्हा माझा वारस नसणार, ही चिंता त्याला सतावू लागली होती.

काबाडकष्ट करायला दोन हात असायचे.आणि खायला आठ तोंड.त्यामुळे अन्नाविषयी आणि कपड्याविषयी नेहमीच घरात रडारड चालायची.त्यामुळे कुणाला काय करावे? काहीच सुचत नव्हते.अगदी छोट्या छोट्या गोष्टींसाठी वादविवाद वाढायचे.बऱ्याच वेळा असं व्हायचं, की नुसतं पाणी पिऊन झोपावं लागायचं.बऱ्याचदा बहिणींना वाटायचं की हा जन्म म्हणजेच श्राप आहे. माऊलीकडे बघत त्या कशातरी दिवस कंठू लागल्या होत्या.

पूर्वीच्या काळात मजदुरीची किंमत म्हणजे खूपच कमी होती.आज आपण लहानग्याला भेट तरी पाच ते दहा रुपयांच्या वरचे पैसे देतो.त्यावेळेस एक रुपया ही आमदनी सबंध दिवसाचं कष्ट होतं.रोजी मिळाली तर ठीक नाहीतर उपासमारीची बरीच वेळ यायची.कित्येकवेळा उपासाचे खापर सातही बहिणींच्या कपाळावर फोडले जायचे.त्यांच्या ओझं असण्याच्या कित्येक प्रसंगांना त्या पोटात डांबून ठेवत आलेल्या होत्या.नेहमी सारखेच त्यांचे वडील मजदुरीसाठी बाहेर कामाला गेले.पण त्यादिवशी दिवसभर काबाडकष्ट करूनही त्यांना आमदनी मिळाली नाही.पोटाच्या भिकेला गडमडता जरासं पीठ बाकी मिळालं. तेव्हढ्यापुरती समाधान मानून थकलेला बाप घरी आला.

"आज कितीतरी दिवसांनी पिठाचे आयते खाणार या आशेने गपचूप मायला म्हणाला..."

"आज मजुरी काही मिळाली नाही.पण सांज पुरता पीठ मिळाला आहे.त्या सातही बहिणी झोपलेल्या आहेत.त्यांना कळू न देता,याचे खमंग आयते बनव.तोपर्यंत मी उद्याच्या कामासाठी गावात फेरफटका मारून येतो."

ठीक आहे,या...म्हणत माऊली कामाला लागली.फाटक्या लुगडयाच्या चींधीला गुंडाळून,तुटक्या चुलीवर तो छिद्रे असलेला तावा मांडला.सगळ्या हांडक्यांना पुन्हा पुन्हा पालथं घालून जे काही मिळालं ते सगळं मिळवून तिने ताव्यावर पहिला आयता टाकला.त्याचा चर्रर असा आवाज

स्वयंपाकाच्या पडवीतून सातही बहिणी झोपलेल्या होत्या त्या खोलीत घुटमळला.

त्यासरशी एका बहिणीची झोपमोड झाली.तिने पडवीत नजर टाकली.सुगंध तिच्या नाकात दरवळू लागला.त्यासरशी ती उठून बसली.मधावर भिरभिरणाऱ्या त्या मधुमाशांसारखी ती पडवीत आली.डाव्या गुडघ्यावर हनुवटी ठेवून विस्तव सरकवताना माऊली तिला दिसली.त्यासरशी ती म्हणाली...

" आई काय करत आहेस?"

"आवाजाने माऊली दचकली,पण ती एकटीच आहे असं गृहीत धरून तिला म्हणाली..."

"आज बाबांना मजुरी मिळाली नाही.बदल्यात थोडंसं पीठ मिळालं आहे.त्याचेच आयते बनवतेय.त्यांना कामावर जावं लागते.तू हा आयता घे आणि गपचुप खाऊन घे.आणि कुणालाही न सांगता झोपून जा..."

"हो आई.. असं म्हणून ती बहीण तो आयता घेऊन ती इतर बहिणी झोपलेल्या होत्या तिथे गेली.नुकताच ताव्यावरून काढलेला आयता थोडा गरम होता.त्यामुळे फार वेळ ती हातात धरू शकत नव्हती.तो आयता कुठे ठेवावे तिला सुचले नाही, त्यामुळे तिने तो आयता दुसऱ्या बहिणीच्या पोटावर ठेवला."

"गरमागरम आयत्याच्या चटक्यासरशी ती दुसरी बहीण चटकन झोपेतून जागी झाली.त्या आयत्याला बघताच तिच्याही तोंडाला पाणी सुटले.ती पहीलीला म्हणाली कुठून आणलास हा आयता?"

"आई आतमध्ये बनवत आहे? पहिली बहीण म्हणाली."

" ऐकताक्षणीच दुसरी बहीण पडवीत गेली.नुकताच दुसरा आयता माऊलीने ताव्यावर ठेवला होता.ज्याच्या खमंग सुवासाने दुसरी बहीण स्वतःला आवरू शकली नाही.आणि जलदगतीने ती आत गेली."

"आई काय करत आहेस?"

"परत माऊली दुसऱ्या बहिणीकडे बघून दचकली.पण ती एकटीच आहे असं बघून ती परत म्हणाली,आज बाबांना मजुरी मिळाली नाही,बदल्यात थोडंसं पीठ मिळालं आहे.त्याचेच आयते बनवतेय.त्यांना कामावर जावं लागते.तू हा आयता घे आणि गपचुप खाऊन घे आणि परत कुणालाही न सांगता झोपून जा."

"हो आई... असं म्हणून तीही बहीण तो आयता घेऊन इतर बहिणी झोपलेल्या होत्या तिथे गेली.पहिल्या बहिणीला जसा आयता गरम असल्यामुळे

चटका लागला होता.तसाच त्याही बहिणीला हाताला तो चटका लागला.त्यासरशी तिने तो आयता तिसऱ्या बहिणीच्या पोटावर ठेवला."

गरमागरम आयत्याच्या चतक्यासरशी तिसरी बहीण चटकन झोपेतून जागी झाली.त्या आयत्याला बघताच तिच्याही तोंडाला पाणी सुटले.तिने दुसऱ्या बहिणीला कुठून आणलेस म्हणून विचारले...अशा प्रकारे सातही बहिणींनी पडवीत जाऊन सात आयते आणून खाल्ले.माऊलीने भगुल्यात बघितले.पीठ जरासाच वाचला होता.एकसुद्धा आयता होणे माऊलीला अवघड वाटत होते.ती ओशाळली आणि बापाला काय सांगावे हा प्रश्न तिच्यासमोर दाटला गेला.बाप तिच्यावर ओरडेल यात काही शंका नव्हती.त्यामुळे तिला घाबरल्यासारखे सुद्धा वाटू लागले होते.कारण ती मुलींनाही नाही म्हणू शकत नव्हती.तेव्हढ्यात तिला एक कल्पना सुचली आणि तिने चुलीतली राखड ओंजळभर चाळली आणि पिठात टाकली.

आज पोटभरून आयते खायला मिळणार, म्हणून जिभल्या चाटत,लांब लांब पावले टाकत बाप दाराशी येऊन खिळला होता.त्याने आधी खोलीत नजर टाकली.सातही बहिणी ढाराढुरर झोपल्या होत्या.म्हणजे आता त्यांचा त्रास नाही असं म्हणत थोड्याशा आनंदाने बाप माऊलीजवळ आला आणि माऊलीने आयते त्याच्या पुढ्यात केले.

आयते बघताच बापाला आता खातो की मग खातो असं झालं होतं.आणि तो एखाद्या जनावरासारखा त्यावर तुटून पडला.पहिलाच घास

घशात कोंबत आहे तेव्हढ्यात त्याला रेव लागली.त्यासरशी त्याने माऊलीकडे बघितले.माऊली बिचारी शरमली आणि घडलेली सर्व हकीकत बापाच्या पुढ्यात कथन केली आणि डोळ्यांव्दारे आसवे टिपू लागली.शेवटी नशिबाला दोष देत पुन्हा बाप उपाशीपोटी पाणी पिऊन झोपला गेला.

असे बरेचसे प्रसंग यायचे ज्यामुळे कधी बहिणीचे मन दुखायचे तर कधी वडिलांचे.पण हा एक संसारमयी वृक्ष होता यात कुणाला दोष देण्यात तर काही अर्थ नव्हता.कारण बहरलेलं ते झाड स्वतःच्याच वाकलेल्या फांद्यांना,गाळणाऱ्या पानांना,पडणाऱ्या फळांना काय म्हणू शकणार?जसं नशिबात आहे ते तर घडतंच राहणार.फक्त नशीब बदलवण्याच्या प्रयत्नांती असणे हे मात्र महत्त्वाचे आहे.

पोटभरून जेवण करणे हे त्या काळचे स्वप्न होते.आजच्या आयुष्यात मोबाईल घेतलं,कपडे घेतले,टीव्ही घेतली तरी माणूस समाधानी नसतो. इच्छांचा हिशोब काही त्याचा संपत नाही.पण त्या काळात सगळ्यात महत्त्वाचं होतं जेवण.पोट जे पाच बोटांचं मथडं असलं तरी आयुष्यभर भरत नव्हतं. त्यादिवशीचा प्रसंग वडिलांना फार महागात गेला होता.त्यामुळे त्या दिवशी त्यांना विट आला होता.सात मुलींना आता पोसणे त्याला जीवावर आल्यागत वाटत होतं.त्यामुळे प्रत्येकाने काहीतरी काम करून यावे असा त्याचा विचार होता.पण मुलींसाठी तितकंसं कामही गावात मिळेनासे होतं.

गावच्या पाटलाकडे जळणासाठी काही लाकडे लागणार होती.तितकीच एक एक पैशाची मिळकत म्हणून बापाने सातही बहिणींना जंगलात नेले. खरंतर जंगलात नेणे हा एक बहाणा होता.सातही बहिणींना जंगलात सोडून देणे असाच विचार बापाच्या डोक्यात घुटमळत होता.त्यामुळे जंगलात जाताना तो दाट खोलात जायचा आणि बहिणींच्या नजरेतून ओझळ व्हायचा.पण बहिणीही त्याच्या मागावर असायच्या.त्यामुळे वडिलांचा विचार साधण्याच्या मार्गावर नव्हता.ज्यामुळे एक फायदा असा झाला की बहिणी जंगलापासून परिचित झाल्या.कित्येक पायवाटा त्यांनी डोळयात नेमून ठेवल्या.आता वाळलेल्या काटक्यांसाठी त्याच पुढाकार घेत असत.

एके दिवशी सरपण जमा करण्यासाठी त्या जंगलात गेल्या.झरीच्या टोकावरून त्यांना येताना सायंकाळ झाली.झरीची डोंगररांग उतरली की बेलदेव आणि तिथून नवतळा असं ते पायी अंतर होतं.रोजच्या सरावानुसार सगळ्या बहिणींनी आपापल्या सरपणाच्या मोळ्या बांधल्या आणि अंधार दाटू लागल्यामुळे त्या इतस्ततः बघू लागल्या.आत्ताच्या सात बहिणीच्या गडावर त्यांना एक प्रकाश दिसत होता.तो प्रकाश त्यांना इतका दिव्य वाटला की क्षणभर त्या प्रकाशाकडे एकवटल्या.कारण इतक्या दूर अंधाराला चिरत असणारा प्रकाश हा काही साधासुधा नाही हे तेव्हा त्यांनाही उमगले होतं.त्यांना त्या प्रकाशाबद्दल बरीच उत्सुकता होती.त्यांनी बराच वेळ त्या प्रकाशाबद्दल विचार केला की तो कशाचा असेल? कोण राहत असेल?

नेहमी हसतखेळत येणाऱ्या बहिणी आज विचारमग्न होऊन होत्या.दिवस बदलत गेले.ऋतुमानानुसार जंगलही बदलत गेले.पण बहिणीच्या त्या मनातून तो प्रकाश काही जाईना.आणि पुन्हा सरपणासाठी त्यांना जंगलात सुद्धा जायला मिळाले नाही.गेले कित्येक दिवस त्या प्रकाशामुळे बेचैन होऊन घुटमळत राहिल्या.त्यांना फक्त इतकेच माहिती झालं होतं की त्या गडावर कुणी पिरबाबा असतो.त्यामुळे त्या गडाला "पिरजागड" असे म्हणतात.त्या पिरबाबाची भेट घ्यावी असा त्यांचा विचार चालू होता.त्यासाठी त्या आणखी मिळेल त्या माहिती जतन करू लागल्या होत्या.आणि त्या प्रकाशाबद्दल उत्सुक राहिल्या होत्या.

पुढे सातही मुलींच्या वास्तव्याला कंटाळलेला बाप मुलाच्या आशेपोटी थकला होता.पूर्वीच्या काळात रिटावर (राहतो ती जागा, स्वतःचं घर वगैरे) वारस असायचा.वंशावळ चालविण्यासाठी गरज होती ती वारसदाराची, त्यामुळे बुजुर्ग मंडळींच्या सल्ल्यानुसार वडिलांनी दुसरे लग्न केले.

आधीच्या वास्तव्याला आधीच तडजोड होती.आता त्यात पुन्हा एक भरीस पडली होती.या वेळेस नवीन माऊलीची फार छान चिंता बाप करू लागला होता.कारण त्याला तिच्याकडून एका मुलाची एका वारसदाराची अपेक्षा होती. बघता बघता नवीन माऊलीला दिवस गेले.आणि काही दिवसांनी त्या पडक्या पडवीत एका लहानग्याचे सुरेख रडणे कानावर आले.त्यावेळेस घर कसं त्याच्या आवाजाने प्रफुल्लित वाटत होतं.सातही बहिणी आम्हाला भाऊ मिळाला म्हणून आनंदाने नाचू लागल्या.आज सगळयात जास्त आनंदात होता

तर तो बाप होता.आज त्याच्या आनंदाला सिमा उरली नव्हती.कधी नव्हे ते आज बापाने वाण्याकडून उधारी गूळ आणि शेंगदाणे आणले होते.आणि जिथे तिथे तो गोड आनंद वाटला होता.

इवल्याशा भावाला बघायला सातही बहिणींनी एकच गर्दी केली पडवीत.लहानगा देवझोपेत तल्लीन होता.झोपेत त्याचं हसणं त्या बहिणींना एक करमणूक वाटत होती.त्यामुळे प्रत्येकजण त्या लहानग्याच्या ओठाला, गालाला हात लावून, डिवचून आपापले प्रेम व्यक्त करत होत्या.अचानक पडवीत आल्या आल्या बापाने सगळ्या बहिणींना दटावत तिथून हुसकावून लावले.बिचाऱ्या बहिणींना यातलं काही कळलं सुद्धा नाही.पण भाऊ आल्याचा त्यांना जितका आनंद वाटला होता, तितकाच त्यांच्या दुःखांचा पण बंधारा सजला होता.इथून त्यांच्या जीवनाचा अंधःकार चालू झाला होता.

जेव्हा कधी त्या भावाच्या लाडापोटी त्याच्याजवळ जायच्या.तेव्हा नवीन आई वडील सारखं त्यांना दटावत असत.जणू यांची सावलीसुद्धा त्याच्या अंगावर पडता कामा नये अशी ती काळजी घेत भावाची.जुन्या दिवसांवर आता विरजण पडलं होतं.मुलगा झाला तेव्हापासून एक भरभराटी घरात झाली होती.भावासाठी खेळणी,विजार इतकंच काय, त्याला खायला कमी पडू नये म्हणून दुधापासून ते गोड धोडपर्यंत सगळं काही नियमित असायचं.ज्यामुळे बहिणींकडे असलेला दुर्लक्ष आणखी वाढू लागला.उशिरा का असोना त्यांना मिळणारे कापड, तसेच तुटक आहार यांचा आणखी अभाव पडू लागला.पण त्या कधीच उर्मटपणे बोलल्या नाहीत.निदान आपल्यामुळे भावाचे लालन

पालन सुधारत आहे,आपल्यासारखे त्याचे हाल नाही ह्यावर त्या समाधानी होत्या.

पण जसे जसे दिवस पालटत गेले.त्यांचं अंतर मात्र तितकाच वाढत राहिला.हळूहळू पलटणारा भाऊ आता रांगु लागला,नंतर बसू लागला,उभा होण्याच्या धडपडीत पडू लागला,धावू लागला.कधीकधी बहिणींच्या मांडीवर निजू लागला,अंगाई ऐकू लागला.त्यांच्यासोबत हसू खेळू लागला.आईवडिलांच्या समोर अंतर वाढले असले तरी बहीण भावांचा तो एकोपा त्यांच्या नसण्यावर अगदी डोळयात भरण्यासारखा होता.व्यक्त नसले तरी अव्यक्त प्रेमाचे क्षण मुक्यामुक्यानेच वेदना संवेदना देत होते.

दिवसामागून दिवस नेहमीसारखेच प्रगतीच्या थाऱ्यावर निघत होते.आणि तसतसेच घराच्या त्या आर्थिकतेची पण सुधारणा होत होती.पण ती भावापुरतीच मर्यादित होती.बहिणींसाठी दरिद्री अजूनही ताजीच होती.तेच उरलेलं शिळे अन्न,आणि तेच फाटके पण शिवलेले कपडे. रिटे लावून धुतलेले केस,पण कधी तेल मिळाला नाही तर गुंता डीवचलेला असायचा.हातापायांना काही जखमा असायच्या ज्यात पाणकणीस चींधीने बांधलेली असायची.कधी लक्ष असायचीच तर नालीच्या काठावर बसून वाण्याच्या दुकानाकडे.एखादे वडील आपल्या मुलाला काही खायला घेऊन द्यायचे. आलिंगणाला कशी घट्ट मिठी द्यायचे.त्यांच्या प्रेमाला कित्येकदा असोना ईर्ष्या वाटायची.कधी कपाळावरचं नशीब म्हणून घृणा वाटायची.पण ते बोबडे बोल पुन्हा त्यांच्या अविचारांना परावृत्त करत जगण्याला एक आधार देऊन जातं.ते म्हणतात ना

दलदलीत उगवलेलं एक कमळ अख्ख्या दलदलीला सुशोभित करतं अगदी त्यासारखे.

उनाडक्या करता करता भाऊ दहा ते बारा वर्षाचा झाला.आता बहिणींच्या सोबतीने तो थट्टा करू लागला होता.त्यांच्यात लपीछुपी,लंगडी खेळू लागला होता.कधी वडिलांनी दुकानातून त्याला खायला काही घेवून दिले, तर त्याचे तो लपून सात हिस्से करायचा आणि मिळून मिसळून खायचा.लपून का असोना पण बहिणींच्या प्रती त्याचे निरागस भाव ओतप्रोत जागवून द्यायचा.कधी कधी त्याच्या नितळ चेहऱ्याकडे बघितल्यावर बहिणींना कसे गहिवरून यायचे.कारण सुखदुःखाच्या वेशीवर तो अशा पद्धतीने उभा होता,की त्याला धरूनही जगावेसे वाटेना की त्याला सोडूनही जगावेसे वाटेना हीच त्यांची शोकांतिका होती.कधी काळी आम्ही नसल्यावर याचं काय होणार?हाच विचार त्यांच्या मनात येत होता.कारण आता त्या उपवर झाल्या होत्या.एक न एक दिवस लग्न करून त्यांना जाणेच होतं.

पण बहिणींच्या मनातून एकच वस्तू उतरत नव्हती.आणि ते म्हणजे तो प्रकाशकिरण.त्या दिवशी सायंकाळी गडावर उमडलेला प्रकाशकिरण.कित्येकदा त्यांना स्वप्नातही अगदी तोच प्रसंग आठवायचा.त्यासाठी त्या बऱ्याचदा जंगलात गेल्या पण त्या वेळेपर्यंत कधी त्यांचं राहणं झालं नाही की कधी त्याविषयी कोणता पुरावा मिळाला नाही.त्यामुळे बऱ्याचदा त्या उत्सुकतेने वंचित राहायच्या.

पण त्यानंतर जी गोष्ट घडली ती त्यांच्या आयुष्यात घडणारी एक खूप मोठी गाथाच झाली.कारण बहिणींच्या आयुष्याला वळण आणणारी ती एकच गोष्ट होती.जी आजही त्यांच्या काळजावर घाव घालणारी होती.आणि निश्चितच त्या वेळेस ते घडणं अगदी साहजिक होतं.

त्या दिवशी घरी थोडासा वाद चालला होता.म्हणजे मधल्या लहान बहिणीचे कपडे बऱ्याच प्रमाणात फाटले होते.आणि नवीन कपडे मिळतील ही आशा पण नव्हती.पण त्या जुन्याच कपड्यांना शिवायला एक सुई सुताचं बिंडल लागत होतं.ज्याच्यासाठी एक प्रकारची शिफारस बहिणींनी वडीलाला घातली होती.पण उलट वडिलांने त्यांच्यावरच डाफरत त्यांना म्हणलं की,तुमच्यासाठी माझ्याजवळ काही नाही,राहायचं असेल तर रहा अन्यथा निघून जा,मला तुमची काही आवश्यकता नाही.

वडीलांच्या शब्दाला प्रत्युत्तर न देता त्या आत खोलीत आल्या आणि हमसून हमसून रडू लागल्या.याही परिस्थितीत त्यांना काय करावे हेसुद्धा सुचत नव्हतं.बिचाऱ्या स्वतःच्याच नशिबाला कोसत राहिल्या होत्या.त्यांच्या भावनेची आज पुन्हा एकदा चिता सजली होती.त्यांच्या असण्याचे ओझं त्यांना फार आधीच वाटत होतं.पण आता त्यांची जाणिव इतकी घट्ट झाली होती की आता कृतिशील व्हायला वेळ लागणार नव्हता.पण जन्मदात्यांशी असं नास्तिक होणं एका क्षुल्लक गोष्टीसाठी हे त्यांना योग्य वाटत नव्हतं.

अचानक बाहेरून आलेल्या लहानग्या भावाची जाणीव झाली.त्याला हे सगळे नको कळाया.उगाच पुन्हा काही प्रसंग ओढवेल म्हणून डोळ्यातले आसवे पुसून त्या जागेवरच खिळल्यागत बसून राहिल्या.सगळ्या घराला शांत बघताना भावाला जरा अपरिचित वाटलं.घर धुंडाळत कोपऱ्यात बसलेल्या बहिणींपाशी तो आला.आणि त्यांना खेळण्यासाठी आग्रह करू लागला.पण नुकतंच काय घडलंय याची जाणीव त्या निरागस हृदयाला कुठे होती?बहिणींनी नाही म्हणत असताना सुद्धा त्यांचं हात धरून तो खेचाखेची करत होता.आणि नेमकं त्याच प्रयत्नात तो धपकन जमिनीवर पडला.

सारवणीने बरबटलेली जमीन असली तरी छोट्या छोट्या खड्यांनी त्याला जरासे खरचटले.त्यामुळे तो रडायला लागला.त्याला लागलेय असं म्हणून सातही बहिणी गहीवरल्या, आणि त्यांनी त्याला धावत जाऊन उचलले पण तो रडायचा थांबेना, आणि बहिणींचे हात झिडकारत तो धावत धावत वडिलांकडे गेला.त्याला रडताना बघून वडीलाने त्याला काय झाले? असं विचारलं.जखमेकडे बोट दाखवत बहिणींनी ढकललं असं तो हुंदक्यासरशी सांगू लागला.

जख्मेकडे बघताच वडिलांचे डोळे मोठे झाले आणि त्याचा रागाचा पारा आणखीनच वाढला.आणि त्याला घेऊन तडक तो बहिनींकडे आला.आणि जोरजोरात ओरडू लागला.

तुम्हाला सुई सुताला पैसे दिले नाही,म्हणून काय माझ्या पोराला माराल काय? तुमच्या भरवश्यावर जर त्याला ठेवलं तर तुम्ही तर त्याला मारायलाही संकोच करणार नाही.हे काही नाही,मला तुमची काही गरज राहिलेली नाही आता,आणि असून किंवा नसून मला तुमचा काही उपयोग पण नाही.तुमच्या जन्मापासून नुसतं तुमचं ओझं अंगावर वावरतोय.त्यामुळे निघून जा तुम्ही माझ्या घरातून.पुन्हा तुमची सावली माझ्या मुलावर पडता कामा नये.

बहिणींनी त्यांना खूप समजावण्याचा प्रयत्न केला.पण वडील काही मानायला तयारच नव्हते.एकेक बहिणींचा हात धरत त्याने सगळ्या बहिणींना घराच्या बाहेर काढले.आणि दरवाजा त्यांच्या तोंडावर किर्र किर्र करत जोरात आपटला.आणि सगळ्यांना तंबी दिली की यांना जर कुणी घरात घेतलं तर माझ्यासारखा वाईट कुणी भेटणार नाही.आजपासून त्यांना घरात अजिबात जागा नाही.

-------------------------------------------------------

## ३०. रितूची आणि मृत्युदेवाची गाठ....

इकडे आचार्य निघून गेल्यावर हॉस्पिटलमध्ये रितू एकटीच माझ्यापाशी बसली होती.आचार्यांना बघून तिच्यात एक तरतरी आली असल्याची, खूण मात्र तिच्या चेहऱ्यावर खुलून दिसत होती.आता लवकरच आणि निश्चितच काहीतरी मार्ग निघणार असे वारंवार तिला वाटत होते.खिडकीतून येणाऱ्या मंजुळ हवेचे चेहऱ्यावर झोत घेत ती बेडपाशी आली.जवळ असूनसुद्धा पुन्हा नव्याने ती माझ्या शरीराकडे बघत होती.कधी श्वास घेताना सुई...असा आवाज आला की डोळे एकवटून चेहऱ्याकडे बघायची.कदाचित मी डोळे उघडणार हा भास मनी घेऊन.

इतक्यात दंडावरच्या ताईताने माझ्यावरचा यमराज घालवला होता.त्यामुळे शरीरावर बराच फरक जाणवत होता.शरीरावर पडलेल्या बऱ्याच वळांना उभारतांना बघून रितू थोडीफार निश्चिंत झाली होती.हळूच तिने ओढणीचा चंबू घेऊन माझ्या चेहऱ्यावर जमा झालेल्या थेंबांना पुसून काढले आणि एक चुंबन कपाळावरचे घेत केसांवर हात फिरवत राहिली. न जाणे माझ्यासोबतच्या कोणत्या विश्वात रममाण झाली तिचे तिलाच ठावूक.कारण नर्सने येऊन सगळं काही चेक करून गेली तरी तिचं थोडंसंही लक्ष तिच्याकडे

नव्हतं.तिला माझ्यासोबतचे ते शेवटचे क्षण आठवत होते.ती सारखी मला अडवत होती आणि मी तिला अव्हेरत होतो.अचानक तिला आचार्यांनी दिलेल्या पुस्तकाची जाणिव झाली.

त्यासरशी ती हळूच उठली.आणि ते पुस्तक घेऊन ती परत माझ्या बेडपाशी येऊन बसली.ज्यात आचार्यांनी केलेले बरेच संशोधन आणि त्यांचे अनुभव तथ्यासहित मांडल्या गेले होते.त्यातल्या एका पानावर ती वाचू लागली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अड्याळ टेकडीवरून उठले आणि आजूबाजूच्या बऱ्याच गावात प्रबोधन केले. विश्वबंधुत्वाचा संदेश देत गेले.त्यांच्या खंजिरी भजनात एक खास आशयाची शैली होती. मिंथुर येथे स्वतः आपल्या हातांनी गुरुदेव मंदिराची त्यांनी स्थापना केली.त्यांना भेटायला,त्यांची भजने ऐकायला फार दुरून लोक यायचे.सगळ्या ग्रामाला संदेश देत सबंध महाराष्ट्रभर त्यांचा प्रवास चालू होता त्या वेळेची ही गोष्ट.

महाराज जेव्हढे जनमानसांत येऊन प्रबोधन करीत होते.तसेच त्यांचा प्रवासही एकांताचा असताना अगदी पशुसुद्धा त्यांना मान देत. अड्याळ टेकडीच्या गुंफेतून निघून समाज प्रबोधन करीत ते पेरजागडावर आले.त्या वेळेस पेरजागडावर त्यांचा सहवास बरेच दिवस राहिला.मग तिथून ते गोंधोडा तपोभूमीकडे परतले.त्याच डोंगररांगेने.आणि तिथे त्यांनी तपश्चर्या करण्यास सुरुवात केली.त्यावेळेस पेरजागडावरील बरेच विचित्र अनुभव त्यांनी कथन केले होते.

एकदा ते तपश्चर्येला बसले असताना आजूबाजूला वाघ आणि अस्वलाची झुंज चालू होती.त्यांचं ते वेदनेने विव्हळणे आणि परत एकमेकांवर हल्ला करणे.यामुळे महाराजांच्या तपश्चर्यात बऱ्यापैकी व्यतय येत होता.ते उभे झाले आणि वाघ आणि अस्वलाच्या मध्ये झाले.दोघांच्याही डोळयात डोळे घालून सारखे बघत राहिले.त्या हिंस्त्र जनावरांना बघून काय वाटले ते कुणास ठावूक.पण परत वाद न करता अस्वल आणि वाघ दोन्ही आपापल्या वाटेनी परत गेले.पुढे जितके दिवस त्यांचा सहवास त्या पेरजागडावर होता.तितकेच दिवस ते त्यांच्या सोबतीला असायचे.ज्या दिवशी महाराज गोंधोडा गुंफेला परतले, तेव्हा सुद्धा या हिंस्त्र श्र्वापदांनी त्यांना तिथपर्यंत नेऊन सोडले होते.त्यांचं असं पण म्हणणं होतं की गडावरती त्यांना कपिला मिळाली होती.जेव्हा जेव्हा महाराजांना भूक लागायची, एक शुभ्र गाय गडावर त्यांच्यापाशी यायची.तिचं ताजं दूध पिऊन महाराज तृप्त व्हायचे.त्यांनी अशा बऱ्याच गोष्टी वर्णन केल्या होत्या.

पेरजागडचं ऊर्जास्त्रोत एका विहिरिशी साम्य ठेवतो असेसुद्धा ते म्हणाले होते.दर अमावास्येला तर दर पौर्णिमेला ती विहीर काठोकाठ भरलेली असायची.मी बऱ्याचदा त्या विहिरीपाशी जायचो.ती मला रितेच दिसायची.पाण्याचा एक थेंबही तिच्या गर्भात दिसेनासा व्हायचा.

आचार्यांनी नोंद केलेल्या बऱ्याच गोष्टी त्या पुस्तकात रचलेल्या होत्या.रितू पुन्हा पुन्हा बारकाईने त्या संशोधनात घुसली होती.

इकडे आचार्य रितूची भेट घेऊन परतले.इन्स्पेक्टर राठोडने त्यांना घरी सोडले आणि लवकरात लवकर काही उपाय योजना सुचवा अशी तंबी देत ठाण्यात निघून गेले.इकडे आचार्य हात पाय धुवून जरा फ्रेश झाले आणि आपल्या खोलीत परतले. लँम्प लावून टेबलावरचं सगळं सामान काढून टेबल साफ केलं आणि नक्षा घेऊन खुर्ची सरकवून ते बसले.त्यांच्या संशोधनार्थ त्यांना त्या नक्षावर असलेल्या बऱ्याच रस्त्यांची माहिती होती.पण ती जुनाट रस्ते होती.त्यातल्या फक्त काहीच रस्त्यांची तीथे पायवाट दिसत होती.आणि ज्या रस्त्यांच्या वाटा तिथे दाखवल्या होत्या,त्या तर दिसल्याच नाही.आणि ज्या आकृत्या मॅपवरून मी काढल्या होत्या.त्या अगदी हुबेहूब त्या नक्षावर् दिसत होत्या.बराच विचार करुनही आचार्यांना त्या नक्षाबद्दल काहीच कळलं नाही.ते सारखं आलटून पालटून फक्त त्याला बघत होते.कशाशी मिळतो का हे बघायला सोशल मीडिया तसेच जुनाट ग्रंथाचा वापर करू लागले होते.पण त्यांच्या कपाळावरच्या आठ्या सपाट होण्याचा नाव घेत नव्हते.शेवटी त्रासून त्यांनी नक्षा तिथे ठेवला आणि जेवण करण्यासाठी बाहेर आले.

रात्रीला म्हणजे बऱ्याच वेळपर्यंत रितू आचार्यचे पुस्तक वाचत होती.माझा आणि आचार्यचा सिद्धांत तिला काहीही वेगळा वाटत नव्हता.कारण जे संशोधन आचार्यांनी आठ वर्ष खर्च करून मिळविले होते.तेच संशोधन मी आठ महिन्यात मिळवले होते.गडाच्या उपयोगापासून ते त्यांच्या अंतापर्यंतचा मी विचार केला होता.कारण त्या पुस्तकात ती इतर माहिती जी मी

वास्तव्यात अनुभवली होती.आणि जे अनुभव आचार्यांनी घेतले होते ते अनुभव मी नेहमीच घेत आलो होतो.

नेहमीसारखे पुस्तकांना बॅगेत कोंबून रितू माझ्यापाशी येऊन बसली होती.जेव्हापासून मी हॉस्पिटलला आलो होतो.तिने हॉस्पिटलच्या बाहेरच्या जगाशी संबंध तोडून दिले होते. बेड ते खिडकी,आणि बेड ते दरवाजा बस इतकाच तिचा प्रवास होता.पण दिवसभरातून तिच्या इतक्या येरझारा व्हायच्या की तिलासुद्धा त्या कळायच्या नाहीत.घड्याळात बघितले.आठ वाजणार होते. रात्रपाळीचे डॉक्टर्स आणि नर्स मला बघून जातील हे तिला माहिती होते.आणि म्हणून ती सारख्या येरझारा घालीत होती.

तितक्यात डॉक्टरचे आणि नर्सचे आगमन झाले.माझ्या निपचित पडलेल्या देहाकडे येत त्यांनी हाताची नाडी आपल्या हातात घेतली.डोळे उघडुन त्यात प्रकाशझोत टाकून बघितले.हृदयाची धकधक कानात ऐकली आणि ते नर्ससोबत कुजबुज करू लागले.हे ऐकून रितुला काही उत्सुकता वाटली.ती डॉक्टर जवळ जाऊन म्हणाली...

"काय झालं डॉक्टर?परिस्थितीमध्ये काही सुधारणा होते आहे काय?"

"सुधारणा तर होत आहे पण फक्त शरीरावर झालेल्या वळांवर होत आहे.जे बाह्यभागावरील आहे.पण पहिल्या दिवशीपासून ते आजपर्यंत

अजूनतरी नवीन रिस्पॉन्स नाही.आणि मी त्याचेच आश्चर्य करतो आहे.की अजूनही काहीच बदल का नाही?"

"मग पवन सुधारणार की नाही डॉक्टर?"

"नो नो...मी असं थोडेच म्हटलं आहे.पण इतक्या मेडिसिनवर काहीतरी बदल हवा होता.पण पवनची बॉडी काहीच ॲसेप्ट करत नाही आहे.आणि शेवटी मीसुद्धा एक डॉक्टरच आहे...देव नाहीच."

"डॉक्टर म्हणजेच देवाचं दुसरं रूप असते डॉक्टर."

"मी प्रयत्न करत आहे रितू.आता जे काही आहे ते सगळं त्याच्या हातात आहे."

एखाद्याने दाखवलेली नुसती शब्दांची हिम्मत असली तरी शरीर कसं साहसाने बळकट होते.त्याचप्रमाणे डॉक्टरने सांगितल्या कारणामुळे रितुचं हृदय जोरजोरात धडधडायला लागले होते.आणि डोळ्यातून सरी ओथंबायला सुरुवात पण झाली होती.आणि त्याच परिस्थितीत ती बेडपाशी जाऊन बसलेली होती. रडता रडता ती नेहमीसारखीच झोपी गेली.

तिला जाग आली तेव्हा रात्रीचा मध्यान्ह सुरू होता.पण तिला जाग आली होती ती एक अनामिक स्पर्शाने.तिने हाताकडे बघितलं.कारण

नेहमीसारखाच माझा हात तिच्या हातात होता.पण तो थंडगार नव्हता.माझं हृदय जोरजोराने धडाडत होते.चेहऱ्यावर घामाचे ओघळ जमा होऊ लागले.जणू मी स्वप्नात गुंतत चाललोय असे रितुला वाटू लागले.ती सारखं माझ्या चेहऱ्यावरचा घाम पुसण्याचा प्रयत्न करत होती.शरीराचं तापमान कधी थंड तर कधी गरम होत जात होतं.बराच वेळ हा विचलित प्रकार चालला होता.मी ओठातल्या ओठात काही पुटपुटण्याचा प्रयत्न करत होतो.हे सगळं काय चाललेय? रितुला काहीच कळत नव्हते.पण एक आसमंत भेदणारा कर्कश आवाज तिच्या कानात घुटमळत होता.तो आवाज सारखा हसत होता.मृत्यू मृत्यू म्हणून सारखा डिवचत होता.संपूर्ण खोलीत त्या आवाजाचा वादळ उठला होता.

रितुची नजर दरवाज्यावर गेली.पुसट पुसट एक काळी आकृती ती चालत येताना दिसत होती.त्या आकृतीला बघताच रितू समजून चुकली की तो "मृत्युदेव" आहे.चालत चालत ती आकृती माझ्या बेडपाशी आली.तो मृत्युदेव होता.पण रितुला ताईतावर विश्वास होता की तो माझे प्राण हरू शकत नाही. मृत्युदेवाने बेडपाशी येताच जोरदार एक ठाहाका मारला....मृत्यू...आणि परत त्याच्या हसण्याचा आवाज संपूर्ण खोलीभर वावरू लागला होता. हसता हसता मृत्युदेव रितुला म्हणाला...

"मूर्ख मुली,तू त्याला कितीही वाचवण्याचा प्रयत्न केलेस,तरीही त्याचा मृत्यू अटळ आहे,त्या ताईताने जरी मी त्याला स्पर्श करू शकलो नाही तरी त्याचा मृत्यू अटळ आहे...तो

रितुला आता या सगळ्याची सवय झाली होती.आणि जे काय घडत आहे ती या सगळ्यांपासून अपरिचित नव्हतीच.त्यामुळे ती म्हणाली...

" मृत्युदेवा...त्याच्यासोबत सतीसुद्धा जायची तयारी आहे माझी.आणि जोपर्यंत माझी साथ त्याच्या वाट्याला आहे.तोपर्यंत मी त्याला मरूच देणार नाही.तिने बॅग काढली ज्यातून एक डबी काढली.ती उघडली.त्यात कुंकू होता.माझा हात हातात घेऊन तिने कुंकवाचे बोट तिच्या कपाळावर लावून घेतले.आणि ती जोरात ओरडली."

"हे चंद्रदेवा,तुझ्या पावलांना साक्षी मानून,तुझ्या प्रकाशकिरणांत मी ह्या कुंकवाला पवनच्या नावाने वरतो आहे.तो माझ्या जीवनाचा साथीदार तसेच मी त्याच्या जीवनाची अर्धांगिनी म्हणून आज या उजेड्या रात्री एक दैवत म्हणून मी तुम्हांस सांगतो आहे.आता एक माय बाप म्हणून तुम्हालाच आमची दया घ्यावी लागेल.महादेवाच्या जटावर तुम्ही विराजमान होऊन आज प्रत्यक्ष तुम्हाला माझी शोकांतिका दिसत नाही का?हे कसल्या जन्माचे ऋण आमच्या वाट्याला दिलेस,जर जगणं आमच्या नशिबात नसेल तर सांग त्या महादेवाला ,मी सती जायला तयार आहे,अनंतात सामावून घे म्हणा आम्हाला,पण ह्या यातना,इतक्या दुःखदायी कशाला?"

"रितुच्या मनाचे बंधारे पूर्णपणे तुटून पडले होते.ती गुडघ्यावर विसावली.ओढणीने दोन्ही डोळयांच्या कडांना पुसत ती एकवार मृत्युदेवाकडे बघून म्हणाली..."

" शेवटी काय चूक आहे माझ्या पवनची,हे तुम्ही तरी सांगू शकता ना मृत्यूदेवा..."

" मुत्यूदेव हसत होता. दिर्घ वेळाने हसून तो म्हणाला.हे बघ मुली,माझ्याकडे फक्त प्राण हरण्याचे काम असते.त्यामूळे मी ते का हरतो किंवा त्याची काय चूक आहे,तो माझा प्रश्न नाही.मी फक्त एक सांगू शकतो की मानव जन्म त्याच्या मागील पाप पुण्याच्या क्रमवारीनुसार येते.चांगले कर्म त्याची आयु वाढवतात तर वाईट कर्म त्याचे आयुष्य कमी करतात.आणि या सगळयांचा लेखाजोखा सगळा चित्रगुप्ताजवळ असतो."

"मग आम्हा दोघांनाही न्या मृत्यूदेव,या क्षणी माझी तयारी आहे,त्याच्या यातना मला सहन होत नाही."

"तुला काय वाटलं? मी प्राण हरतो म्हणून विधात्याच्या नियमांचं उल्लंघन करणार नाही. जो जन्माला आलेला आहे त्याचा मृत्यू अटळ आहे.तो कोणीच थांबवू शकलेला नाही.मग राजा काय? रंक काय?देव काय? दानव काय?वेळेच्या आधी आणि वेळेच्या नंतर कधीच काही झाले नाही आणि कधीच काही होणार नाही."

"मग हा यातनांचा प्रवास कधी संपेल मृत्यूदेव?"

"तो माझ्याही हातात नाही मुली,कारण तुला वाटतेय त्या ताईताने मला अव्हेरलेय.पण त्या ताईतापेक्षा महत्वाचं म्हणजे पवन इथे आहे कुठे?हे फक्त त्याचं शरीर आहे.आणि ते ताईत तेच वाचवण्याचा प्रयत्न करत आहे.आणि त्याचा मृत्यूयोग हा जवळच आहे.."

"मग यावर उपाय सांगावे मृत्यूदेव.मी आजन्म आपली आभारी असेन,तो कुठे आहे?मला कळवा मृत्यूदेव? मला सांगा..."

"मी जरूर सांगितलं असतं पण माझ्या मर्यादेच्या पलिकडे मीसुद्धा जाऊ शकत नाही.पण एक मात्र नक्कीच सांगेन.पवन जिथे अडकलाय तिथून तो तुझ्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतोय.तुझी मदत त्याला हवीय.आणि तिथे जायचा मार्ग हा तुझ्याजवळच आहे.फक्त रहस्यांना जरा समजून घे...निघतो मी..."

" मृत्यू.......हा....हा..."

रितू काही म्हणायच्या आत मृत्यूदेव आला तसा निघून गेला.पण यावेळेस रितू त्याला घाबरली नव्हती.ज्या पतीनिष्ठेने ती वागली होती कदाचित काळाची सुद्धा तिला तमा उरली नाही.इतक्यात नॉर्मल होऊन मी बेडवर पडलो होतो.आणि शिवाय माझ्या शरीराच्या मी इथे नाही हे रितुला आता कळलेले होते.त्यामुळे ती माझ्या प्रत्येक भेटीचा प्रसंग आठवू लागली.काय चुकतो आहे?अशी एखादी वस्तू जी तिला पवनपर्यंत पोहचवू शकेल.कारण त्याला

आता तिच्या मदतीची गरज आहे हे वाक्य तिला स्वस्थ बसू देत नव्हते.ती प्रत्येक वस्तू बॅगेतली काढत होती.त्याला अगदी न्याहाळून बघत होती.

ती रात्र जशी रितुच्या बाबतीत घडली. तीच रात्र पुन्हा कुणाच्यातरी बाबतीत घडली होती.आणि ते होते आचार्य?त्यांनी बराच संशोधन केला. पण त्या नक्षाची उकल करण्यात त्यांना यश आले नाही. शेवटी त्रासून ते निद्रेच्या स्वाधीन गेले.पण आज त्यांना झोप येत नव्हती.सारखा माझा छिन्नविछीन्न निपचित पडलेला चेहरा त्यांच्या डोळ्यासमोर येत होता.पवन प्रकरण इतक्या गूढ रहस्याशी जोडून असेल असे त्यांना वाटले नव्हते.

न जाणे किती वेळ ते विचारांच्या तंद्रीत बेडवर पडून होते.अचानक फुस्स...असा आवाज त्यांच्या कानाशी आला.ते इकडे तिकडे बघू लागले.झोपताना ते मंद प्रकाशाचा वापर करीत असत पण संपूर्ण खोलीत लाल लाल प्रकाश पसरला होता.आचार्य जरा घाबरले.कारण तो प्रकाश टेबलावर असलेल्या एका वस्तुमधून येत होता.जरा भितभित आचार्यांनी अंगावरची चादर काढली.भयावह चित्कार, फुंकार असे आवाज तिथून येत होते.त्यामुळे जरा सावरतच आचार्य उठले आणि त्यांनी टेबलावर नजर टाकली.तो लाल रंगाचा प्रकाश आणि तो भयानक आवाज त्या नक्षामधून येत होता.सावकाश चालत चालत ते त्या नक्षापाशी आले.त्या नक्षाचं संपूर्ण रूप पालटलं होतं.

एक भयावह सर्पाकृती सरपटताना दिसत होती.आणि पेरजागडापासून काही अंतरावर एका आकृतीची हालचाल त्यांना दिसत होती.जेव्हा ती

सर्पाकृती एखाद्या आकृतीपाशी जायची, तेव्हा काही क्षणासाठी तिचा प्रकाश मंद व्हायचा.पण आश्चर्य असे होते की ज्या वाटेने ती सर्पाकृती नक्षात वावरताना दिसत होती.ती वाट मात्र इथे अस्तित्वात नव्हती.सगळ्या आकृत्यांची भेट घेऊन ती सर्पाकृती पेरजागडाच्या पायथ्याशी आली आणि गडप झाली.आणि ती हालचाल पण.हळूहळू नक्षामधुन निघणारा तो लाल प्रकाश मंद मंद होत दिसेनासा झाला.आणि निर्जीव झाल्यागत तो नक्षा टेबलवर पडून राहिला.आचार्यांनी तो नक्षा हातात घेतला.पुन्हा एकदा त्या वाटांकडे ते बघू लागले.ती सर्पाकृती जिथे गडप झाली तो भाग म्हणजे हत्तीखोयाळ होता.आणि जिथे ती आकृती हालचाल करताना दिसत होती ती म्हणजे पांढरी भिंत होती.जी भावाच्या डोंगरावर स्थित होती.आचार्य सकाळ होण्याची वाट बघत होते.कारण त्यांच्या कपाळावर पडलेल्या आठ्यांवर काहीतरी समाधानाची सपाटी दिसत होती.आणि आत्तापर्यंत जे काही घडलं होतं त्याबद्दल लवकरात लवकर त्यांना रितुला सांगायचं होतं.

---------------------------------------------------

## ३१. पवनला स्वतःच्या अस्तित्वाची ओढ....

मी फार प्रयत्न केले पण त्या दिवशी आकाशने मला शहराकडे जाऊच दिले नाही.त्यामुळे दुसऱ्या दिवशी मी शहराकडे गेलो.शिवाय रितुचे सारखे फोन मला येतच होते.आणि काहीतरी नवीन प्रयत्न करण्यासाठी मला परतीला जाणे आवश्यकच होतं.त्यामुळे सकाळी फार वेळ न दवडता मी शहराकडे परतलो.मी आल्याची वार्ता रितुला न सांगताच कळते हे मला माहीत होतं.त्यामुळे बॅग बाजूला ठेवून मी तिचीच वाट बघत होतो.

खरंतर ज्या दिवशीपासून हे मृत्यू प्रकरण माझ्या मागे लागले होते, त्या दिवशीपासून तिच्यातल्या प्रेमाची जागा फक्त एका काळजीने घेतली होती.तिच्या डोळयांत असणारं आकर्षण ज्यात आता नुसते चिंतेचे भाव दिसत होते.पूर्वी जेव्हा कधी यायची तिचा लाजाळूपणा कधी संपायचा नाही.पण आज येताना हृदयाचा तुकडा कुठेतरी अलिप्त झालेला आहे या संदर्भात असायची.तिच्यातली ती गळून पडली होती आणि ती उरली होती ती फक्त माझ्यातली ती होती.आणि तिचं असणं तोच माझ्या असण्याचा आधार होता.कुठपर्यंत होता,माहिती नाही.पण कळत नकळत तिचं असणं मला पूर्ण करत होता.न राहवून माझ्या एकांतात मला तिची कमी क्षणोक्षणी जागवली होती.कदाचित हेच ते पवित्र बंधन असेल जे साता जन्माच्या गाठींनी बांधायचे आम्ही ठरवत होतो.

थोडं इकडे तिकडे येरझारा मारतच आहे तितक्यात काळजीने ग्रासलेली रितू दारात उभीच होती.पण मला बघताच तिच्या चेहऱ्यावर उसने हसू आणण्याचे प्रयत्न केले.मी व्यक्त जरी केले नसले तरी रितूचा चेहरा न बघता मला रहावेनासे पण वाटत नव्हते.तिला बघताच प्रवासाचा शीण, तुटलेला आत्मविश्वास सगळं कसं नव्याने भरती आल्यासारखं वाटून जायचं.ती दारात उभी होती पण समाधान मला खुर्चीवर बसल्या मिळत होते.

"ये ना आत...दरवाज्यात काय झालं राहायला? मी हलकेच तिला म्हणालो.मग आकाश सोबत सगळ्या प्रवासाची माहिती मी तिला दिली."

"पण एक कळत नाही रितू, इतकी उंच डोंगररांग आहे.त्याच्या चारही बाजूला शेकडो गुंफा आहे.काहींचा अंत आहे तर काहींचा अंत पण नाही.पण बऱ्याचदा मला असं वाटते की या प्रत्येक डोंगररांगेतून एक भुयारी रस्ता आहे."

"कसं काय म्हणू शकतेस?"

"बघ ना..जेव्हा एखाद्या डोंगराची निर्मिती होते.तेव्हा बऱ्याचशा भागात ती पोकळी राहून जाते.मग एकदा दगडांचं संतुलन बनलं की पावसामुळे माती उतारावर घरंगळते आणि श्वापदांमुळे त्या गुंफा."

"हो हे खरं आहे पण तू असं कसं म्हणू शकतोस की यात भुयारी रस्ते असू शकतील म्हणून? कारण एका पोकळीत आणि भुयारी रस्त्यात फार साम्य असतो पवन..."

"बघ मी जेव्हा जेव्हा पेरजागडाच्या जवळपास जातो तेव्हा बऱ्याचदा मी आजूबाजूने त्याचे निरीक्षण करतो.आपल्या नजरेला अंतर पुरणार नाही इतका काळोख काही काही ठिकाणी असतो.काही छोट्या तर काही मोठ्या अशा शेकडो गुंफात मी जाऊन बघितले.जसं एखादी स्टाईल भिंतीला पूर्ण बसलेली नसेल तर आवाज येतो.त्याप्रमाणे त्या दगडांचा आवाज येतो.आता प्रश्न हा आहे की हे तथ्य कितपत योग्य आहे.

आपण पुरातन इतिहास वाचतो.एव्हाना शिवाजी महाराजांच्या इतिहासात सुद्धा भुयारी रस्त्यांचा समावेश होता.त्यांना "चोर रस्ते" म्हणून संबोधल्या जायचे.कदाचित या रस्त्यांचा पण इथे समावेश असावा.आता त्यावर बंदी आहे.मी बऱ्याच ठिकाणी बघतो.आता त्या चोर रस्त्यांचा वापर होत नाही.बऱ्याच ठिकाणी त्यावर प्रतिबंध जरूर लावल्या गेले आहे.

मग आता काय करायचं ठरवतो आहेस पवन?

ठरवायचं काय आहे? मी नेहमी प्रयत्नशील राहिलो आहे.त्यामुळे, दरवेळेस मी नवीन काहीतरी अनुभवत असतो.मी गडाचा चाळीस प्रतिशत भाग नक्कीच हुंडळून काढले आहे.आणि त्या चाळीस प्रतीशत भागात जी माहिती

मिळाली आहे किंवा जे डोळयांना दिसलं आहे, त्यावरचं तथ्य अजूनतरी कोऱ्या कागदासारखं आहे.मुळात आपण काय करतोय? त्या भागात वास्तव्यास असलेल्या लोकांचे मनोगत अनुभव ऐकून आपण विचार करतोय.स्वतःबद्दल वाटणारे कुतूहल अजूनही तेव्हढ्याच अंतरावर आहे.जितके अंतर आधी होते.पण अजूनही मला हेच कळत नाही.हे सगळं माझ्याशीच का घडतंय? या सगळ्याला असं अपवाद का?

कित्येकदा हा प्रश्न मलाही सतावतो पवन..अगदी बालपणापासून मी तुला ओळखतो आहे. पेरजागडावर कधी जाण्याचा किंवा पेरजागडाच्या नावाचा सुद्धा कधी एक शब्द मी कानांनी ऐकला नाही.सतत मला असं वाटते आहे की जवळच अशी एखादी गोष्ट घडलेली किंवा घडत आहे,जी आत्तापर्यंत ओघावर आलेली नाही.कदाचित हे सगळं तुझ्याच घरातून असावं.तेव्हाच तुला स्वतःचा असा शोध समजेल.

ह.. म....कदाचित असं होऊ शकते.पण ज्याअर्थी मीच इतके दिवस पेरजागडाशी अपरिचित होतो,मला नाही वाटत की घरच्यांना त्याबद्दल फारसं काही माहिती असेल.एके दिवशी मस्करीनिमित्त मी विचारले असता.आईच मला तू फार नवसाचा आहेस म्हणत होती.मी विचारलं होतं की कशाचा नवस केला होता? म्हणून; पण त्यांनतर दोघांनी पण काही सांगितलेच नाही.त्यांचं नेहमी एकच म्हणणं असतं, जे होतं चांगल्यासाठीच होतं.वारंवार त्याचं प्रचार करणे हे स्वतः प्रती एक अभद्र व्यवहार असतं. बरं ते जाऊ देत.बरेच दिवस झाले.वडिलांची प्रकृती पण बरी नाही त्यामुळे सध्या घरीच आहेत.शिवाय

आता वय झाल्यामुळे त्यांची आता कामकाजावरून सुट्टी पण होईल.त्यामुळे त्यांना त्रासवणे हे सुद्धा मला अयोग्य वाटते आहे.

"पवन पोटच्या मुलासाठी आई वडील जीव द्यायला तयार होतात.ही शंका नको ठेवुस मनात की ती अयोग्य आहे.वेळ आल्यावर तिच तुझ्यासाठी सामोरी उभी राहतील."

"मी शांततेत विलीन झालो होतो."

"बरं चल पवन...घरी कामे पडली आहेत.पण तू घाबरु नकोस.हवं असल्यास मी येऊ का?"

"नाही नको रितू...ऑलरेडी तू खूप काही करते आहेस."

रितू पाठमोरी जाताच परत माझी एकांताची वणवण सुरू झाली. पेरजागडची रहस्ये जाणून घेण्यासाठी पुन्हा कुठून सुरुवात करावी लागेल.हे बघू लागलो.मनात विचारांची गुंतागुंत झाली होती.बघावं तेव्हा मित्रांसमवेत घालवलेले क्षण असे सामोरी येऊन जात होते.हृदयात धकधक वाढत जात होती.हे सगळं केव्हापर्यंत होतं माहित नाही.पण चेहऱ्यावर ओसंडून घाम वाहायला लागला होता.त्यामुळे मी बेडवर आडवा होण्याचा प्रयत्न करू लागलो.आणि केव्हा मला झोप आली ते कळलंच नाही.

जाग आली ती कसल्याशा आवाजाने.मी पूर्ण दिवसभर कसा झोपून राहिलो मला काही कळलेच नाही.त्यामुळे उठून जरा आळोखे पिळोखे देत मी बेडवरून उतरलो.वडील खेकसत होते व मध्येमध्येच कन्हणत होते.मी आईला हाक मारली तर आई नेहमीसारखीच कशाचातरी सोंग(निमित्त) घेऊन शेजारच्या घरी गेली होती.

मी आतमध्ये गेलो तर वडील अजून जरा खेकसताना दिसले.कदाचित अंथरुणातून त्यांना उठायला जमत नव्हते, त्यामुळे ते कन्हणत होते.आणि त्यांना असं बघितल्यावर वाटते की आई बराच वेळ झाला घरात नाहीये.त्यामुळे मी जलद गतीने जावून, वडिलांना आधार देऊन, अंथरुणावरून उठवायचा प्रयत्न केला.त्यांच्या छातीवरून हात फिरवू लागलो.बाजूच्या टेबलवर ठेवलेला पाणी हळुवार त्यांना प्यायला दिलं.त्यांना जरा हायसं वाटलं.नंतर काही क्षणांचा विसावा घेत ते म्हणाले...

"तू आलास हे माहीत आहे बेटा,कारण रितूचा आणि तुझा आवाज सारखा दाराशी घुटमळत होता.आणि तुला बोलवावं म्हटलं तर अंगात त्राण कमी पडलं. बरं केव्हा आलास पवन?"

"मघाशीच आलो बाबा,प्रवासामुळे झोपी गेलो होतो.तुमचा आवाज आला त्यामुळे मी इकडे आलो."

"बरं झालं आलास,नाहीतर अंतिमच व्हायचं!"

"बाबा...."

"थट्टा केली रे,अन्यथा तुझी आई म्हणावे आणि उगा राहावे अशी पाळी आली आहे आता."

"हो...बाबा...पण आता तब्ब्येत कशी वाटते तुमची?"

"छान आहे,फक्त हा घसा तेव्हढा खरखरतो..."

"बरं बाबा एक विचारू काय?जर सांगावंसं वाटेल तरच सांगा...काहीच बळजबरी नाही."

"अरे विचार ना!!इतकी कशाला अदबी दाखवतोस."

"बाबा पेरजागडाचा आणि माझा काही संबंध आहे का?"

"क्षणभर वडील स्तब्ध होते."

"सांगा ना बाबा..."

"तुला आईने काही सांगितलं का?"

"नाही हो बाबा..."

" मग आज असं अचानक का विचारतो आहेस?"

खूप दिवस झालेत बाबा,माझ्याशी असं बरंच अघटीत घडत आहे.कदाचित तुम्हाला ते पटणार नाही.त्यामुळे मी आजपर्यंत टाळत राहिलो.त्यानंतर आजपर्यंत घडलेल्या सगळ्या गोष्टी मी वडीलांजवळ कथन केल्या.सगळं वडिलांनी ऐकून घेतलं आणि त्यानंतर ते म्हणाले..

"गंगाधर तुलाही न्यायला आला होता."

"मलाही न्यायला म्हणजे..मी काही समजलो नाही बाबा."

"हे बघ पवन,वाटल्यास तू मला शिव्या दे,मला मार पण तुझ्यासोबत जे काही अघटीत घडत आहे.कदाचित त्याचं कारण मीच आहे.मला वाटलं सगळं काही संपलं असेल.पण..(असे म्हणत त्यांनी दोन्ही हातांनी चेहरा झाकला.)

"हे काय सांगता बाबा...हे असं काय अभद्र बोलत आहात."

"खरं तेच बोलत आहे पवन.याला कारणीभूत मीच आहे,कारण तू माझा मुलगा नाहीस."

"बाबा हि थट्टा करायची वेळ नाही.आधीच खूप काही सोसले आहे.आता पुन्हा काही सोसण्याची तयारी नाही माझी.( तितक्यात काय झालं असं म्हणत आई पण आली होती.)"

"मी खरं बोलतो आहे पवन,हव्यास आपल्या आईला पण विचार,आणि निदान यावेळी तरी मी थट्टा करणार नाही."

" डोळयांच्या कडांचे अश्रू सावरत मी आईला म्हटलं,आई तू तरी खरं सांग...इतक्यात काय चालू आहे हे तिला सुद्धा कळून चुकलं होतं."

"हे खरं आहे पवन.तुला नाव जरूर आम्ही दिलं पण तू आमचा मुलगा नाहीस.आणि तू कोण आहेस?हेसुद्धा आम्हाला माहिती नाही.तुला पेरजागडाने आम्हाला दिलेय असंही म्हणायला काही हरकत नाही."

खरंतर माझ्यासाठी हे फार मोठं अप्राप्य होतं.आधीच मृत्यूचे दिवाळे अंगावर उठले होते.त्यातून जरा का सावरत आहे तर आत्ता हे प्रकरण अंगाशी आलंय. काय? तर मी यांचा मुलगा नाही.आजपर्यंत ज्यांना आईवडील मानले.ज्यांच्या अंगाखांद्यावर आजवर खेळत राहिलो.ज्यांच्या कुशीत आजपर्यंत रडत राहिलो.त्यांच्या त्या एका वाक्याने क्षणात मला पोरका करून टाकलं होतं.आज मला माझ्याकडून सगळं हिरवल्यासारखं वाटत होतं. माया,ममता,जिव्हाळा या सगळयांची किळस यायला लागली होती. आतळी तीळ तीळ तुटायला लागली होती.मला वाटते माझ्या आयुष्यातला मृत्युपेक्षा

फार भयानक प्रसंग होता तो.असे कितीतरी क्षण आसवांच्या पाटांनी वाहून जात होते.आज आईवडील असतानासुद्धा एक पोरगा पोरका झाला होता.

शेवटी नाते म्हणजे असते तरी काय?सख्खा भाऊ जीवाचा वैरी होतो.आणि परक्याला दादा म्हणावं तर तो जीव गहाण करतो.जीव लागला, माया सुटली की प्रेमळ असा नाता तयार होतो.ज्यात परकेपणाची कधी जाणीवही होत नाही.आणि आज माझ्याही घरी हेच नाते निभले होते.त्यांनी कधी मला जाणीव होऊ दिली नाही, आणि हेच कारण आहे की ते मला जवळचे वाटले.

"न जाणे कितीवेळ तो एकांत मल चिरत राहिला पण प्रश्न अजूनही तेव्हढ्यावरच अडकून राहिला होता.कोण आहे मी? जर मी पवन नाही!जर माझं इथलं अस्तित्व नाही!तर कोण आहे मी?"

"आई...बाबा...जर मी तुमचा मुलगा नाही तर कोण आहे मी? कुठून आलोय? काय आहे माझं अस्तित्व?"

"सगळे निःशब्द होते.त्यांच्या चेहऱ्यावर कसलेसे भीतीदायक भाव दिसत होते.कदाचित त्यांना काही सांगावं असं वाटत नव्हतं.त्यांच्या नजरा सारख्या एकमेकांना झुरत होत्या.भूतकाळातील पाने पालटताना अगदी स्पष्टपणे त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते. रडकं असलेलं वातावरण क्षणात चिडीचूप

शांत झालं होतं.सारखं एकमेकांकडे बघत त्या प्रसंगची आठवण करत होते.मी मध्यंतरीच म्हणालो..."

"सांगा आईबाबा..कोण आहे मी? आज तुम्हाला सांगायलाच हवं.हा माझ्या जीवनाचा प्रसंग आहे.आज तुम्ही जरी नाही सांगितले तरी हया जीवनाचा अंत आता निश्चित आहे.आणि त्याला कदाचित तुम्हीच वाचवू शकता.आणि हे सगळं तेव्हाच होऊ शकतं जेव्हा तुम्ही मला सगळं सांगू शकाल."

"एव्हाना सगळी गोष्ट वडीलांच्या लक्षात आलीच होती.भलेही आज तीन जीव एकमेकांसाठी तडफडत होते, पण ह्यात विजय फक्त पेरजागडाचाच होईल, यात मात्र तिळमात्र शंका नव्हती.आणि तरीही प्रयत्न करत राहणे हे आद्य माणसाचे कर्तव्य होतेच.त्यामुळे आता आशा होती ती वडीलांच्या बोलण्याचीच.कारण आईच्या हुंदक्याकडे बघून ती काही बोलेल असं मला वाटत पण नव्हतं."

"शेवटी अश्रू पित वडिलांनी एक दीर्घ उसासा घेतला आणि बोलायला सुरुवात केली."

# ३२. पवनच्या वडिलांचे मनोगत...

जवळपास तीस वर्षे होतात या गोष्टीला.माझं लग्न होऊन चार ते पाच वर्षे झाली तरी आम्हाला संतान प्राप्तीचे सुख नव्हते.मी एक प्राध्यापक असलो तरी त्या सुखाकरिता कित्येक अंधश्रद्धाचं, मी त्या वेळेस खतपाणी घालून पालन केलं होतं.कित्येक उपास तपास पोटाला आळी मारेपर्यंत घालवले होते.कित्येक देव्हारे अंगठे झिजेपर्यंत तुडवले होते.पण हातात निराशेचे कौल घेऊन परतल्याशिवाय माझ्याकडे पर्यायच नव्हतं.त्यावेळेस देव देवळे,पूजा अर्चना,वैद्य नैवैद्य या सगळयांशी मी त्रासून गेलो होतो.जगाला दाखवण्यासाठी आम्ही सुखी तर होतोच पण समाधान नव्हतेच आम्हांत.

हिंडता फिरता जेव्हा आम्ही इथे स्थायिक झालो तेव्हा बऱ्याच डॉक्टरची ट्रीटमेंट चालू होती.अशाच एका ट्रीटमेंटला जेव्हा आम्ही हॉस्पिटलमध्ये गेलो. त्यावेळेसची ही घटना आहे.बाहेर कॅबिनमध्ये डॉक्टरांच्या बोलावण्याची वाट बघत होतो.त्यावेळेस गंगाधरची आणि माझी ओळख झाली.आणि तीच गंगाधरची आणि माझी पहिली भेट. त्या दिवशी त्याच्यासोबत कुणीतरी पदराने तोंड झाकून एक महिला बसली होती.कदाचित

ती त्याची बायको असावी.अगदी मनमिळाऊ स्वभाव होता त्याचा.स्वतःहून त्याने आम्हाला आपलेसे केले होते.

गप्पांच्या ओघाओघात मला सारखे त्याचे हावभाव टोचत होते.कारण ज्या कार्यासाठी आम्ही हॉस्पिटलला आलो होतो, त्यासाठीच तो पण आला होता.पण त्याच्या चेहऱ्यावर कसलीही चिंता नव्हती.त्याचे अगदी ठामपणे बोलणे त्याच्या प्रत्येक वाक्यात दिसून यायचे.एखादा भविष्य समजून घेणारा बोलतो त्याप्रमाणेच त्याचे बोल असायचे. आमच्यासारखेच पुत्रप्राप्तीसाठी त्यानेही नको ते उपाय केले होते.फरक फक्त इतकाच होता की आज त्याच्याकडे समाधान होतं, आणि आमच्याकडे अपुरे नशीब. त्यांचं सुख बघून मला जळायला झालं होतं.पण शेवटी ते माझे नशीब होते.त्यात त्याचा काहीच दोष नव्हता.

काही वेळात डॉक्टरांचं त्यांना बोलावणं आलं.त्यामुळे ते आतमध्ये निघून गेले.मी बाकावरच बसून विचार करू लागलो होतो. गंगाधरने मला बोलावलं होतं. पेरजागडाच्या पायथ्याशी एका छोट्याशा गावात तो राहत होता.त्याने तिथे एका शेषाची आराधना करायला सांगितले होते.खरंतर त्यावेळेस मला थोडा अचंबा वाटला, पण त्याचं सुख बघून मला ते कृत्य करावेसे वाटले होते.

काही वेळाने त्याच प्रसन्नतेसह ते कॅबिनच्या बाहेर आले.काही दिवसांत पुत्रप्राप्तीचा सुख मिळणार हे डॉक्टरांनी निश्चितपणे त्यांना सांगितलं

होतं.आणि ही सगळी त्या सात बहिणीची कृपा आहे असे तो वारंवार सांगत होता. त्यानेच स्वतःचा पत्ता माझ्या स्वाधीन केला.तसे काही जणांच्या तोंडून मी पेरजागडविषयी बरेच ऐकले होते.गडाला पिरबाबांचा आशिर्वाद आहे.असेही म्हणतात.आणि शिवाय त्यांचं जिवंत उदाहरण माझ्या सामोरी होतं.माझ्या मनात सारखी गंगाधर विषयी ईर्ष्या जागृत होत होती.त्यामुळे त्याला निरोप देताना माझ्या अंतःकरणाची लाही लाही होत होती.गंगाधर गेल्यानंतर काय कुणास ठाऊक? पण आम्हा दोघांची डॉक्टरकडे जायची ईच्छा होत नव्हती.त्यामूळे आम्ही पण तिथूनच परतत घराकडे चालले आलो.

त्या दिवशीची रात्र आमच्यासाठी फार दुःखदायी ठरली होती. गंगाधरने म्हटलं होतं की पेरजागडाचा वारसदार येणार आता.त्याचा तो आनंद सारखं सारखं आमच्या डोळयांसमोर येत होता.संतान प्राप्तीचा आढावा आमच्या तळाशी खोल रुतून बसला होता.कारण त्यानंतर आम्ही बऱ्याचदा त्या गोष्टी विसरण्याचा प्रयत्न केला पण नाही जमलं.मी कधी कॉलेजला जाण्याचा प्रयत्न केलाही, तरी आठवणीतून ते दृश्य ओघळत नव्हते.

म्हटलं सगळंच तर केलं,हेच करायला कशाला बाकी ठेवायचं.त्यामुळे काही दिवसांतच आम्ही तिथे निघायचं ठरवलं. रजा टाकून दुसऱ्याच दिवशी गंगाधरकडे रवाना झालो.त्याने सांगितलेल्या पत्त्यानुसार घर शोधायला फारसा वेळ लागला नाही.आम्हाला बघताच दाराशी गंगाधर आणि त्याची बायको आली.त्या दोघांचं ते प्रसन्नतेनं फुललेलं स्मित पुन्हा एकदा मनामध्ये मत्सर निर्माण करत होते.

घर तसं साधेच होते.अगदी जंगलाच्या काठावर.बारीक झुडूपांच्या काटक्यांचा जोडा घेऊन त्यावर लीपलेला मातीचा लिंपण.बऱ्याच जागी उकरलेलं होतं. अधीमधी मोठेमोठे खांब टाकून वर गवताने शाकारलेले होते.बाहेरून कितीही झोपडीसारखं घर वाटत असलं तरी आतमध्ये बऱ्याच प्रमाणात ओलावा जपलेला होता.बाहेरून घर छोटंसं वाटत असलं तरी आतमध्ये विशाल वावर होता.बाहेरच्या पडवीत चूल होती.आतमध्ये बसायला एक छोटीसी चारपाई होती.ज्यावर फाटकी एक चादर अंथरलेली होती.

गंगाधरने पाय धुवायला पाणी दिले आणि आत बसायला सांगितले.प्यायला पाणी घेत स्वतः आमच्याकडे आला आणि बायकोला चहा बनवण्यासाठी पडवीत पाठवले.आणि म्हणाला...

"कसं काय वाटलं साहेब आमचं घर..."

"छान आहे ना.."

"माझी गरीबाची झोपडी आहे साहेब.रोज लिंपत राहावं लागते साहेब.आमच्या नशिबाला कुठल्या आल्या विटांच्या भीती, कुळाचीच ढेकळे आहेत ही."

"गंगाधर...भेदभाव हा माणसांचा असतो.वस्तूंचा नाही.महत्वाचं असतो तो माणुसकीचा मोठेपणा.तुझं घर छोटं आहे यात तुझ्या कमीपणाची कुठेच तरतूद होत नाही.त्यामुळे समांतर असं बोलावे.उच नीच हा भेदभाव नको."

"खरंय तुमचं साहेब...आणि म्हणूनच की इतका खुश आणि आनंदी माणूस आहे.काही दिवसांआधीच माझ्या घरी गोंडस एका मुलाने जन्म घेतला साहेब.तुम्ही यायच्या आधीच दूध पिऊन तो झोपी गेला.( बाजूलाच एका दोरीच्या पाळण्याकडे बोट दाखवून गंगाधर म्हणाला.)"

इतक्यात माऊलीने गंगाधरला बोलावले.त्यांच्या बोलण्यावरून असं वाटत होतं की साखर घरी संपलेली आहे.कारण वारंवार साखरेचा उल्लेख कानावर येत होता.

खरंतर त्या गंगाधरचं अगदी साधंच राहणं होतं.पण त्या दिवशी मला त्याचा फार हेवा वाटत होता.कारण आज माझ्याकडे स्वतःचं राहतं घर होतं.पैसा प्रॉपर्टी सगळंच होतं.पण गंगाधरचं तसं नव्हतं. आपलं घर एकदा बनतं पण त्याला रोज मेहनत करावी लागायची.आपण खाणं नाही झालं की फेकतो,त्याला उद्या पोटाला काय खायचं?हा प्रश्न होता.तरी त्याचं समाधान त्याच्या प्रसन्न स्मितावरून दिसत होतं.सुखाचे बोट धरून दुःखाचे डोंगर चालताना मी त्याला बघत होतो.आणि इतकं सगळं असूनही त्याला कसलीच चिंता नाही. खरं तर त्याचंच जगणं म्हणजे मला खरं जगणं वाटत होतं.नाहीतर

एक आमचं जगणं म्हणजे स्वतःला फक्त जिवंत ठेवणे असं वाटत होतं.स्वतःचं म्हणता म्हणता मातीमोल व्हायचं.ज्या वास्तव्याला जपण्यासाठी आयुष्य खर्ची घालायचे तिथेच आपलं अस्तित्व लुप्त करायचं.

इकडे तिकडे बघतच होतो की माऊलीने चहा आणून दिला.चहाच्या पहिल्याच घोटाला गुळाचा आणि गवतीपत्तीचा सुगंध नाकात शिरला.त्या चहाची चवच काही वेगळी होती.खरंतर तिथे आल्यापासून मन कसे प्रसन्न वाटत होते.काही वेळात चिमुकला उठला आणि त्याने आपले निनाद स्वर चालू केले.माऊलीने त्याला लाडवत अंगणात असलेल्या झाडाखाली खेळवायला नेले.गंगाधर हायसं होऊन म्हणाला...

साहेब..श्रद्धेचा आणि भक्तीचा वारसदार आहे तो.त्यामुळे त्याचं जरासंही रडू आवरत नाही आम्हाला.आम्ही बी तुमच्यासारखेच होतो.ह्यो शेजारच्याच गावची मुलगी हाये. लय प्रयत्न केले पण पोटीपाठी काहीच फुललं नाही.त्यामुळे नवस घातला पेरजागडी भुजंगाला आणि वारसदार उदरात अवतरला.श्रद्धा असेल तर काय बी होऊ शकते साहेब.त्यामुळे मी तुम्हास्नी बोलावलं होतं.आजची रात्र आराम करा साहेब.उद्या तिरपीच्या बऱ्याच आधी निघायचं आहे.आत्तापासून जाऊन काही उपयोग नाही.

मी एक प्राध्यापक असलो तरी त्या बाबतीत मी शून्य होतो.कारण मुलांना अंधश्रद्धेचे धडे देणारा, आज मीच त्या वाटेवर पाऊल ठेवलं होतं.आणि निदान समोर तरी आता काय करायचं आहे? हे सुद्धा मला माहिती

नव्हतं.त्यामुळे गंगाधर जे म्हणेल तेच हो म्हणण्याचे आणि मानून घ्यायचं असं मी ठरवलं होतं.

उन्हे उतरली आणि पूर्ण अंगणभर अंधार पसरला.रानातला शीतल असा रानवारा अंगणात भिरकावू लागला. पेरजागडच्या डोंगराकडे नजर टाकली.हळूहळू काळोखाची किरणे उतरू लागली होती. गंगाधरच्या घरात लाईटची सोय नव्हती. ग्रामपंचायतीच्या मेहेरबानीने अंगणात तेव्हढा एक लाईट दिला होता.बाकी घरातलं सगळं काय सौरऊर्जेच्या टॉर्चवर व्हायचं.बाहेर चारपाई अंथरून गंगाधरशी आम्ही बसलो होतो.आतमध्ये स्त्रियामंडळी स्वयंपाकात मग्न झाल्या होत्या.त्यामुळे चर्चेच्या विषयात मीच गंगाधरला म्हटलं..हे पेरजागड म्हणजे नक्की काय आहे?

साहेब असं म्हणू नका कधी?मी मघाशीच बोललो की हा श्रद्धेचा आणि भक्तीचा विषय आहे.हा डोंगर म्हणजे फार पुरातन आहे. साधी साक्ष अशी द्यायला मी पुरणार नाही साहेब. सत्य आणि सत्वाला अलगदपणे हृदयात कवटाळून ठेवलाय या डोंगराने.इथे देव काय? दानव काय?जनावर काय?प्रत्येक गोष्टीच्या खुणा आहेत.तुम्ही जरी पूर्ण डोंगर फिरलेत ना, तर प्रत्येक गोष्टींचे उत्तर आणि समाधान तुम्हाला मिळून जाईल.जो इथलं सत्व समजून जातो ना साहेब तो इथलाच होऊन जातो.तुम्ही मागा मनापासून काही,तो देतो साहेब पण तुम्ही त्याला त्याच्या नियमाप्रमाणे हवं वागायला.

"असं आहे तर... बरं उद्या किती वाजता निघायचं आहे मग आपल्याला..."

साहेब तुम्ही येणार म्हणून हे मला फार आधीच माहिती होतं.त्यामुळे पूर्वतयारी मी आधीच करून ठेवली होती.आणि तुम्हीपण अगदी योग्य वेळेवर आलात.आज पौर्णिमा चालू झालीय.आजचा दिवस हा बारालाच संपेल.आणि बारापासून त्याची वेळ चालू होईल अगदी सकाळपर्यंत.आणि जिथे तो जाईल तिथेच आपल्याला जायचंय.या सगळ्या सत्वाचा तोच एक रक्षक आहे.त्याच्याजवळ केलेली प्रार्थना कधीच वाया जाणार नाही.आणि हो बाईसाहेबांना म्हणावं भीती ठेवायची नाही.अन्यथा त्याचे परिणाम फार वाईट होतील.

खरंतर त्याच्या सांगण्यावरून माझ्याही मनात भीती साठायला लागली होती.काही क्षणाकरीता तर असं वाटायला लागलं होतं की,आपण कुणा एका तांत्रिकाच्या तर घरी आलो नाहीये.कारण ज्याच्या मागे तो जायला म्हणत होता.त्याची कल्पनाच एक असह्य बाब होती.त्यामुळे माझ्या त्या हो म्हणण्यात सुद्धा अफाट स्थिती दडलेली होती.विचारात मग्न असतानाच माऊली पाण्याचा ग्लास घेऊन जेवायला बोलवायला आली होती. गंगाधरने जी जाणीव मला आत्ता करून दिली होती. तीच जाणीव माऊलीनेसुद्धा आत दिली होती.त्यामुळे जेवण झाल्यावर वसुधा आणि मी बाहेर आलो होतो.

" मला फार भीती वाटतेय वसुधा,हे सगळं साध्य तर होईल ना,नाहीतर निघून जाऊयात आपण..."

" मलाही तितकीच भीती वाटतेय.पण इतक्या दूर आल्यावर जर आपण माघारी फिरलो तर इथे येण्याचं काहीही महत्त्व उरणार नाही.त्यामुळे जे नशिबात आहे ते घडेलच यावर काही शंका नाही."

"हो पण नक्की आपल्याला काय करायचंय हे तुला माहिती आहे का?"

"हो त्यांनी मघाशीच पूर्ण माहिती दिली.विश्वास ठेवा सगळं काही बरोबर होईल.धैर्य असे खचू देवू नका.ज्या आशेने आपण इथपर्यंत आलोय.ती पूर्ण करण्याची जिद्द मनात ठेवा."

"कशाची कुजबुज चालू हाय साहेब..उदयाला लवकर निघायचं आहे.जरा लवकर पाय लंबे करा."

"हो..हो...सहज विचारपूस चालू होती."

"मला समजतेय तुमची परिस्तिथी.अडाणी आहे साहेब.पण इतकाही नाही की चेहरा वाचता नको यायला.."

जंगलाचा इतका भय असताना देखील गंगाधर आणि मी बाहेरच झोपलो आणि स्त्रियामंडळी आत घरात होत्या.रोज टीव्हीवर बातम्या बघताना झोप यायची.आज कितीतरी दिवसांनी असं खुलं आभाळ दिसत होतं.चांदण्यांची गम्मत बघायला मिळत होती.हळूहळू एकेक ढगाला मागे टाकत जाणारा चंद्र दिसत होता.बऱ्याच वेळानंतर झोप लागली.थंडगार वाऱ्याच्या बाहुपाशात तशी घट्ट निद्रा कधीच मला आली नसेल.कारण दोन वाजेच्या सुमारास सगळे मला हलवत होते तरी पण जाग यायला तयार नव्हती.

डोळे उघडले तेव्हा गंगाधर अंगावर घोंगडं आणि एका हातात टॉर्च घेऊन उभा होता. आवं उठा न सायेब, आकाशतनं कवाचाच कौल आलाय.मी घाबरून उठून उभा झालो.पण मला एक कळत नव्हते की गंगाधरला आकाशाची कोणती भाषा समजते.माझी प्रश्नार्थक मुद्रा गंगाधरच्या लक्षात आली असावी.त्याने आकाशाकडे बघत बोटे दाखवली.खगोलीय विषुववृत्तावरील एक मोठा परंतु अंधुक तारकासमूह चकाकत होता. टॉलेमी यांच्या ४८ तारकासमुहांपैकी हा एक होता.याला इंग्रजीमध्ये ophiuchus ( ऑफीयुकस) म्हणतात.आणि हे मूळ ग्रीक नाव असून त्याचा अर्थ साप( भुजंग) असा होतो.पूर्वीच्या लोकांमध्ये असे काय समज अजून लपले आहेत माहित नाही.पण त्या चमकणाऱ्या तारकासमुहांचा इथे काय संबंध आहे हे मला बघायचं होतं.

झोप उडवण्यासाठी चेहऱ्यावरून पाणी घेतलं आणि गंगाधरच्या मागोमाग चालू लागलो.कानोसा घेत गंगाधर रस्ता काढायचा.आणि त्याच्या

मागोमाग आम्ही सगळे चालायचो.अजूनही आठवते त्या प्रवासात माऊलीचा तान्हा अजिबात रडला नाही.एखाद्या शहाण्या बाळासारखे कधी टकमक बघायचा तर कधी शांतपणे झोपायचा.हात दुखू नये म्हणून वसुधा अधीमधी त्याला पकडायची.

अंधारात चाचपडत असताना आम्ही बराच अंतर चालून आलो होतो.गंगाधरची झोपडी आणि तो अंगणात असणारा लाईट केव्हाच नजरेच्या आड झाला होता.मी चालत तर होतो पण अर्धा लक्ष माझं सभोवार असायचं. जरासाही काही आवाज आला की माझ्या हृदयात एकदम जोराने धस्स व्हायचं.

रात्रीचा थंडगार वारा चाललेला होता.पण कपाळावर घामाचे ओघळ जमा होत होते. श्वासांचा आता आवाज पण व्हायला लागला होता.पण गंगाधर मात्र कमालीचा माणूस होता.त्याला जरासाही दम येत नव्हता.टॉर्च घेऊन आधी सामोरी जाणे,आजूबाजूची चौकशी करणे आणि आम्ही कुठे थांबलो आहोत म्हणून परत आमच्यापर्यंत येणे.त्याच्याकडे बघितल्यावर असं वाटत होतं की जणू तो काही चाललाच नाही आहे.

इतक्याने बरं होतं की रात्र उजेडाची होती.त्यामुळे अंधाऱ्या रात्रीपेक्षा बरंच काही डोळ्यांना दिसत होतं.आणि अर्धा पाऊण तास चालत आलो, तरीपण एकही प्राण्याचे दर्शन झाले नाही.मलापण थोडा दम आला होता.त्यामुळे दहा मिनिटे बसून विश्रांती घेऊयात असं मी म्हणालो.तितक्यात गंगाधरच म्हणाला...

"बसा साहेब बसा...पाच दहा मिनिटे विश्रांती घ्या...कारण आता आपण जवळच आलोय."

गंगाधर वाक्य पूर्ण करतच आहे की एक घुबड एक कर्कश घुत्कार काढत गंगाधरच्या डोक्यावरून उडत गेला.त्यासरशी गंगाधर स्तब्ध झाला.तो आजूबाजूचा कानोसा घेऊ लागला.हे जे काही घडत होते माझ्यासाठी कुतूहलास्पद होते.मीच काय एवम वसुधासुद्धा घाबरली होती.घाबरून ती सुद्धा माझ्याजवळ येऊन बसली होती.

बघितलं तर घुबड हा रात्रीकर पक्षी आहे.बरेच आवाज काढतो पण तरीही त्याला बरीच लोक भितात.आपल्याला जसं रात्री दिसत नाही. तसं त्याला दिवसाढवळ्या दिसत नाही.पण एक मात्र आहे त्याच्या आवाजामागे किंवा त्याच्या कृत्यामागे बरीच कारणे दडलेली असतात.आणि या वेळेसचे कारण गंगाधरच्या लक्षात आले असावे.काही वेळाने गंगाधर आला आणि म्हणाला...

सायेब, एकदाचं ध्यान देऊन आयका,मनात जे बी भीती आसल,सगळी काढून टाका.कारण आता जे काही घडणार आहे, किंवा जे काही दिसणार आहे ते तुमच्या विश्वासाच्या पलीकडचं हाये.आता जी अनुभूती तुम्हाला होणार आहे.ती काही मामुली नाही.त्यामुळे ज्या काही शंका असतील

त्या आत्ता आणि शेवटच्या इथेच टाकून द्या,पुन्हा त्याचा काही त्रास नको.कारण आता समोरचा त्रास फक्त तुम्हालाच नाही, तर आम्हाला बी होणार.हे लक्षात ठेवा.

गंगाधरची घाई आता लक्षात येत होती.बरेचसे चित्रविचित्र आवाज यायला लागले होते.आता रस्ता पूर्णपणे चढाईचा होता.आणि डोंगर दणाणेल असा फुत्कार कानाशी येत होता.आणि त्याच आवाजाच्या मागे मागे गंगाधर आम्हांस नेत होता.जेव्हा जेव्हा तो फुत्कार होई.हृदयात जोरात धस्स व्हायचं.आणि त्या फूत्काराच्या मागे खण खण असा आवाज व्हायचा. असं बरंच वेळ आम्ही त्या फूत्काराच्या मागे मागे जात होतो.तो एक विशालकाय भुजंग होता.रात्र उजेडी असली तरी स्पष्टपणे मी त्यांस पाहू शकत नव्हतो.पण त्याचा आवाज आणि त्याची हालचाल बघून एवढं नक्की वाटत होतं की तो साधासुधा भुजंग नाहीच.खरंच गंगाधरच्या म्हणण्यानुसार कल्पनेच्या बाहेरचं सगळं घडत होतं.आणि त्याच्या मागे असणारं खण खण म्हणजे या जंगलात अमाप द्रव्यसाठा आहे याची ग्वाही देत होता.भले गंगाधरने सांगितलं होतं की भीती त्यागून द्यायची, पण जेव्हा कधी तो भुजंग थांबल्यासारखा वाटायचा.माझी भीतीने गाळण उडायची.

शिवाय तो प्रकाश चालू बंद व्हायचा.अगदी काजव्यासारखा, हळूहळू तो भुजंग आडीमोडी डोंगराच्या पायथ्याशी सरपटू लागला.दगडांचे उंचच उंच कडे होते.त्यामुळे दगडांचा आधार घेत त्याच्या मागे मागे जाऊ लागलो.समोर एक गुंफा होती.आम्ही सगळे बाजूलाच थांबून होतो.क्षणभर गुंफेच्या पायथ्याशी भुजंग घुटमळला.आणि जोरात फुत्कारला.सबंध रान जागेल असे त्याचे

फुत्कारने होते.कानठळया बसतील असा तो आवाज दगडांना चिरत चिरत गेला होता.सारखं हृदयाला एक थरकाप जाणवत होता.

मी एका दगडाच्या कडेने वाकून पाहिले. गुंफेशी ठाण मांडलेला भुजंग स्पष्टपणे दिसत होता.त्याचे लाल लाल अजस्त्र डोळे रागाने लालबुंद दिसत होते.बहुतेक कुणाची चाहूल लागल्यागत तो भुजंग तिथे ठाण मांडून बसलेला होता.आणि इतक्यात चित्रविचित्र आवाज करत मघाशी असलेला घुबड आला.पायथ्याशी असलेल्या झाडावर बसून ओरडू लागला.कदाचित तो त्या भूजंगाला डिवचू बघत होता.

भुजंगाला त्याच्या येण्याची आधीच चाहूल होती.त्यामुळे त्या झाडाच्या दिशेने भुजंगाने झेप घेतली, आणि तो घुबड घुत्कार करता करता पळून गेला. भुजंगाच्या त्या आकांडतांडवाने ते झाड जमिनीपासून उखळून गेले होते. घुबडाच्या गेल्यानंतरही भुजंगाचा राग कमी झाला नव्हता.संपूर्ण पेरजागड दणाणेल असा त्याने एक फुत्कार सोडला आणि जवळच असलेल्या गुंफेत त्याने प्रवेश घेतला.

त्याचा राग इतका भयंकर होता की त्याच्या गेल्यानंतरही जागचं हलायलासुद्धा भीती वाटत होती. पायाखालच्या पाचोळयायाचाही इतका आवाज येऊ नये, याची काळजी घेत होतो.पण या सगळयात निश्चिंत होता तो माऊलीचा तान्हा.भीतीने आमची धावपळ होत होती पण तो शांत साखरझोपेत होता.जणू इथे त्याला कशाचीच चिंता नव्हती.

काही वेळाने सगळीकडे एक भयाण शांतता पसरली.कुठलाही फुत्कार वा चित्कार ऐकायला येत नव्हता.जिकडे बघावे तिकडे एक विचित्र शांतता जाणवत होती.गंगाधर आणि आम्ही ज्या आडोशाला लपलो होतो, तिथून गंगाधर बाहेर आला.आणि त्या भूजंगाच्या गुंफेकडे जाणाऱ्या एका दगडावर उभा झाला.त्याला बघून मागोमाग मी आणि इतरही येऊ लागले. गंगाधरने दगडांना कान लावला. भुजंगाचं कंपन अजूनही दगडांशी उमडत होतं.त्यामुळे सावकाश पाऊले टाकत गंगाधर गुंफेकडे जात होता.आणि मागोमाग आम्ही पण जात होतो.

काही वेळाने जरा भीतभीतच आम्ही सगळे त्या गुंफेच्या समोर होतो.गुंफेच्या तोंडाशी एक पंचशेषाची मूर्ती होती.गुंफा किती खोल आहे कळलं नाही पण तोंडाशीच इतका अंधार दाटला होता की तिथं उभं राहायलाही जीवावर येत होतं.आणि आपल्या डोळयाच्या समोर जेव्हा भुजंग त्या गुहेत गेला, तेव्हा तिथेच त्या गुंफेच्या तोंडाशी उभे राहणे म्हणजे थोडं भीतीदायकच असते ना!आणि खरंच त्या वेळेस मला सारखी भीती जाणवत होती.

गुंफेच्या तोंडाशी थोडी बरीच जागा होती पण पहिल्यांदा जायचे कुणी?हा विचार सारखा माझ्या मनात येत होता.माझी ती चिंता गंगाधरने ओळखली असावी.त्यामुळे एक मशाल पेटवून तोच सगळयात आधी तिथे गेला. तान्ह्याला वसुधेकडे सोपवत माऊली सुद्धा मागोमाग गेली.मी जरा

भीतभीतच वसुधेसोबत त्यांच्याजवळ पण बाहेरच असलेल्या दगडावर जाऊन बसलो.कारण अजूनही तिथे जायचे धाडस माझ्या अंगात येत नव्हते.

गंगाधर आणि माऊली पंचशेषाच्या समोर ध्यानस्थ बसले.आणि सोबतच आणलेल्या सामग्री सोबत ते पूजेची तयारी करू लागले होते.गंगाधर ओठातल्या ओठात काहीतरी मंत्र पुटपुटत होता.आणि माऊली त्याला जे हवेय ती सामग्री काढून देत होती.पूजा संपन्न झाल्यावर त्याने बाजूलाच दगडे रचून यज्ञाची तयारी सुरू केली.माऊलीने आधीच वसुधेला त्याची कृती समजावून सांगितली होती.त्यामुळे आता जे काही होतं ते तिच्याच हाती होतं.

त्या भयाण शांततेत गंगाधरचा मंत्रनाद चालू होता.माऊली त्याच्या प्रत्येक वाक्यासरशी यज्ञात समर्पण करत होती.मला ते थोडे विचित्र वाटत होतं, पण जे घडत आहे त्यावर विश्वास करण्याशिवाय माझ्याकडे पर्याय नव्हता.त्यामुळे मी हे सगळे बघत होतो.काही वेळात वसुधेने डोळे मिटले.जणू ती इथे असूनही डोळे मिटून दुसऱ्या विश्वात वावरत आहे.त्यावेळेस तिच्या विश्वात काय घडत आहे? हे तिनेच काही दिवसानंतर मला सांगितले होते.

ती बघत होती.ती कुठेतरी विशालकाय पाण्याच्या पातळीच्या तळाशी जाऊन पोहचली होती.चारही बाजूला पाण्याचा संथपणा तिला जाणवत होता.ती कोणत्या कल्पनेत वावरत होती,माहिती नाही पण त्या तळात असूनही ती स्वच्छंदपणे बघू शकत होती की वावरू शकत होती.दूर दूर पर्यंत तिला

काहीच दिसत नव्हतं.ती चालत चालत सामोरी जात होती.काही वेळ असं सामोरी गेल्यावर तिच्या नजरेत काही आलं.

सामोरी एक शिवशंकराची प्रतिमा होती.ती इतकी प्राचीन आणि कोरीव होती की क्षणभर ही मूर्ती इथे कशी? हा विचार वसुधा करायला लागली होती.मूर्तीच्या खाली एक शिवपिंड होती.ती चालत चालत त्या शिवपिंडाकडे जात होती.लक्ष अशी सामोरी होती.आणि तेव्हढ्यात शिवशंकराच्या प्रतीमेमागून एक छोटीशी सुतापेक्षा बारीक वस्तू हालचाल करून शिवपिंडाकडे आली.ती अवघ्या काही पावलांवरच असल्यामुळे तिला ते दिसायला आलं.जशी ती वस्तू शिवपिंडावर आली,शिवपिंडाचा स्पर्श होताच त्या वस्तूत बदल होऊ लागला.ती सूतापेक्षा बारीक असलेली वस्तू हळूहळू मोठी होऊ लागली.तो एक शिवपिंडावरचा भुजंग होता.हळूहळू त्याचा व्याप इतका वाढत गेला की नजरेच्याही कोपऱ्यात मावेनासा होऊ लागला होता.तो बदल बघताच वसुधा घाबरली.ती इतकी घाबरली की तिने डोळे लावले आणि ओरडायला लागली.

मग डोळे उघडले तेव्हा तेव्हा वादळ आल्यासारखं त्या तळात हालचाल होताना दिसली.तो भुजंग,ती शिवपिंड,शिवप्रतिमा सगळे काही दिसेनासे झाले.ती पूर्ववत झाली.पण भुजंग मात्र डिवचलेला होता.मला वाटते ती हीच भीती असेल जी टाकून द्यायला सारखा गंगाधर म्हणत होता.

पूर्ववत आल्यावर वसुधा इतकी घाबरली होती की ती उठून उभी झाली.आणि मला परतूयात म्हणून निघू लागली.त्यावेळेस मला त्याची काहीच कल्पना नव्हती.पण ती घाबरली होती, त्यामुळे नक्कीच काहीतरी भयंकर घडले आहे, असे मला वाटत होते.अचानक मघाशी असलेला फुत्कार जाणवू लागला.

यज्ञ चालूच होता आणि गंगाधरला याची पूर्व कल्पना होतीच.पण हे आता सगळयांवरच भारी पडेल याची पूर्वसूचना सुद्धा त्याने खूप आधीच दिली होती.त्याच्या कानाशी येत असलेले फुत्कार आता कळायला लागले होते, की नक्कीच काहीतरी अघटीत घडेल आता.फुत्कार वाढू लागले आणि भुजंग बाहेर आला. यज्ञावरून सरपटत आल्यामुळे यज्ञाची केव्हाच राखरांगोळी झाली होती.

मी आणि वसुधा फार घाबरलो होतो.गुंफेत अडकल्या गंगाधरचं आवाज आला.. सायेब बाळास्नी घेऊन निघा तुम्ही...अजिबात थांबू नका. भुजंगाचे आकांततांडव आम्हाला माहीत होते त्यामुळे न बघता आम्ही वाट मिळेल त्या रस्त्याने निघायला लागलो.मागाहून ऐकू येत होती ती गंगाधरची आणि माऊलीची किंकाळी,आणि त्या भुजंगाचे आक्रोश.

या सगळया धावपळीत उजाडायला पण लागलेच होते.पण एक अजूनही प्रश्न पडला होता.जेव्हा आम्ही परतत होतो तेव्हा गंगाधरचे घर आम्हाला दिसले नाही.बऱ्याच लोकांनी तुम्ही जंगलातून येत आहात?तिथे

काय करत होतात?कशाला गेला होतात? हे प्रश्न अगदी आवर्जून विचारले असतील.

आणि तो बाळ त्या धावपळीतही अगदी शांत होता आणि इकडे शहरात आल्यावर रडायला लागला.त्याला बघून वसुधेची माया ममता उमळू लागली.तिच्या डोळ्यांतून पाणी आणि उरोजांतून दुधाच्या धारा वाहू लागल्या.तो मुलगा म्हणजे तूच आहेस पवन. पेरजागडाचा वारसदार तूच आहेस.

पण एक कळत नाही.जर गंगाधर त्या दिवशी जिवंत वाचला होता तर मग आजपर्यंत मला भेटला का नाही.निदान तुझी भेट घ्यायला तुला न्यायला येण्याचं त्याचं पुरेपूर हक्क होतं,काहीही झालं तरी तो तुझा खरा वडील होता.

शेवटी आपला प्रश्न पुन्हा तितक्यावरच राहिला.कोण होता पवन?आणि नेमकं त्याचं आणि या भुजंगाचं काय नाते होते?कुठे होता गंगाधर? आता काय तयारी असेल पवनची? या सगळ्यांची उत्तरे तुम्हाला सापडतील. पेरजागड भाग पाच मध्ये.पण त्याआधी पेरजागड भाग एक,दोन,तीन हे भाग वाचायला विसरू नका,आणि कसे वाटले ते मत द्यायलासुद्धा विसरू नका. पेरजागड भाग पाच लवकरच आपल्या प्रतीक्षेत......

आपला

कार्तिक हजारे...

## ई साहित्य प्रतिष्ठानचं चौदा वर्षांचं झालं
## कार्तिक हजारे यांचं ई साहित्यवरचं हे सातवं पुस्तक.

कार्तिक हजारे चंद्रपूर जिल्ह्यातील अतिदुर्गम ग्रामीण भागातील एक युवक. परिस्थितीच्या निखाऱ्यांनी त्यांच्यातील लेखकाला करपवण्याचा खूप प्रयत्न केला. त्यातून त्यांची शैली आणि भाषा पुण्यामुंबईच्या अभिजनवर्गापासून वेगळी. त्यामुळे त्यांच्या कथांमध्ये आशयाची ताकद आणि अभिव्यक्तीमध्ये ठोस मांडणी असूनही त्यांच्या साहित्याला म्हणावा तसा प्रतिसाद मिळात नव्हता. त्यांनीच म्हटाले आहे की लिहीण्यापेक्षा जास्त टेन्शन येते ते लिहीलेले दुसऱ्याला दाखवण्यात. पण ई साहित्यवर त्यांची पहिली तीन पुस्तकं गाजली, वाचकांनी वाखाणली तेव्हा मात्र त्यांना हुरूप आला.

असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य

प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि सर्वदूर कानाकोपऱ्यातल्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. याच आमच्या प्रेरणा आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनुप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, स्वीटी महाले, अंबरीश गुरव, अविनाश जामदार, गौरव नायगांवकर, प्रणिता ठाकूर, अनिल पिसे, अनामिका बोरकर, पवन सोनवणे, राजेंद्र शेळके, पुर्वा राउत, धनंजय कलमष्टे, वैभव तांबटकर, बाळासाहेब शिंपी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत.

ही नवीन लेखकांची दमदार फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?

सुनीळ सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या. साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धीआणि विकास नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव


www. esahity. com

esahity@gmail. com

9869674820 (Whatsapp free books)